बहु कापट्य वादवेवाद । बहु कुतर्क भेदाभेद ।
बहु क्रूर कृपामंद । या नांव बद्ध ।२६।

बहु निंदा बहु द्वेष । बहु अधर्म बहु अभिळाष ।
बहु प्रकारीचे दोष । या नांव बद्ध ।२७।

बहु भ्रष्ट अनाचार । बहु नष्ट येकंकार ।
बहु आनित्य अविचार । या नांव बद्ध ।२८।

बहु निष्ठुर बहु घातकी । बहु हत्यारा बहु पातकी ।
तपीळ कुविद्या अनेकी । या नांव बद्ध ।२९।

बहु दुराशा बहु स्वार्थी । बहु कळह बहु अनर्थी ।
बहु डाईक दुर्मती । या नांव बद्ध ।३०।

बहु कल्पना बहु कामना । बहु तृष्णा बहु वासना ।
बहु ममता बहु भावना । या नांव बद्ध ।३१।

बहु विकल्पी बहु विषादी । बहु मूर्ख बहु समंधी ।
बहु प्रपंची बहु उपाधी । या नांव बद्ध ।३२।

बहु वाचाळ बहु पाषांडी । बहु दुर्जन बहु थोतांडी ।
बहु पैशून्य बहु खोडी । या नांव बद्ध ।३३।

बहु अभाव बहु भ्रम । बहु भ्रांति बहु तम ।
बहु विक्षेप बहु विराम । या नांव बद्ध ।३४।

बहु कृपण बहु खंदस्ती । बहु आदखणा बहु मस्ती ।
बहु असत्क्रिया व्यस्ती । या नांव बद्ध ।३५।

परमार्थविषईं अज्ञान । प्रपंचाचें उदंड ज्ञान ।
नेणे स्वयें समाधान । या नांव बद्ध ।३६।

परमार्थाचा अनादर । प्रपंचाचा अत्यादर ।
संसारभार जोजार । या नांव बद्ध ।३७।

सत्संगाची नाहीं गोडी । संतनिंदेची आवडी ।
देहेबुद्धीची घातली बेडी । या नांव बद्ध ।३८।

हातीं द्रव्याची जपमाळ । कांताध्यान सर्वकाळ ।
सत्संगाचा दुष्काळ । या नांव बद्ध ।३९।

नेत्रीं द्रव्य दारा पहावी । श्रवणीं द्रव्य दारा ऐकावी ।
चिंतनीं द्रव्य दारा चिंतावी । या नांव बद्ध ।४०।

काया वाचा आणि मन । चित्त वित्त जीव प्राण ।
द्रव्यदारेचें करी भजन । या नांव बद्ध ।४१।

इन्द्रियें करून निश्चळ । चंचळ होऊं नेदी पळ ।
द्रव्यदारेसि लावी सकळ । या नांव बद्ध ।४२।

द्रव्य दारा तेंचि तीर्थ । द्रव्य दारा तोचि परमार्थ ।
द्रव्य दारा सकळ स्वार्थ । म्हणे तो बद्ध ।४३।

वेर्थ जाऊं नेदी काळ । संसारचिंता सर्वकाळ ।
कथा वार्ता तेंचि सकळ । या नांव बद्ध ।४४।

नाना चिंता नाना उद्वेग । नाना दुःखाचे संसर्ग ।
करी परमार्थाचा त्याग । या नांव बद्ध ।४५।

घटिका पळ निमिष्यभरी । दुश्चीत नव्हतां अंतरीं ।
सर्वकाळ ध्यान करी । द्रव्यदाराप्रपंचाचें ।४६।

तीर्थ यात्रा दान पुण्य । भक्ति कथा निरूपण ।
मंत्र पूजा जप ध्यान । सर्वही द्रव्यदारा ।४७।

जागृति स्वप्न रात्रि दिवस । ऐसा लागला विषयेध्यास ।
नाहीं क्षणाचा अवकाश । या नांव बद्ध ।४८।

ऐसें बद्धाचें लक्षण । मुमुक्षपणीं पालटे जाण ।
ऐक तेही वोळखण । पुढिलीये समासीं ।४९।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'बद्धलक्षणनाम'
समास सातवा समाप्त.

❑❑

दशक ५ : समास ८

मुमुक्षुलक्षण

॥ श्रीराम ॥

संसारमदाचेनि गुणें । नाना हीनें कुलक्षणें ।
जयाचेनि मुखावलोकनें । दोषचि लागे । १ ।

ऐसा प्राणी जो कां बद्ध । संसारीं वर्ततां अबद्ध ।
तयास प्राप्त जाला खेद । काळांतरीं । २ ।

संसारदुःखें दुखवला । त्रिविधतापें पोळला ।
निरूपणें प्रस्तावला । अंतर्यामीं । ३ ।

जाला प्रपंचीं उदास । मनें घेतला विषयत्रास ।
म्हणे आतां पुरे सोस । संसारींचा । ४ ।

प्रपंच जाईल सकळ । येथील श्रम तों निर्फळ ।
आतां कांहीं आपुला काळ । सार्थक करूं । ५ ।

ऐसी बुद्धि प्रस्तावली । पोटीं आवस्ता लागली ।
म्हणे माझी वयेसा गेली । वेर्थचि आवघी । ६ ।

पूर्वी नाना दोष केले । ते अवघेचि आठवले ।
पुढें येऊनि उभे ठेले । अंतर्यामीं । ७ ।

आठवे येमाची यातना । तेणें भयेचि वाटे मना ।
नाहीं पापासि गणना । म्हणौनियां ।। ८ ।।

नाहीं पुण्याचा विचार । जाले पापाचे डोंगर ।
आतां दुस्तर हा संसार । कैसा तरों ।। ९ ।।

आपले दोष आछ्यादिले । भल्यास गुणदोष लाविले ।
देवा म्यां वेर्थचि निंदिले । संत साधु सज्जन ।। १० ।।

निंदेऐसे नाहीं दोष । ते मज घडले कीं विशेष ।
माझे अवगुणीं आकाश । बुडों पाहे ।। ११ ।।

नाहीं वोळखिले संत । नाहीं अर्चिला भगवंत ।
नाहीं अतित अभ्यागत । संतुष्ट केले ।। १२ ।।

पूर्व पाप वोढवलें । मज कांहींच नाहीं घडलें ।
मन अव्हाटीं पडिलें । सर्वकाळ ।। १३ ।।

नाहीं कष्टविलें शेरीर । नाहीं केला परोपकार ।
नाहीं रक्षिला आचार । काममदें ।। १४ ।।

भक्तिमाता हे बुडविली । शांति विश्रांति मोडिली ।
मूर्खपणें म्यां विघडिली । सद्बुद्धी सद्वासना ।। १५ ।।

आतां कैसें घडे सार्थक । दोष केले निरार्थक ।
पाहों जातां विवेक । उरला नाहीं ।। १६ ।।

कोण उपाये करावा । कैसा परलोक पावावा ।
कोण्या गुणें देवाधिदेवा । पाविजेल ।। १७ ।।

नाहीं सद्भाव उपजला । अवघा लोकिक संपादिला ।
दंभ वरपंगें केला । खटाटोप कर्माचा ।। १८ ।।

कीर्तन केलें पोटासाठीं । देव मांडिले हाटवटीं ।
आहा देवा बुद्धि खोटी । माझी मीच जाणें ।। १९ ।।

पोटीं धरूनि अभिमान । शब्दीं बोलें निराभिमान ।
अंतरीं वांछूनियां धन । ध्यानस्त जालों ।२०।

वित्पत्तीनें लोक भोंदिले । पोटासाठीं संत निंदिले ।
माझे पोटीं दोष भरले । नाना प्रकारीचें ।२१।

सत्य तेंचि उछिदेलें । मिथ्य तेंचि प्रतिपादिलें ।
ऐसें नाना कर्म केलें । उदरंभराकारणें ।२२।

ऐसा पोटीं प्रस्तावला । निरूपणें पालटला ।
तोचि मुमुक्ष बोलिला । ग्रन्थांतरीं ।२३।

पुण्यमार्ग पोटीं धरी । सत्संगाची वांछा करी ।
विरक्त जाला संसारीं । या नांव मुमुक्ष ।२४।

गेले राजे चक्रवर्ती । माझें वैभव तें किती ।
म्हणे धरूं सत्संगती । या नांव मुमुक्ष ।२५।

आपुले अवगुण देखे । विरक्तिबळें वोळखे ।
आपणासि निंदी दुःखें । या नांव मुमुक्ष ।२६।

म्हणे मी काये अनोपकारी । म्हणे मी काय दंभधारी ।
म्हणे मी काये अनाचारी । या नांव मुमुक्ष ।२७।

म्हणे मी पतित चांडाळ । म्हणे मी दुराचारी खळ ।
म्हणे मी पापी केवळ । या नांव मुमुक्ष ।२८।

म्हणे मी अभक्त दुर्जन । म्हणे मी हीनाहूनि हीन ।
म्हणे मी जन्मलों पाषाण । या नांव मुमुक्ष ।२९।

म्हणे मी दुराभिमानी । म्हणे मी तपीळ जनीं ।
म्हणे मी नाना वेसनी । या नांव मुमुक्ष ।३०।

म्हणे मी आळसी आंगचोर । म्हणे मी कपटी कातर ।
म्हणे मी मूर्ख अविचार । या नांव मुमुक्ष ।३१।

म्हणे मी निकामी वाचाळ । म्हणे मी पाषांडी तोंडाळ ।
म्हणे मी कुबुद्धि कुटिळ । या नांव मुमुक्ष ।३२।

म्हणे मी कांहींच नेणे । म्हणे मी सकळाहूनि उणें ।
आपलीं वर्णीं कुलक्षणें । या नांव मुमुक्ष ।३३।

म्हणे मी अनाधिकारी । म्हणे मी कुश्चिळ अघोरी ।
म्हणे मी नीच नानापरी । या नांव मुमुक्ष ।३४।

म्हणे मी काये आपस्वार्थी । म्हणे मी काये अनर्थी ।
म्हणे मी नव्हे परमार्थी । या नांव मुमुक्ष ।३५।

म्हणे मी अवगुणाची रासी । म्हणे मी वेर्थ आलों जन्मासी ।
म्हणे मी भार जालों भूमीसी । या नांव मुमुक्ष ।३६।

आपणास निंदी सावकास । पोटीं संसाराचा त्रास ।
धरी सत्संगाचा हव्यास । या नांव मुमुक्ष ।३७।

नाना तीर्थें धुंडाळिलीं । शमदमादि साधनें केलीं ।
नाना ग्रंथांतरें पाहिलीं । शोधूनियां ।३८।

तेणें नव्हे समाधान । वाटे अवघाच अनुमान ।
म्हणे रिघों संतांस शरण । या नांव मुमुक्ष ।३९।

देहाभिमान कुळाभिमान । द्रव्याभिमान नानाभिमान ।
सांडूनि संतचरणीं अनन्य । या नांव मुमुक्ष ।४०।

अहंता सांडूनि दूरी । आपणास निंदी नानापरी ।
मोक्षाची अपेक्षा करी । या नांव मुमुक्ष ।४१।

ज्याचें थोरपण लाजे । जो परमार्थकारणें झिजे ।
संतापाईं विश्वास उपजे । या नांव मुमुक्ष ।४२।

स्वार्थ सांडून प्रपंचाचा । हव्यास धरिला परमार्थाचा ।
अंकित होईन सज्जनाचा । म्हणे तो मुमुक्ष ।४३।

ऐसा मुमुक्ष जाणिजे । संकेतचिन्हें वोळखिजे ।
पुढें श्रोतीं अवधान दीजे । साधकलक्षणीं ।४४।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'मुमुक्षुलक्षणनाम'
समास आठवा समाप्त.

❑❑

दशक ५ : समास ९

साधकलक्षण

॥ श्रीराम ॥

मागां मुमुक्षाचें लक्षण । संकेतें केलें कथन ।
आतां परिसा सावधान । साधक तो कैसा । १ ।

अवगुणाचा करूनि त्याग । जेणें धरिला संतसंग ।
तयासि बोलिजे मग । साधक ऐसा । २ ।

जो संतांसि शरण गेला । संतजनीं आश्वासिला ।
मग तो साधक बोलिला । ग्रंथांतरीं । ३ ।

उपदेशिलें आत्मज्ञान । तुटलें संसारबंधन ।
दृढतेकारणें करी साधन । या नांव साधक । ४ ।

धरी श्रवणाची आवडी । अद्वैतनिरूपणाची गोडी ।
मननें अर्थांतर काढी । या नांव साधक । ५ ।

होता सारासारविचार । ऐके होऊनि तत्पर ।
संदेह छेदूनि दृढोत्तर । आत्मज्ञान पाहे । ६ ।

नाना संदेहनिवृत्ती । व्हावया धरी सत्संगती ।
आत्मशास्त्रगुरुप्रचीती । ऐक्यतेसि आणी । ७ ।

देहबुद्धि विवेकें वारी । आत्मबुद्धि सदृढ धरी ।
श्रवण मनन केलेंचि करी । या नांव साधक ।८।

विसंचूनि दृश्यभान । दृढ धरी आत्मज्ञान ।
विचारें राखें समाधान । या नांव साधक ।९।

तोडूनि द्वैताची उपाधी । अद्वैत वस्तु साधनें साधी ।
लावी ऐक्यतेची समाधी । या नांव साधक ।१०।

आत्मज्ञान जीर्ण जर्जर । त्याचा करी जीर्णोद्धार ।
विवेकें पावे पैलपार । या नांव साधक ।११।

उत्तमें साधूचीं लक्षणें । आंगिकारी निरूपणें ।
बळेंचि स्वरूपाकार होणें । या नांव साधक ।१२।

असत्क्रिया ते सोडिली । आणी सत्क्रिया ते वाढविली ।
स्वरूपस्थिती बळावली । या नांव साधक ।१३।

अवगुण त्यागी दिवसेंदिवस । करी उत्तम गुणाचा अभ्यास ।
स्वरूपीं लावी निजध्यास । या नांव साधक ।१४।

दृढ निश्चयाचेनि बळें । दृश्य असतांच नाडळे ।
सदा स्वरूपीं मिसळे । या नांव साधक ।१५।

प्रत्यक्ष माया अलक्ष करी । अलक्ष वस्तु लक्षी अंतरीं ।
आत्मस्थितीची धारणा धरी । या नांव साधक ।१६।

जें या जनासि चोरलें । मनास न वचे अनुमानलें ।
तेंचि जेणें दृढ केलें । या नांव साधक ।१७।

जें बोलतांचि वाचा धरी । जें पाहातांचि अंध करी ।
तें साधी नाना परी । या नांव साधक ।१८।

जें साधूं जातां साधवेना । जें लक्षूं जातां लक्षवेना ।
तेंचि अनुभवें आणी मना । या नांव साधक ।१९।

जेथें मनचि मावळे । जेथें तर्कचि पांगुळे ।
तेंचि अनुभवा आणी बळें । या नांव साधक ।२०।

स्वानुभवाचेनि योगें । वस्तु साधी लागवेगें ।
तेंचि वस्तु होये आंगें । या नांव साधक ।२१।

अनुभवाचीं आंगें जाणें । योगियांचे खुणे बाणे ।
कांहींच नहोन असणें । या नांव साधक ।२२।

परती सारून उपाधी । असाध्य वस्तु साधनें साधी ।
स्वरूपीं करी दृढ बुद्धी । या नांव साधक ।२३।

देवाभक्ताचें मूळ । शोधून पाहे सकळ ।
साध्यचि होये तत्काळ । या नांव साधक ।२४।

विवेकबळें गुप्त जाला । आपेंआप मावळला ।
दिसतो परी देखिला । नाहींच कोणी ।२५।

मीपण मागें सांडिलें । स्वयें आपणास धुंडिलें ।
तुर्येसहि वोलांडिलें । या नांव साधक ।२६।

पुढें उन्मनीचा सेवटीं । आपली आपण अखंड भेटी ।
अखंड अनुभवीं ज्याची दृष्टी । या नांव साधक ।२७।

द्वैताचा तटका तोडिला । भासाचा भास मोडिला ।
देहीं असोनि विदेह जाला । या नांव साधक ।२८।

जयास अखंड स्वरूपस्थिती । नाहीं देहाची अहंकृती ।
सकळ संदेहनिवृत्ती । या नांव साधक ।२९।

पंचभूतांचा विस्तार । जयासि वाटे स्वप्नाकार ।
निर्गुणीं जयाचा निर्धार । या नांव साधक ।३०।

स्वप्नीं भये जें वाटलें । तें जागृतीस नाहीं आलें ।
सकळ मिथ्या निर्धारिलें । या नांव साधक ।३१।

मायेचें जें प्रत्यक्षपण । जनास वाटे हें प्रमाण ।
स्वानुभवें अप्रमाण । साधकें केलें ।३२।

निद्रा सांडूनि चेइरा जाला । तो स्वप्नभयापासून सुटला ।
माया सांडून तैसा गेला । साधक स्वरूपीं ।३३।

ऐसी अंतरस्थिती बाणली । बाह्य निस्पृहता अवलंबिली ।
संसारउपाधी त्यागिली । या नांव साधक ।३४।

कामापासून सुटला । क्रोधापासूनि पळाला ।
मद मत्सर सांडिला । येकीकडे ।३५।

कुळाभिमानासी सांडिलें । लोकलाजेस लाजविलें ।
परमार्थास माजविलें । विरक्तिबळें ।३६।

अविद्येपासून फडकला । प्रपंचापासून निष्टला ।
लोभाचे हातींचा गेला । अकस्मात ।३७।

थोरपणासि पाडिलें । वैभवासि लिथाडिलें ।
महत्त्वासि झिंजाडिलें । विरक्तिबळें ।३८।

भेदाचा मडघा मोडिला । अहंकार सोडून पाडिला ।
पाईं धरून आपटिला । संदेहशत्रु ।३९।

विकल्पाचा केला वधु । थापें मारिला भवसिंधू ।
सकळ भूतांचा विरोधु । तोडून टाकिला ।४०।

भवभयासी भडकाविलें । काळाचें टांगें मोडिलें ।
मस्तक हाणोनि फोडिलें । जन्ममृत्याचें ।४१।

देहसमंधावरी लोटला । संकल्पावरी उठवला ।
कल्पनेचा घात केला । अकस्मात ।४२।

अपधाकासि ताडिलें । लिंगदेहासि विभांडिलें ।
पाषांडास पछ्याडिलें । विवेकबळें ।४३।

गर्वावरी गर्व केला । स्वार्थ अनर्थीं घातला ।
अनर्थ तोहि निर्दाळिला । नीतिन्यायें ।४४।

मोहासी मर्धेचि तोडिलें । दुःखासि दुःधडचि केलें ।
शोकास खंडून सांडिलें । येकिकडे ।४५।

द्वेष केला देशधडी । अभावाची घेतली नरडी ।
धाकें उदर तडाडी । कुतर्काचें ।४६।

ज्ञानें विवेक माजला । तेणें निश्चयो बळावला ।
अवगुणाचा संव्हार केला । वैराग्यबळें ।४७।

अधर्मास स्वधर्में लुटिलें । कुकर्मासि सत्कर्में झुगटिलें ।
लांटून वाटा लाविलें । विचारें अविचारासी ।४८।

तिरस्कार तो चिरडिला । द्वेष खिरडूनि सांडिला ।
विषाद अविषादें घातला । पायांतळीं ।४९।

कोपावरी घालणें घातलें । कापट्य अंतरी कुटिलें ।
सख्य आपुलें मानिलें । विश्वजनीं ।५०।

प्रवृत्तीचा केला त्याग । सुहृदाचा सोडिला संग ।
निवृत्तिपथें ज्ञानयोग । साधिता जाला ।५१।

विषयेमैंदास सिंतरिलें । कुविद्येसि वेढा लाविलें ।
आपणास सोडविलें । आप्ततश्करापासुनी ।५२।

पराधेनतेवरी कोपला । ममतेवरी संतापला ।
दुराशेचा त्याग केला । येकायेकी ।५३।

स्वरूपीं घातलें मना । यातनेसि केली यातना ।
साक्षेप आणि प्रेत्ना । प्रतिष्ठिलें ।५४।

अभ्यासाचा संग धरिला । साक्षपासरिसा निघाला ।
प्रेत्न सांगाती भला । साधनपंथें ।५५।

सावध दक्ष तो साधक । पाहे नित्यानित्यविवेक ।
संग त्यागूनि येक । सत्संग धरी ।५६।
बळेंचि सारिला संसार । विवेकें टाकिला जोजार ।
शुद्धाचारें अनाचार । भ्रष्टविला ।५७।
विसरास विसरला । आळसाचा आळस केला ।
सावध नाहीं दुश्चित्त जाला । दुश्चित्तपणासी ।५८।
आतां असो हें बोलणें । अवगुण सांडी निरूपणें ।
तो साधक ऐसा येणें प्रमाणें । बुझावा ।५९।
बळेंचि अवघा त्याग कीजे । म्हणौनि साधक बोलिजे ।
आतां सिद्ध तो जाणिजे । पुढिले समासीं ।६०।
येथें संशय उठिला । निस्पृह तोचि साधक जाला ।
त्याग न घडे संसारिकाला । तरी तो साधक नव्हे कीं ।६१।
ऐसें श्रोतयांचें उत्तर । याचें कैसें प्रत्योत्तर ।
पुढिले समासीं तत्पर । होऊन ऐका ।६२।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'साधकलक्षणनाम'
समास नववा समाप्त.

❑❑

दशक ५ : समास १०

सिद्धलक्षण

॥ श्रीराम ॥

मागें बोलिला संसारिक । त्यागेंविण नव्हे कीं साधक ।
ऐका हो याचा विवेक । ऐसा असे ।१।

सन्मार्ग तो जीवीं धरणें । अनमार्गाचा त्याग करणें ।
संसारिकां त्याग येणें । प्रकारें ऐसा । २ ।

कुबुद्धित्यागोंविण कांहीं । सुबुद्धि लागणार नाहीं ।
संसारिकां त्याग पाहीं । ऐसा असे । ३ ।

प्रपंचीं वीट मानिला । मनें विषयेत्याग केला ।
तरीच पुढें आवलंबिला । परमार्थमार्ग । ४ ।

त्याग घडे अभावाचा । त्याग घडे संशयाचा ।
त्याग घडे अज्ञानाचा । शनै शनै । ५ ।

ऐसा सूक्ष्म अंतर्त्याग । उभयांस घडे सांग ।
निस्पृहास बाह्यत्याग । विशेष आहे । ६ ।

संसारिकां ठाईं ठाईं । बाह्यत्याग घडे कांहीं ।
नित्यनेम श्रवण नाहीं । त्यागोंविण । ७ ।

फिटली आशंका स्वभावें । त्यागोंविण साधक नव्हे ।
पुढें कथेचा अन्वये । सावध ऐका । ८ ।

मागां जालें निरूपण । साधकाची वोळखण ।
आतां सांगिजेल खूण । सिद्धलक्षणाची । ९ ।

साधु वस्तु होऊन ठेला । संशय ब्रह्मांडाबाहेरि गेला ।
निश्चये चळेना ऐसा जाला । या नांव सिद्ध । १० ।

बद्धपणाचें अवगुण । मुमुक्षपणीं नाहीं जाण ।
मुमुक्षपणाचें लक्षण । साधकपणीं नाहीं । ११ ।

साधकासि संदेहवृत्ती । पुढें होतसे निवृत्ती ।
याकारणें निःसंदेह श्रोतीं । साधु वोळखावा । १२ ।

संशयरहित ज्ञान । तेंचि साधूचें लक्षण ।
सिद्धाआंगीं संशय हीन । लागेल कैसा । १३ ।

कर्ममार्ग संशयें भरला । साधनीं संशयें कालवला ।
सर्वांमधें संशयें भरला । साधु तो निःसंदेह ।१४।

संशयाचें ज्ञान खोटें । संशयाचें वैराग्य पोरटें ।
संशयाचें भजन वोखटें । निर्फळ होये ।१५।

वेर्थ संशयाचा देव । वेर्थ संशयाचा भाव ।
वेर्थ संशयाचा स्वभाव । सर्व कांहीं ।१६।

वेर्थ संशयाचें व्रत । वेर्थ संशयाचें तीर्थ ।
वेर्थ संशयाचा परमार्थ । निश्चयेंविण ।१७।

वेर्थ संशयाची भक्ती । वेर्थ संशयाची प्रीती ।
वेर्थ संशयाची संगती । संशयो वाढवी ।१८।

वेर्थ संशयाचें जिणें । वेर्थ संशयाचें धरणें ।
वेर्थ संशयाचें करणें । सर्व कांहीं ।१९।

वेर्थ संशयाची पोथी । वेर्थ संशयाची वित्पत्ती ।
वेर्थ संशयाची गती । निश्चयेंविण ।२०।

वेर्थ संशयाचा दक्ष । वेर्थ संशयाचा पक्ष ।
वेर्थ संशयाचा मोक्ष । होणार नाहीं ।२१।

वेर्थ संशयाचा संत । वेर्थ संशयाचा पंडित ।
वेर्थ संशयाचा बहुश्रुत । निश्चयेंविण ।२२।

वेर्थ संशयाची श्रेष्ठता । वेर्थ संशयाची वित्पन्नता ।
वेर्थ संशयाचा ज्ञाता । निश्चयेंविण ।२३।

निश्चयेंविण सर्व काहीं । अणुमात्र तें प्रमाण नाहीं ।
वेर्थचि पडिलें प्रवाहीं । संदेहाचे ।२४।

निश्चयेंविण जें बोलणें । तें अवघेंचि कंटाळवाणें ।
बाष्कळ बोलिजे वाचाळपणें । निरार्थक ।२५।

असो निश्चयेंविण जे वल्गना । ते अवघीच विटंबना ।
संशयें कांहीं समाधाना । उरी नाहीं ।।२६।।

म्हणोनि संदेहरहित ज्ञान । निश्चयाचें समाधान ।
तेंचि सिद्धांचें लक्षण । निश्चयेंसीं ।।२७।।

तंव श्रोता करी प्रश्न । निश्चय करावा कवण ।
मुख्य निश्चयाचें लक्षण । मज निरोपावें ।।२८।।

ऐक निश्चय तो ऐसा । मुख्य देव आहे कैसा ।
नाना देवाचा वळसा । करूंचि नये ।।२९।।

जेणें निर्मिलें सचराचर । त्याचा करावा विचार ।
शुद्ध विवेकें परमेश्वर । वोळखावा ।।३०।।

मुख्य देव तो कवण । भक्ताचें कैसें लक्षण ।
असत्य सांडून वोळखण । सत्याची धरावी ।।३१।।

आपल्या देवास वोळखावें । मग मी कोण हें पाहावें ।
संग त्यागून राहावें । वस्तुरूप ।।३२।।

तोडावा बंधनाचा संशयो । करावा मोक्षाचा निश्चयो ।
पाहावा भूतांचा अन्वयो । वितिरेकेंसीं ।।३३।।

पूर्वपक्षेंसिं सिद्धांत । पाहावा प्रकृतीचा अंत ।
मग पावावा निवांत । निश्चय देवाचा ।।३४।।

देहाचेनि योगें संशयो । करी समाधानाचा क्षयो ।
चळों नेदावा निश्चयो । आत्मत्वाचा ।।३५।।

सिद्ध असतां आत्मज्ञान । संदेह वाढवी देहाभिमान ।
याकारणें समाधान । आत्मनिश्चयें राखावें ।।३६।।

आठवतां देहबुद्धी । उडे विवेकाची शुद्धी ।
याकारणें आत्मबुद्धि । सदृढ करावी ।।३७।।

आत्मबुद्धि निश्चयाची । तेचि दशा मोक्षश्रीची ।
अहमात्मा हें कधींचि । विसरों नये ।३८।
निरोपिलें निश्चयाचें लक्षण । परी हें न कळे सत्संगेंविण ।
संतांसि गेलियां शरण । संशये तुटती ।३९।
आतां असो हें बोलणें । ऐका सिद्धांचीं लक्षणें ।
मुख्य निःसंदेहपणें । सिद्ध बोलिजे ।४०।
सिद्धस्वरूपीं नाहीं देहो । तेथें कैंचा हो संदेहो ।
याकारणें सिद्ध पाहो । निःसंदेही ।४१।
देहसमंधाचेनि गुणें । लक्ष्णासि काये उणें ।
देहातीताची लक्षणें । काये म्हणोनि सांगावी ।४२।
जें लक्षवेना चक्षूसी । त्याचीं लक्षणें सांगावीं कैसीं ।
निर्मळ वस्तु सिद्ध त्यासी । लक्षणें कैसीं ।४३।
लक्षणें म्हणिजे केवळ गुण । वस्तु ठाईची निर्गुण ।
तेंचि सिद्धांचें लक्षण । वस्तुरूप ।४४।
तथापि ज्ञानदशकीं बोलिलें । म्हणौनि वग्तृत्व आटोपिलें ।
न्यूनपूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ।४५।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सिद्धलक्षणनाम'
समास दहावा समाप्त.

❑❑

दशक पाचवा समाप्त

❑❑

दशक सहावा : देवशोधन

दशक ६ : समास १

देवशोधन

॥ श्रीराम ॥

चित्त सुचित करावें । बोलिलें तें जीवीं धरावें ।
सावध होऊन बैसावें । निमिष्य येक । १ ।

कोणी येके ग्रामीं अथवा देसीं । राहाणें आहे आपणासी ।
न भेटतां तेथिल्या प्रभूसी । सौख्य कैंचें । २ ।

म्हणोनि ज्यास जेथें राहाणें । तेणें त्या प्रभूची भेटीं घेणें ।
म्हणिजे होये श्लाघ्यवाणें । सर्व कांहीं । ३ ।

प्रभुची भेटी न घेतां । तेथें कैंची मान्यता ।
आपुलें महत्व जाता । वेळ नाहीं । ४ ।

म्हणौनि रायापासूनि रंक । कोणी तरी येक नायेक ।
त्यास भेटणें हा विवेक । विवेकी जाणती । ५ ।

त्यास न भेटतां त्याचे नगरीं । राहतां धरितील बेगारी ।
तेथें न करितां चोरी । आंगीं लागे । ६ ।

याकारणें जो शाहाणा । तेणें प्रभुसी भेटावें जाणा ।
ऐसें न करितां दैन्यवाणा । संसार त्याचा । ७ ।

ग्रामीं थोर ग्रामाधिपती । त्याहूनि थोर देशाधिपती ।
देशाधिपतीहूनि नृपती । थोर जाणावा । ८ ।

राष्ट्राचा प्रभु तो राजा । बहुराष्ट्र तो माहाराजा ।
माहाराजांचाहि राजा । तो चक्रवती । ९ ।

येक नरपति येक गजपती । येक हयपति येक भूपती ।
सकळांमध्ये चक्रवती । थोर राजा ।१०।

असो ऐसियां समस्तां । येक ब्रह्मा निर्माणकर्ता ।
त्या ब्रह्मयासहि निर्मिता । कोण आहे ।११।

ब्रह्मा विष्णु आणि हर । त्यांसी निर्मिता तोचि थोर ।
तो वोळखावा परमेश्वर । नाना येत्नें ।१२।

तो देव ठाईं पडेना । तरी येमयातना चुकेना ।
ब्रह्मांडनायेक चोजवेना । हें बरें नव्हे ।१३।

जेणें संसारीं घातलें । आवघें ब्रह्मांड निर्माण केलें ।
त्यासी नाहीं वोळखिलें । तोचि पतित ।१४।

म्हणोनि देव वोळखावा । जन्म सार्थकचि करावा ।
न कळे तरी सत्संग धरावा । म्हणिजे कळे ।१५।

जो जाणेल भगवंत । तया नांव बोलिजे संत ।
जो शाश्वत आणि अशाश्वत । निवाडा करी ।१६।

चळेना ढळेना देव । ऐसा ज्याचा अंतर्भाव ।
तोचि जाणिजे माहानुभाव । संत साधु ।१७।

जो जनामधें वागे । परि जनांवेगळी गोष्ट सांगे ।
ज्याचे अंतरीं ज्ञान जागे । तोचि साधु ।१८।

जाणिजे परमात्मा निर्गुण । त्यासीच म्हणावें ज्ञान ।
त्यावेगळें तें अज्ञान । सर्वकांहीं ।१९।

पोट भराव्याकारणें । नाना विद्या अभ्यास करणें ।
त्यासीं ज्ञान म्हणती परी तेणें । सार्थक नव्हे ।२०।

देव वोळखावा येक । तेंचि ज्ञान तें सार्थक ।
येर आवघेंचि निरार्थक । पोटविद्या ।२१।

जन्मवरी पोट भरिलें । देहाचें संरक्षण केलें ।
पुढें अवघेंचि वेर्थ गेलें । अंतकाळीं ।२२।

येवं पोट भराव्याची विद्या । तयेसी म्हणों नये सद्विद्या ।
सर्वव्यापक वस्तु सद्या । पाविजे तें ज्ञान ।२३।

ऐसें जयापासीं ज्ञान । तोचि जाणावा सज्जन ।
तयापासीं समाधान । पुसिलें पाहिजे ।२४।

अज्ञानास भेटतां अज्ञान । तेथें कैंचें सांपडेल ज्ञान ।
करंट्यास करंट्याचें दर्शन । होतां भाग्य कैंचें ।२५।

रोग्यापासीं रोगी गेला । तेथें कैंचें आरोग्य त्याला ।
निर्बळापासीं निर्बळाला । पाठी कैंची ।२६।

पिशाच्यापासीं पिशाच्य गेलें । तेथें कोण सार्थक जालें ।
उन्मत्तास उन्मत्त भेटलें । त्यास उमजवी कवणु ।२७।

भिकाऱ्यापासीं मागतां भिक्षा । दीक्षाहीनापासीं दीक्षा ।
उजेड पाहातां कृष्णपक्षा । पाविजे कैंचा ।२८।

अबद्धापासीं गेला अबद्ध । तो कैसेनि होईल सुबद्ध ।
बद्धास भेटतां बद्ध । सिद्ध नव्हे ।२९।

देहापासीं गेला देही । तो कैसेनि होईल विदेही ।
म्हणौनि ज्ञात्यावांचून नाहीं । ज्ञानमार्ग ।३०।

याकारणें ज्ञाता पाहावा । त्याचा अनुग्रह घ्यावा ।
सारासारविचारें जीवा । मोक्ष प्राप्त ।३१।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'देवशोधननाम'
समास पहिला समाप्त.

❑❑

दशक ६ : समास २

ब्रह्मपावननिरूपण

॥ श्रीराम ॥

ऐका उपदेशाचीं लक्षणें । सायोज्यप्राप्ती होय जेणें ।
नाना मतांचें पेखणें । कामा नये सर्वथा । १ ।

ब्रह्मज्ञानेंविण उपदेश । तो म्हणों नये विशेष ।
धान्येंविण जैसें भूंस । खातां नये । २ ।

नाना कबाड बडविलें । नातरी तक्रचि गुसळिलें ।
अथवा धुणचि सेविलें । सावकास । ३ ।

नाना साली भक्षिल्या । अथवा चोइट्या चोखिल्या ।
खोबरें सांडून खादल्या । नरोट्या जैशा । ४ ।

तैसें ब्रह्मज्ञानेंविण । नाना उपदेशाचा सिण ।
सार सांडून असार कोण । शाहाणा सेवी । ५ ।

आतां ब्रह्म जें कां निर्गुण । तेंचि केलें निरूपण ।
सुचित करावें अंतःकर्ण । श्रोतेजनीं । ६ ।

सकळ सृष्टीची रचना । ते हे पंचभूतिक जाणा ।
परंतु हे तगेना । सर्वकाळ । ७ ।

आदिअंतीं ब्रह्म निर्गुण । तेचि शाश्वताची खूण ।
येर पंचभूतिक जाण । नासिवंत । ८ ।

येऱ्हवीं हें पाहातां भूतें । देव कैसें म्हणावें त्यातें ।
भूत म्हणतां मनुष्यातें । विषाद वाटे । ९ ।

मां तो जगज्जनक परमात्मा । त्यास आणि भूतउपमा ।
ज्याची कळेना महिमां । ब्रह्मादिकांसी । १० ।

भूतां ऐसा जगदीश । म्हणतां उत्पन्न होतो दोष ।
याकारणें माहापुरुष । सर्व जाणती ।११।

पृथ्वी आप तेज वायो आकाश । यां सबाह्य जगदीश ।
पंचभूतांसी आहे नाश । आत्मा अविनाशरूपी ।१२।

जें जें रूप आणी नाम । तो तो आवघाचि भ्रम ।
नामरूपातीत वर्म । अनुभवें जाणावें ।१३।

पंचभूतें आणी त्रिगुण । ऐशी अष्टधा प्रकृति जाण ।
अष्टधाप्रकृतीस नामाभिधान । दृश्य ऐसें ।१४।

तें हें दृश्य नासिवंत । ऐसें वेद श्रुति बोलत ।
निर्गुण ब्रह्म शाश्वत । जाणती ज्ञानी ।१५।

जें शस्त्रें तोडितां तुटेना । जें पावकें जाळितां जळेना ।
कालवितां कालवेना । आपेंकरूनी ।१६।

जें वायोचेनि उडेना । जें पडेना ना झडेना ।
जें घडेना ना दडेना । परब्रह्म तें ।१७।

ज्यासी वर्णाचि नसे । जें सर्वाहूनि अनारिसें ।
परंतु असतचि असे । सर्वकाळ ।१८।

दिसेना तरी काये जालें । परंतु तें सर्वत्र संचलें ।
सूक्ष्मचि कोंदाटलें । जेथें तेथें ।१९।

दृष्टीस लागली सवे । जें दिसेल तेंचि पाहावें ।
परंतु गुज तें जाणावें । गोप्य आहे ।२०।

प्रगट तें जाणावें असार । आणी गुप्त तें जाणावें सार ।
गुरुमुखें हा विचार । उमजों लागे ।२१।

जें उमजेना तें उमजावें । जें दिसेना तें पाहावें ।
जें कळेना तें जाणावें । विवेकबळें ।२२।

गुप्त तेंचि प्रगटवावें । असाध्य तेंचि साधावें ।
कानडेंचि अभ्यासावें । सावकास ।२३।
वेद विरंची आणि शेष । जेथें सिणले निशेष ।
तेंचि साधावें विशेष । परब्रह्म तें ।२४।
तरीं तें कोणेपरी साधावें । तेंचि बोलिलें स्वभावें ।
अध्यात्मश्रवणें पावावें । परब्रह्म तें ।२५।
पृथ्वी नव्हे आप नव्हे । तेज नव्हे वायु नव्हे ।
वर्णवेक्त ऐसें नव्हे । अव्यक्त तें ।२६।
तयास म्हणावें देव । वरकड लोकांचा स्वभाव ।
जितुके गांव तितुके देव । जनाकारणें ।२७।
ऐसा देवाचा निश्चयो जाला । देव निर्गुण प्रत्यया आला ।
आतां आपणचि आपला । शोध घ्यावा ।२८।
माझें शरीर ऐसें म्हणतो । तरी तो जाण देहावेगळाचि तो ।
मन माझें ऐसें जाणतो । तरी तो मनहि नव्हे ।२९।
पाहातां देहाचा विचार । अवघा तत्वांचा विस्तार ।
तत्वें तत्व झाडितां सार । आत्माच उरे ।३०।
आपणासी ठावचि नाहीं । येथें पाहाणें नलगे कांहीं ।
तत्वें ठाईंचा ठाईं । विभागून गेलीं ।३१।
बांधली आहे तों गांठोडी । जो कोणी विचारें सोडी।
विचार पाहातां ही गांठोडी । आडळेना ।३२।
तत्वांचें गांठोडें शरीर । याचा पाहातां विचार ।
येक आत्मा निरंतर । आपण नाहीं ।३३।
आपणासी ठावचि नाहीं । जन्ममृत्यु कैंचें काई ।
पाहातां वस्तुचा ठाईं । पापपुण्य नसे ।३४।
पापपुण्य येमयातना । हे निर्गुणीं तों असेना ।
आपण तोचि तरी जन्ममरणा । ठाव कैंचा ।३५।

देहेबुद्धीनें बांधला । तो विवेकें मोकळा केला ।
देहातीत होतां पावला । मोक्षपद ।३६।
जालें जन्माचें सार्थक । निर्गुण आत्मा आपण येक ।
परंतु हा विवेक । पाहिलाच पाहावा ।३७।
जागें होतां स्वप्न सरे । विवेक पाहातां दृश्य वोसरे ।
स्वरूपानुसंधानें तरे । प्राणीमात्र ।३८।
आपणास निवेदावें । आपण विवेकें नुरावें ।
आत्मनिवेदन जाणावें । याचें नांव ।३९।
आधीं अध्यात्मश्रवण । मग सद्गुरुपादसेवन ।
पुढें आत्मनिवेदन । सद्गुरुप्रसादें ।४०।
आत्मनिवेदना उपरी । निखळ वस्तु निरंतरी ।
आपण आत्मा अंतरीं । बोध जाला ।४१।
त्या ब्रह्मबोधें ब्रह्मचि जाला । संसारखेद तो उडाला ।
देहो प्रारब्धीं टाकिला । सावकास ।४२।
यासी म्हणिजे आत्मज्ञान । येणें पाविजे समाधान ।
परब्रह्मीं अभिन्न । भक्तचि जाला ।४३।
आतां होणार तें होयेना कां । आणि जाणार तें जायेना कां ।
तुटली मनांतील आशंका । जन्ममृत्याची ।४४।
संसारीं पुंडावें चुकलें । देवां भक्तां ऐक्य जालें ।
मुख्य देवास वोळखिलें । सत्संगेंकरूनी ।४५।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'ब्रह्मपाविननिरूपणनाम'
समास दुसरा समाप्त.

❑❑

दशक ६ : समास ३

मायोद्भव

॥ श्रीराम ॥

निर्गुण आत्मा तो निर्मळ । जैसें आकाश अंतराळ ।
घनदाट निर्मळ निश्चळ । सदोदित । १ ।

जें खंडलेंचि नाहीं अखंड । जें उदंडाहूनि उदंड ।
जें गगनाहूनि वाड । आणि सूक्ष्म । २ ।

जें दिसेना ना भासेना । जें उपजेना ना नासेना ।
जें येयना ना जायना । परब्रह्म तें । ३ ।

जें चळेना ना ढळेना । जें तुटेना ना फुटेना ।
जें रचेना ना खचेना । परब्रह्म तें । ४ ।

जें सन्मुखचि सर्वकाळ । जें निःकळंक आणि निखळ ।
सर्वांतर आकाशपाताळ । व्यापूनि असे । ५ ।

अविनाश तें ब्रह्म निर्गुण । नासे ते माया सगुण ।
सगुण आणि निर्गुण । कालवलें । ६ ।

या कर्दमाचा विचार । करूं जाणती योगेश्वर ।
जैसें क्षीर आणि नीर । राजहंस निवडिती । ७ ।

जड सबळ पंचभूतिक । त्यामध्यें आत्मा व्यापक ।
तो नित्यानित्यविवेक । पाहातां कळे । ८ ।

उसांमध्यें घेईजे रस । येर तें सांडिजे बाकस ।
तैसा जगामध्यें जगदीश । विवेकें वोळखावा । ९ ।

रस नासिवंत पातळ । आत्मा शाश्वत निश्चळ ।
रस अपूर्ण आत्मा केवळ । परिपूर्ण जाणावा । १० ।

आत्म्यासारिखें येक असावें । मां तें दृष्टांतासि द्यावें ।
दृष्टांतमिसें समजावें । कैसें तरी ।।११।।

ऐसी आत्मस्थिती संचली । तेथें माया कैसी जाली ।
जैसी आकाशीं वाहिली । झुळुक वायोची ।।१२।।

वायोपासूनि तेज जालें । तेजापासूनि आप निपजलें ।
आपापासूनि आकारलें । भूमंडळ ।।१३।।

भूमंडळापासूनि उत्पत्ती । जीव नेणों जाले किती ।
परंतु ब्रह्म आदिअंतीं । व्यापूनि आहे ।।१४।।

जें जें काहीं निर्माण जालें । तें तें अवघेंचि नासलें ।
परी मुळीं ब्रह्म तें संचलें । जैसें तैसें ।।१५।।

घटापूर्वी आकाश असे । घटामधें आकाश भासे ।
घट फुटतां न नासे । आकाश जैसें ।।१६।।

तैसें परब्रह्म केवळ । अचळ आणि अढळ ।
मधें होत जात सकळ । सचराचर ।।१७।।

जें जें कांहीं निर्माण जालें । तें तें आधींच ब्रह्मीं व्यापिलें ।
सर्व नाशतां उरलें । अविनाश ब्रह्म ।।१८।।

ऐसें ब्रह्म अविनाश । तेंचि सेविती ज्ञाते पुरुष ।
तत्वनिर्शनें आपणास । आपण लाभे ।।१९।।

तत्वें तत्व मेळविलें । त्यासी देह हें नाम ठेविलें ।
तें जाणते पुरुषीं शोधिलें । तत्वें तत्व ।।२०।।

तत्वझाडा निशेष होतां । तेथें निमाली देहअहंता ।
निर्गुण ब्रह्मीं ऐक्यता । विवेकें जाली ।।२१।।

विवेकें देहाकडे पाहिलें । तों तत्वें तत्व वोसरलें ।
आपण कांहीं नाहीं आलें । प्रत्ययासी ।।२२।।

आपला आपण शोध घेतां । आपली तों माईक वार्ता ।
तत्वांतीं उरलें तत्वता । निर्गुण ब्रह्म ।२३।

आपणाविण निर्गुण ब्रह्म । हेंचि निवेदनाचें वर्म ।
तत्वासरिसा गेला भ्रम । मीतूंपणाचा ।२४।

मी पाहातां आडळेना । निर्गुण ब्रह्म तें चळेना ।
आपण तेंचि परी कळेना । सद्‌गुरुविण ।२५।

सारासार अवघें शोधिलें । तों असार तें निघोन गेलें ।
पुढें सार तें उरलें । निर्गुण ब्रह्म ।२६।

आधीं ब्रह्म निरोपिलें । तेंचि सकळांमध्यें व्यापलें ।
सकळ आवघेंचि नासलें । उरलें तें केवळ ब्रह्म ।२७।

होतां विवेकें संव्हार । तेथें निवडे सारासार ।
आपला आपणासि विचार । ठाईं पडे ।२८।

आपण कल्पिलें मीपण । मीपण शोधितां नुरे जाण ।
मीपण गेलियां निर्गुण । आत्मा स्वयें ।२९।

जालियां तत्वाचें निर्शन । निर्गुण आत्मा तोचि आपण ।
कां दाखवावें मीपण । तत्वनिर्शनाउपरी ।३०।

तत्वांमध्यें मीपण गेलें । तरी निर्गुण सहजचि उरलें ।
सोहंभावें प्रत्यया आलें । आत्मनिवेदन ।३१।

आत्मनिवेदन होतां । देवाभक्तांसी ऐक्यता ।
साचार भक्त विभक्तता । सांडूनि जाला ।३२।

निर्गुणासी नाहीं जन्ममरण । निर्गुणासी नाहीं पापपुण्य ।
निर्गुणीं अनन्य होतां आपण । मुक्त जाला ।३३।

तत्वीं वेटाळून घेतला । प्राणी संशयें गुंडाळला ।
आपणासी आपण भुलला । कोहं म्हणे ।३४।

तत्वीं गुंतला म्हणे कोहं । विवेक पाहातां म्हणे सोहं ।
अनन्य होतां अहं सोहं । मावळलीं ।३५।
याउपरी उर्वरित । तेंचि स्वरूप संत ।
देहीं असोनि देहातीत । जाणिजे ऐसा ।३६।
संदेहवृत्ति ते न भंगे । म्हणोनि बोलिलेंचि बोलावें लागे ।
आम्हासी हें घडलें प्रसंगें । श्रोतीं क्ष्मा करावें ।३७।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'मायोद्भवनाम'
समास तिसरा समाप्त.

❑❑

दशक ६ : समास ४

ब्रह्मनिरूपण

॥ श्रीराम ॥

कृतायुग सत्रा लक्ष अठाविस सहस्र । त्रेतायुग बारा लक्ष शाहाणौ सहस्र ।
द्वापार आठ लक्ष चौसष्टी सहस्र । आतां कलयुग ऐका । १ ।
कलयुग च्यारि लक्ष बतीस सहस्र । च्यतुर्युगें त्रेताळिस लक्ष वीस सहस्र ।
ऐसीं च्यतुर्युगें सहस्र । तो ब्रह्मयाचा येक दिवस । २ ।
ऐसे ब्रह्मे सहस्र देखा । तेव्हां विष्णूची येक घटिका ।
विष्णु सहस्र होतां ऐका । पळ येक ईश्वराचें । ३ ।
ईश्वर जाये सहस्र वेळ । तें शक्तीचें अर्ध पळ ।
ऐसी संख्या बोलिली सकळ । शास्त्रांतरीं । ४ ।

चतुर्युगसहस्राणि दिनमेकं पितामहम् ।
पितामहसहस्राणि विष्णोर्घटिकमेव च ॥

विष्णोरेकसहस्राणि पलमेकं महेश्वरम्।
महेश्वरसहस्राणि शक्तेरर्धं पलं भवेत्॥

ऐशा अनंत शक्ती होती । अनंत रचना होति जाती ।
तरी अखंड खंडेना स्थिती । परब्रह्माची ।५।

परब्रह्मासी कैंची स्थिती । परी हे बोलावयाची रिती ।
वेदश्रुती नेति नेति । परब्रह्मीं ।६।

च्यारि सहस्र सातसें साठीं । इतुकी कलयुगाची राहाटी ।
उरल्या कलयुगाची गोष्टी । ऐसी असे ।७।

च्यारि लक्ष सत्ताविस सहस्र । दोनिसें चाळीस संवछर ।
पुढें अन्योविण्य वर्णसंकर । होणार आहे ।८।

ऐसें रचलें सचराचर । येथें येकाहूनि येक थोर ।
पाहतां येथीचा विचार । अंत न लगे ।९।

येक म्हणती विष्णु थोर । येक म्हणती रुद्र थोर ।
येक म्हणती शक्ति थोर । सकळांमध्यें ।१०।

ऐसें आपुलालेपरी बोलती । परंतु अवघेंचि नासेल कल्पांतीं ।
यदृष्टं तं नष्टं हे श्रुती । बोलतसे ।११।

आपुलाली उपासना । अभिमान लागला जना ।
याचा निश्चयो निवडेना । साधुविण ।१२।

साधु निश्चय करिती येक । आत्मा सर्वत्र व्यापक ।
येर हें अवघेंचि माईक । सचराचर ।१३।

चित्रीं लिहिली सेना । त्यांत कोण थोर कोण साना ।
हें तुम्ही विचाराना । आपुले ठाईं ।१४।

स्वप्नीं उदंड देखिलें । लहानथोरहि कल्पिलें ।
परंतु जागें जालियां जालें । कैसें पाहा ।१५।

पाहातां जागृतीचा विचार । कोण लाहान कोण थोर ।
जाला अवघाचि विस्तार । स्वप्नरचनेचा ।१६।

अवघाचि माईक विचार । कैंचें लाहान कैंचें थोर ।
लाहानथोराचा निर्धार । जाणती ज्ञानी ।१७।

जो जन्मासी येऊन गेला । तो मी थोर म्हणतांच मेला ।
परी याचा विचार पाहिला । पाहिजे श्रेष्ठीं ।१८।

जयांसि जालें आत्मज्ञान । तेचि थोर माहाजन ।
वेद शास्त्रें पुराण । साधु संत बोलिले ।१९।

एवं सकळांमध्यें थोर । तो येकची परमेश्वर ।
तयांमधें हरिहर । होति जाती ।२०।

तो निर्गुण निराकार । तेथें नाहीं उत्पत्ती विस्तार ।
स्थानमानाचा विचार । ऐलिकडे ।२१।

नांवरूप स्थानमान । हा तों आवघाचि अनुमान ।
तथापी होईल निदान । ब्रह्मप्रळई ।२२।

ब्रह्म प्रळयावेगळें । ब्रह्म नावरूपानिराळें ।
ब्रह्म कोणी येकाकाळें । जैसें तैसें ।२३।

करिती ब्रह्मनिरूपण । जाणती ब्रह्म संपूर्ण ।
तेचि जाणावे ब्राह्मण । ब्रह्मविद ।२४।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'ब्रह्मनिरूपणनाम'
समास चौथा समाप्त.

❑❑

दशक ६ : समास ५

मायाब्रह्मनिरूपण

॥ श्रीराम ॥

श्रोते पुसती ऐसें । माया ब्रह्म तें कैसें ।
श्रोत्यां वक्तयांच्या मिसें । निरूपण ऐका । १ ।

ब्रह्म निर्गुण निराकार । माया सगुण साकार ।
ब्रह्मासि नाहीं पारावार । मायेसि आहे । २ ।

ब्रह्म निर्मळ निश्चळ । माया चंचळ चपळ ।
ब्रह्म निरोपाधी केवळ । माया उपाधिरूपी । ३ ।

माया दिसे ब्रह्म दिसेना । माया भासे ब्रह्म भासेना ।
माया नासे ब्रह्म नासेना । कल्पांतकाळीं । ४ ।

माया रचे ब्रह्म रचेना । माया खचे ब्रह्म खचेना ।
माया रुचे ब्रह्म रुचेना । अज्ञानासी । ५ ।

माया उपजे ब्रह्म उपजेना । माया मरे ब्रह्म मरेना ।
माया धरे ब्रह्म धरेना । धारणेसी । ६ ।

माया फुटे ब्रह्म फुटेना । माया तुटे ब्रह्म तुटेना ।
माया विटे ब्रह्म विटेना । अविनाश तें । ७ ।

माया विकारी ब्रह्म निर्विकारी । माया सर्व करी ब्रह्म कांहींच न करी ।
माया नाना रूपें धरी । ब्रह्म तें अरूप । ८ ।

माया पंचभूतिक अनेक । ब्रह्म तें शाश्वत येक ।
मायाब्रह्मांचा विवेक । विवेकी जाणती । ९ ।

माया लाहान ब्रह्म थोर । माया असार ब्रह्म सार ।
माया अर्ति पार । ब्रह्मासी नाहीं । १० ।

सकळ माया विस्तारली । ब्रह्मस्थिति अछ्यादिली ।
परी ते निवडूनि घेतली । साधुजनीं ।११।

गोंडाळ सांडून नीर घेइजे । नीर सांडूनि क्षीर सेविजे ।
माया सांडूनि अनुभविजे । ब्रह्म तैसें ।१२।

ब्रह्म आकाशाऐसें निवळ । माया वसुंधरा डहुळ ।
ब्रह्म सूक्ष्म केवळ । माया स्थूळरूपी ।१३।

ब्रह्म तें अप्रत्यक्ष असे । माया ते प्रत्यक्ष दिसे ।
ब्रह्म तें समचि असे । माया ते विषमरूपी ।१४।

माया लक्ष ब्रह्म अलक्ष । माया साक्ष ब्रह्म असाक्ष ।
मायेमध्यें दोनि पक्ष । ब्रह्मीं पक्षचि नाहीं ।१५।

माया पूर्वपक्ष ब्रह्म सिद्धांत । माया असंत ब्रह्म संत ।
ब्रह्मासि नाहीं करणें हेत । मायेसि आहे ।१६।

ब्रह्म अखंड घनदाट । माया पंचभूतिक पोचट ।
ब्रह्म तें निरंतर निघोट । माया ते जुनी जर्जरी ।१७।

माया घडे ब्रह्म घडेना । माया पडे ब्रह्म पडेना ।
माया विघडे ब्रह्म विघडेना । जैसें तैसें ।१८।

ब्रह्म असतचि असे । माया निरसितांच निरसे ।
ब्रह्मास कल्पांत नसे । मायेसि आहे ।१९।

माया कठिण ब्रह्म कोमळ । माया अल्प ब्रह्म विशाळ ।
माया नासे सर्वकाळ । ब्रह्मचि असे ।२०।

वस्तु नव्हे बोलिजे ऐसी । माया जैसी बोलिजे तैसी ।
काळ पावेना वस्तुसी । मायेसी झडपी ।२१।

नाना रूप नाना रंग । तितुका मायेचा प्रसंग ।
माया भंगे ब्रह्म अभंग । जैसें तैसें ।२२।

आतां असो हा विस्तार । चालत जातें सचराचर ।
तितुकी माया परमेश्वर । सबाह्यअभ्यंतरीं ।२३।

सकळ उपाधीवेगळा । तो परमात्मा निराळा ।
जळीं असोनि नातळे जळा । आकाश जैसें ।२४।

मायाब्रह्माचें विवरण । करितां चुके जन्ममरण ।
संतांस गेलियां शरण । मोक्ष लाभे ।२५।

अरे या संतांचा महिमा । बोलावया नाहीं सीमा ।
जयांचेनि जगदात्मा । अंतरचि होये ।२६।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'मायाब्रह्मनिरूपणनाम'
समास पाचवा समाप्त.

❑❑

दशक ६ : समास ६

सृष्टिकथन

॥ श्रीराम ॥

सृष्टीपूर्वीं ब्रह्म असे । तेथें सृष्टि मुळींच नसे ।
आतां सृष्टि दिसत असे । तें सत्य किं मिथ्या ।१।

तुम्ही सर्वज्ञ गोसांवी । माझी आशंका फेडावी ।
ऐसा श्रोता विनवी । वक्तयासी ।२।

आतां ऐका प्रत्योत्तर । कथेसि व्हावें तत्पर ।
वक्ता सर्वज्ञ उदार । बोलता जाला ।३।

जीवभूतः सनातन । ऐसें गीतेचें वचन ।
येणे वाक्यें सत्यपण । सृष्टीस आलें ।४।

यद्दृष्टं तन्नष्टं येणें । वाक्य सृष्टी मिथ्यापणें ।
सत्य मिथ्या ऐसें कोणें । निवडावें ।५।

सत्य म्हणों तरी नासे । मिथ्या म्हणों तरी दिसे ।
आतां जैसें आहे तैसें । बोलिजेल ।६।

सृष्टीमध्यें बहुजन । अज्ञान आणी सज्ञान ।
म्हणौनियां समाधान । होत नाहीं ।७।

ऐका अज्ञानाचें मत । सृष्टि आहे ते शाश्वत ।
देव धर्म तीर्थ व्रत । सत्यचि आहे ।८।

बोले सर्वज्ञाचा राजा । मूर्खस्य प्रतिमापूजा ।
ब्रह्मप्रळयाच्या पैजा । घालूं पाहे ।९।

तंव बोले तो अज्ञान । तरी कां करिसी संध्यास्नान ।
गुरुभजन तीर्थाटण । कासया फिरावें ।१०।

तीर्थें तीर्थें निर्मलं ब्रह्मवृंदं वृंदे वृंदे तत्त्वचिंतानुवादः ।
वादे वादे जायते तत्त्वबोधः बोधे बोधे भासते चंद्रचूडः ॥

चंद्रचूडाचें वचन । सद्गुरूचें उपासन ।
गुरुगीतानिरूपण । बोलिलें हरें ।११।

गुरूसि कैसें भजावें । आधीं तयासि वोळखावें ।
त्याचें समाधान घ्यावें । विवेकें स्वयें ।१२।

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥

गुरुगीतेचें वचन । ऐसें सद्गुरूचें ध्यान ।
तेथें सृष्टिमिथ्याभान । उरेल कैंचें ।।१३।।

ऐसा सज्ञान बोलिला । सद्गुरु तो वोळखिला ।
सृष्टि मिथ्या ऐसा केला । निश्चितार्थ ।।१४।।

श्रोता ऐसें न मनी कदा । आधीक उठिला वेवादा ।
म्हणे कैसा रे गोविंदा । अज्ञान म्हणतोसी ।।१५।।

जीवभूतः सनातनः । ऐसें गीतेचें वचन ।
तयासि तूं अज्ञान । म्हणतोसि कैसा ।।१६।।

ऐसा श्रोता आक्षेप करी । विषाद मानिला अंतरीं ।
याचें प्रत्योत्तर चतुरीं । सावध परिसावें ।।१७।।

गीतेस बोलिला गोविंद । त्याचा न कळे तुज भेद ।
म्हणौनियां वेर्थ खेद । वाहातोसी ।।१८।।

अश्वत्थः सर्ववृक्षाणां ।

माझी विभूति पिंपळ । म्हणौनि बोलिला गोपाळ ।
वृक्ष तोडितां तत्काळ । तुटत आहे ।।१९।।

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ।।

शस्त्रांचेनि तुटेना । अग्निचेनि जळेना ।
उदकामध्यें कालवेना । स्वरूप माझें ।।२०।।

पिंपळ तुटे शस्त्रानें । पिंपळ जळे पावकानें ।
पिंपळ कालवे उदकानें । नाशिवंत ।।२१।।

तुटे जळे बुडे उडे । आतां ऐक्य कैसें घडे ।
म्हणोनि हें उजेडे । सद्गुरुमुखें ।।२२।।

इंद्रियाणां मनश्चास्मि । कृष्ण म्हणे मन तो मी ।
तरी कां आवरावी उर्मी । चंचळ मनाची ।।२३।।

ऐसें कृष्ण कां बोलिला । साधनमार्ग दाखविला ।
खडे मांडूनि सिकविला । वोनामा जेवी ।।२४।।

ऐसा आहे वाक्यभेद । सर्व जाणे तो गोविंद ।
देहबुद्धीचा वेवाद । कामा नये ।।२५।।

वेद शास्त्र श्रुति स्मृती । तेथे वाक्यभेद पडती ।
ते सर्वहि निवडती । सद्गुरूचेनि वचनें ।।२६।।

वेदशास्त्रांचें भांडण । शस्त्रें तोडी ऐसा कोण ।
हें निवडेना साधुविण । कदा कल्पांतीं ।।२७।।

पूर्वपक्ष आणि सिद्धांत । शास्त्रीं बोलिला संकेत ।
याचा होये निश्चितार्थ । साधुमुखें ।।२८।।

येरवीं वादाचीं उत्तरें । येकाहूनि येक थोरें ।
बोलों जातां अपारें । वेदशास्त्रीं ।।२९।।

म्हणोनि वादवेवाद । सांडून कीजे संवाद ।
तेणें होये ब्रह्मानंद । स्वानुभवें ।।३०।।

येके कल्पनेचे पोटीं । होति जाती अनंत सृष्टी ।
तया सृष्टीची गोष्टी । साच केवी ।।३१।।

कल्पनेचा केला देव । तेथें जाला दृढभाव ।
देवालागीं येतां खेव । भक्त दुःखें दुःखवला ।।३२।।

पाषाणाचा देव केला । येके दिवसीं भंगोन गेला ।
तेणें भक्त दुखवला । रडे पडे आक्रंदे ।।३३।।

देव हारपला घरीं । येक देव नेला चोरीं ।
येक देव दुराचारीं । फोडिला बळें ।३४।

येक देव जापाणिला । एक देव उदकीं टाकिला ।
येक देव नेऊनि घातला । पायातळीं ।३५।

काय सांगों तीर्थमहिमा । मोडूनि गेला दुरात्मा ।
थोर सत्व होतें तें मा । काय जालें कळेना ।३६।

देव घडिला सोनारीं । देव वोतिला वोतारीं ।
येक देव घडिला पाथरीं । पाषाणाचा ।३७।

नर्बदागंडिकातीरीं । देव पडिले लक्षवरी ।
त्यांची संख्या कोण करी । असंख्यात गोटे ।३८।

चक्रतीर्थी चक्रांकित । देव असती असंख्यात ।
नाहीं मनीं निश्चितार्थ । येक देव ।३९।

बाण तांदळे तांब्रनाणें । स्फटिक देव्हारीं पूजणें ।
ऐसे देव कोण जाणें । खरे किं खोटे ।४०।

देव रेसिमाचा केला । तोहि तुटोनियां गेला ।
आतां नवा नेम धरिला । मृत्तिकेचा ।४१।

आमचा देव बहु सत्य । आम्हां आकांतीं पावत ।
पूर्ण करी मनोरथ । सर्वकाळ ।४२।

आतां याचें सत्व गेलें । प्राप्त होतें तें जालें ।
प्राप्त न वचे पालटिलें । ईश्वराचेनी ।४३।

धातु पाषाण मृत्तिका । चित्रलेप काष्ठ देखा ।
तेथें देव कैंचा मूर्खा । भ्रांति पडिली ।४४।

हे आपुली कल्पना । प्राप्तांऐसीं फळें जाणा ।
परी त्या देवाचिया खुणा । वेगळ्याचि ।४५।

म्हणौनि हें मायाभ्रमणें । सृष्टि मिथ्या कोटिगुणें ।
वेद शास्त्रें पुराणें । ऐसींच बोलती ।४६।

साधुसंत मानुभाव । त्यांचा ऐसाचि अनुभव ।
पंचभूतातीत देव । सृष्टि मिथ्या ।४७।

सृष्टीपूर्वीं सृष्टि चालतां । सृष्टि अवघी संव्हारतां ।
शाश्वत देव तत्वतां । आदिअंतीं ।४८।

ऐसा सर्वांचा निश्चयो । येदर्थीं नाहीं संशयो ।
वीतरेक आणि अन्वयो । कल्पनारूप ।४९।

येके कल्पनेचे पोटीं । बोलजेती अष्ट सृष्टि ।
तया सृष्टीची गोष्टी । सावध ऐका ।५०।

येकी कल्पनेची सृष्टी । दुजी शाब्दिक सृष्टी ।
तिजी प्रत्यक्ष सृष्टी । जाणती सर्व ।५१।

चौथी चित्रलेपसृष्टी । पांचवी स्वप्नसृष्टी ।
साहावी गंधर्वसृष्टी । ज्वरसृष्टी सातवी ।५२।

आठवी दृष्टिबंधन । ऐशा अष्ट सृष्टि जाण ।
यामधें श्रेष्ठ कोण । सत्य मानावी ।५३।

म्हणोनि सृष्टी नासिवंत । जाणती संत महंत ।
सगुणीं भजावें निश्चित । निश्चयालागीं ।५४।

सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निधरिं ।
सारासारविचारें । संतसंगें ।५५।

आतां असो हें बहुत । संतसंगें कळे नेमस्त ।
येन्हवीं चित्त दुश्चित । संशई पडे ।५६।

तव शिष्यें आक्षेपिलें । सृष्टी मिथ्या ऐसें कळलें ।
परी हें अवघें नाथिलें । तरी दिसतें कां ।५७।

दृश्य प्रत्यक्ष दिसतें । म्हणोन सत्यचि वाटतें ।
यासि काय करावें तें । सांगा स्वामी ।५८।

याचें प्रत्योत्तर भलें । पुढिलें समासीं बोलिलें ।
श्रोतां श्रवण केलें । पाहिजे पुढें ।५९।

एवं सृष्टी मिथ्या जाण । जाणोनि रक्षावें सगुण ।
ऐसी हे अनुभवाची खूण । अनुभवी जाणती ।६०।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सृष्टिकथननाम'
समास सहावा समाप्त.

❑❑

दशक ६ : समास ७

सगुणभजन

॥ श्रीराम ॥

ज्ञानें दृश्य मिथ्या जालें । तरी कां पाहिजे भजन केलें ।
तेणें काये प्राप्त जालें । हें मज निरोपावें । १ ।

ज्ञानाहूनि श्रेष्ठ असेना । तरी कां पाहिजे उपासना ।
उपासनेनें जना । काये प्राप्त । २ ।

मुख्य सार तें निर्गुण । तेथें दिसेचिना सगुण ।
भजन केलियाचा गुण । मज निरोपावा । ३ ।

जें समस्त नासिवंत । त्यासि भजावें किंनिमित्य ।
सत्य सांडून असत्य । कोणें भजावें । ४ ।

असत्याचा प्रत्यये आला । तरी मग नेम कां लागला ।
सत्य सांडून गल्बला । कासया करावा । ५ ।

निर्गुणानें मोक्ष होतो । प्रत्यक्ष प्रत्यया येतो ।
सगुण काये देऊं पाहातो । सांगा स्वामी । ६ ।

सगुण नासिवंत ऐसें सांगतां । पुन्हा भजन करावें म्हणतां ।
तरी काशासाठीं आतां । भजन करूं । ७ ।

स्वामीचे भिडेनें बोलवेना । येन्हवीं हें कांहींच मानेना ।
साध्यचि जालियां साधना । कां प्रवर्तावें । ८ ।

ऐसें श्रोतयाचें बोलणें । शब्द बोले निर्बुजलेपणें ।
याचें उत्तर ऐकणें । म्हणे वक्ता । ९ ।

गुरुचें वचन प्रतिपाळण । हें मुख्य परमार्थाचें लक्षण ।
वचनभंग करितां विलक्षण । सहजेंचि जालें ।१०।

म्हणोनि आज्ञेसी वंदावे । सगुणभजन मानावें ।
श्रोता म्हणे हें देवें । कां प्रयोजिलें ।११।

काय मानिला उपकार । कोण जाला साक्षात्कार ।
किंवा प्रारब्धाचें अक्षर । पुसिलें देवें ।१२।

होणार हें तों पालटेना । भजनें काय करावें जना ।
हें तों पाहातां अनुमाना । कांहींच नये ।१३।

स्वामीची आज्ञा प्रमाण । कोण करील अप्रमाण ।
परंतु याचा काय गुण । मज निरोपावा ।१४।

वक्ता म्हणे सावधपणें । सांग ज्ञानाचीं लक्षणें ।
तुज कांहीं लागे करणें । किंवा नाहीं ।१५।

करणें लागे भोजन । करणें लागे उदकप्राशन ।
मळमूत्रत्यागलक्षण । तेंहि सुटेना ।१६।

जनाचें समाधान राहावें । आपुलें पारिखें वोळखावें ।
आणि भजनचि मोडावें । हें कोण ज्ञान ।१७।

ज्ञानविवेकें मिथ्या जालें । परंतु अवघें नाहीं टाकिलें ।
तरी मग भजनेंचि काय केलें । सांग बापा ।१८।

साहेबास लोटांगणीं जावें । नीचासारिखें व्हावें ।
आणी देवास न मनावें । हें कोण ज्ञान ।१९।

हरीहर ब्रह्मादिक । हे जयाचे आज्ञाधारक ।
तूं येक मानवी रंक । भजेसिना तरी काय गेलें ।२०।

आमुचे कुळीं रघुनाथ । रघुनाथें आमुचा परमार्थ ।
जो समर्थाचाहि समर्थ । देवां सोडविता ।२१।

त्याचे आम्ही सेवकजन । सेवेकरितां जालें ज्ञान ।
तेथें अभाव धरितां पतन । पाविजेल कीं ।२२।

गुरु सांगती सारासार । त्यास कैसें म्हणावें असार ।
तुज काय सांगणें विचार । शाहाणे जाणती ।२३।

समर्थाचे मनीचें तुटे । तेंचि जाणावें अदृष्ट खोटें ।
राज्यपदापासून करंटें । चेवलें जैसें ।२४।

मी थोर वाटे मनीं । तो नव्हे ब्रह्मज्ञानी ।
विचार पाहातां देहाभिमानी । प्रत्यक्ष दिसे ।२५।

वस्तुभजन करीना । ना न करीं ऐसेंही म्हणेना ।
तरी हे जाणावी कल्पना । दडोन राहिली ।२६।

ना तें ज्ञान ना तें भजन । उगाचि आला देहाभिमान ।
येथें नाहीं किं अनुमान । प्रत्यय तुझा ।२७।

तरी आतां ऐसें न करावें । रघुनाथभजनीं लागावें ।
तेणेंचि ज्ञान बोलावें । चळेना ऐसें ।२८।

करी दुर्जनाचा संव्हार । भक्तजनासी आधार ।
ऐसा हा तों चमत्कार । रोकडा चाले ।२९।

मनीं धरावें तें होतें । विघ्न अवघेंचि नासोन जातें ।
कृपा केलियां रघुनाथें । प्रचित येते ।३०।

रघुनाथभजनें ज्ञान जालें । रघुनाथभजनें महत्त्व वाढलें ।
म्हणौनियां तुवां केलें । पाहिजे आधीं ।३१।

हें तों आहे सप्रचित । आणी तुज वाटेना प्रचित ।
साक्षात्कारें नेमस्त । प्रत्ययो करावा ।३२।

रघुनाथ स्मरोनि कार्य करावें । तें तत्काळचि सिद्धि पावे ।
कर्ता राम हें असावें । अभ्यांतरीं ।३३।

कर्ता राम मी नव्हे आपण । ऐसें सगुणनिवेदन ।
निर्गुणीं तें अनन्य । निर्गुणचि होईजे ।३४।

मी कर्ता ऐसें म्हणतां । कांहींच घडेना सर्वथा ।
प्रचित पाहासी तरी आतां । सीघ्रचि पाहें ।३५।

मी कर्ता ऐसें म्हणसी । तेणें तूं कष्टी होसी ।
राम कर्ता म्हणतां पावसी । येश कीर्ती प्रताप ।३६।

येके भावनेसाठीं । देवासीं पडे तुटी ।
कां ते होये कृपादृष्टी । देव कर्ता भावितां ।३७।

आपण आहे दों दिसांचा । आणी देव बहुतां काळांचा ।
आपण थोडे वोळखिचा । देवासि त्रैलोक्य जाणे ।३८।

याकारणें रघुनाथभजन । त्यासी मानिती बहुत जन ।
ब्रह्मादिक आदिकरून । रामभजनीं तत्पर ।३९।

ज्ञानबळें उपासना । आम्ही भक्त जरी मानूं ना ।
तरी या दोषाच्या पतना । पावों अभक्तपणें ।४०।
देव उपेक्षी थोरपणें । तरी मग त्याचें तो जाणे ।
अप्रमाण तें श्लाघ्यवाणें । नव्हे किं श्रेष्ठा ।४१।
देहास लागली उपासना । आपण विवेकें उरेना ।
ऐसी स्थिति सज्जना । अंतरींची ।४२।
सकळ मिथ्या होऊन जातें । हे रामभजनें कळों येतें ।
दृश्य ज्ञानियांचेनि मतें । स्वप्न जैसें ।४३।
मिथ्या स्वप्नविवंचना । तैसी सृष्टीची रचना ।
दृश्य मिथ्या साधुजना । कळों आलें ।४४।
आक्षेप जाला श्रोतयांसी । मिथ्या तरी कां दिसतें आम्हांसी ।
याचें उत्तर पुढीले समासीं । बोलिलें असे ।४५।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सगुणभजननाम'
समास सातवा समाप्त.

❑❑

दशक ६ : समास ८

दृश्यनिर्शन

॥ श्रीराम ॥

मागां श्रोतीं पुसिलें होतें । दृश्य मिथ्या तरी कां दिसतें ।
याचें उत्तर बोलिजेल तें । सावध ऐका ।१।
देखिलें तें सत्यचि मानावें । हें ज्ञात्याचें देखणें नव्हे ।
जड मूढ अज्ञान जीवें । हें सत्य मानिजे ।२।

येक्या देखिल्यासाठीं । लटिक्या कराव्या ग्रंथकोटी ।
संतांमहंतांच्या गोष्टी । त्याहि मिथ्या मानाव्या । ३ ।

माझें दिसतें हेंचि खरें । येथें चालेना दुसरें ।
ऐशिया संशयाच्या भरें । भरोंचि नये । ४ ।

मृगें देखिलें मृगजळ । तेथें धावतें बरळ ।
जळ नव्हे मिथ्या सकळ । त्या पशूस कोणें म्हणावें । ५ ।

रात्रौ स्वप्न देखिलें । बहुत द्रव्य सांपडलें ।
बहुत जनांसी वेव्हारिलें । तें खरें कैसेनि मानावें । ६ ।

कुशळ चितारी विचित्र । तेणें निर्माण केलें चित्र ।
देखतां उठे प्रीति मात्र । परंतु तेथें मृत्तिका । ७ ।

नाना वनिता हस्ति घोडे । रात्रौ देखतां मन बुडे ।
दिवसां पाहातां कातडें । कंटाळवाणें । ८ ।

काष्ठी पाषाणी पुतळ्या । नाना ठकारें निर्मिल्या ।
परम सुंदर वाटल्या । परंतु तेथें पाषाण । ९ ।

नाना गोपुरीं पुतळ्या असती । वक्रांगें वक्रदृष्टीं पाहाती ।
लाघव देखतां भरे वृत्ती । परंतु तेथें त्रिभाग ।१०।

खेळतां नेटके दशावतारी । तेथें येती सुंदर नारी ।
नेत्र मोडिती कळाकुंसरी । परंतु अवघे घटिंगण ।११।

सृष्टी बहुरंगी असत्य । बहुरूपाचें हें कृत्य ।
तुज वाटे दृश्य सत्य । परी हे जाण अविद्या ।१२।

मिथ्या साचासारिखें देखिलें । परि तें पाहिजे विचारिलें ।
दृष्टी तरळतां भासलें । तें साच कैसें मानावें ।१३।

वरी पाहातां पालथें आकाश । उदकीं पाहातां उताणें आकाश ।
मध्यें चांदिण्याहि प्रकाश । परी तें अवघें मिथ्या ।१४।

नृपतीनें चितारी आणिले । ज्याचे त्याऐसे पुतळे केले ।
पाहातां तेचि ऐसे गमले । परी अवघे माईक ।१५।

नेत्रीं कांहीं बाहोलि नसे । जेव्हां जें पाहावें तेव्हां तें भासे ।
डोळां प्रतिबिंब दिसे । तें साच कैसेनी ।१६।

जितुके बुडबुडे उठती । तितुक्यांमध्यें रूपें दिसती ।
क्षणामध्यें फुटोन जाती । रूपें मिथ्या ।१७।

लघुदर्पणें दोनि च्यारी हातीं । तितुकीं मुखें प्रतिबिंबती ।
परी तें मिथ्या आदिअंतीं । येकचि मुख ।१८।

नदीतीरें भार जातां । दुसरा भार दिसे पालथा ।
कां पडसादाचा अवचिता । गजर उठे ।१९।

वापीसरोवराचें तीर । तेथें पशु पक्षी नर वानर ।
नाना पात्रें वृक्षविस्तार । दिसे दोहि सवा ।२०।

येक शस्त्र झाडूं जातां । दोनि दिसती तत्वतां ।
नाना तंतु टणत्कारितां । द्विधा भासती ।२१।

कां तें दर्पणाचे मंदिरीं । बैसली सभा दिसे दुसरी ।
बहुत दीपांचिये हारीं । बहुत छ्याया दिसती ।२२।

ऐसें हें बहुविध असे । साचासारिखेंचि दिसे ।
परि हें सत्य म्हणौनि कैसें । विश्वासावें ।२३।

माया मिथ्या बाजीगरी । दिसे साचाचिये परी ।
परी हे जाणत्यानें खरी । मानूंचि नये कीं ।२४।

लटिकें साचाऐसें भावावें । तरी पारखी कासया असावें ।
येवं ये अविद्येचे यावे । ऐसेचि असती ।।२५।।

मनुष्यांची बाजीगरी । बहुत जनास वाटे खरी ।
सेवट पाहातां निर्धारीं । मिथ्या होये ।।२६।।

तैसीच माव राक्षेसांची । देवांसहि वाटे साची ।
पंचवटिकेसि मृगाची । पाठी घेतली रामें ।।२७।।

पूर्वकाया पालटिती । येकाचेचि बहुत होती ।
रक्तबिंदींच जन्मती । रजनीचर ।।२८।।

नाना पदार्थ फळेंचि जाले । द्वारकेमधें प्रवेशले ।
कृष्णें दैत्य किती वधिले । कपटरूपी ।।२९।।

कैसें कपट रावणाचें । सिर केलें मावेचें ।
काळनेमीच्या आश्रमाचें । अपूर्व कैसें ।।३०।।

नाना दैत्य कपटमती । जे देवांसहि नाटोपती ।
मग निर्माण होऊन शक्ती । संव्हार केला ।।३१।।

ऐसी राक्षेसांची माव । जाणों न सकती देव ।
कपटविद्येचें लाघव । अघटित ज्यांचें ।।३२।।

मनुष्यांची बाजीगरी । राक्षसांची वोडंबरी ।
भगवंताची नाना परी । विचित्र माया ।।३३।।

हे साचासारिखीच दिसे । विचारितांच नसे ।
मिथ्याचि आभासे । निरंतर पाहातां ।।३४।।

साच म्हणावी तरी हे नासे । मिथ्या म्हणावी तरी हे दिसे ।
दोहीं पदार्थीं अविश्वासे । सांगतां मन ।।३५।।

परंतु हें नव्हे साचार । मायेचा मिथ्या विचार ।
दिसतें हें स्वप्नाकार । जाण बापा ।३६।

तथापि असो तुजला । भासचि सत्य वाटला ।
तरी येथें चुका पडिला । ऐक बापा ।३७।

दृश्यभास अविद्यात्मक । तुझाहि देहो तदात्मक ।
म्हणौनि हा अविवेक । तेथें संचरला ।३८।

दृष्टीनें दृश्य देखिलें । मन भासावरी बैसलें ।
तरी तें लिंगदेह जालें । अविद्यात्मक ।३९।

अविद्येनें अविद्या देखिली । म्हणोनि गोष्टि विश्वासली ।
तुझी काया अवघी संचली । अविद्येची ।४०।

तेचि काया मी आपण । हें देहबुद्धीचें लक्षण ।
येणें करितां जालें प्रमाण । दृश्य आवघें ।४१।

इकडे सत्य मानिला देहो । तिकडे दृश्य सत्य हा निर्वाहो ।
दोहींमधें माहां संदेहो । पैसावला बळें ।४२।

देहबुद्धी केली बळकट । आणि ब्रह्म पाहों गेला धीट ।
तों दृश्यानें रुधिली वाट । परब्रह्माची ।४३।

तेथें साच मानी दृश्याला । निश्चयचि बाणोनि गेला ।
पाहा हो केवढा चुका पडिला । अकस्मात ।४४।

आतां असो हें बोलणें । ब्रह्म न पविजे मीपणें ।
देहबुद्धीचीं लक्षणें । दृश्य भाविती ।४५।

अस्तिचा देहीं मांषाचा डोळा । पाहेन म्हणे ब्रह्माचा गोळा ।
तो ज्ञाता नव्हे आंधळा । केवळ मूर्ख ।४६।

दृष्टीसि दिसे मनासि भासे । तितुकें काळांतरीं नासे ।
म्हणोनि दृश्यातीत असे । परब्रह्म तें ।।४७।

परब्रह्म तें शाश्वत । माया तेचि अशाश्वत ।
ऐसा बोलिला निश्चितार्थ । नाना शास्त्रीं ।।४८।

आतां पुढें निरूपण । देहबुधीचें लक्षण ।
चुका पडिला तो मी कोण । बोलिलें असे ।।४९।

मी कोण हें जाणावें । मीपण त्यागूनि अनन्य व्हावें ।
मग समाधान तें स्वभावें । आंगीं बाणें ।।५०।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'दृष्यनिर्शननाम'
समास आठवा समाप्त.

❑❑❑

दशक ६ : समास ९
सारशोधन

॥ श्रीराम ॥

गुप्त आहे उदंड धन । काये जाणती सेवक जन ।
तयांस आहे तें ज्ञान । बाह्याकाराचें ।। १ ।।

गुप्त ठेविलें उदंड अर्थ । आणी प्रगट दिसती पदार्थ ।
शाहाणे शोधिती स्वार्थ । अंतरीं असे ।। २ ।।

तैसें दृश्य हें माईक । पाहात असती सकळ लोक ।
परी जयांस ठाउका विवेक । ते तदनंतर जाणती ।। ३ ।।

द्रव्य ठेऊन जळ सोडिलें । लोक म्हणती सरोवर भरलें ।
तयाचें अभ्यांतर कळलें । समर्थ जनासी ।। ४ ।।

तैसे ज्ञाते ते समर्थ । तेंहिं वोळखिला परमार्थ ।
इतर ते करिती स्वार्थ । दृश्य पदार्थाचा । ५ ।

काबाडी वाहाती काबाड । श्रेष्ठ भोगिती रत्नें जाड ।
हें जयाचें तयास गोड । कर्मयोगें । ६ ।

येक काष्ठस्वार्थ करिती । येक शुभा येकवाटिती ।
तैसे नव्हेत कीं नृपति । सारभोक्ते । ७ ।

जयांस आहे विचार । ते सुकासनीं जाले स्वार ।
इतर जवळील भार । वाहातचि मेले । ८ ।

येक दिव्यान्नें भक्षिती । येक विष्ठा सावडिती ।
आपण वर्तल्याचा घेती । साभिमान । ९ ।

सार सेविजे श्रेष्ठीं । असार घेयिजे वृथापृष्ठीं ।
साराअसाराची गोष्टी । सज्ञान जाणती । १० ।

गुप्त परीस चिंतामणी । प्रगट खडे कांचमणी ।
गुप्त हेमरत्नखाणी । प्रगट पाषाण मृत्तिका । ११ ।

अव्हाशंख अव्हावेल । गुप्त वनस्पति अमोल ।
येरंड धोत्रे बहुसाल । प्रगट सिंपी । १२ ।

कोठे दिसेना कल्पतरु । उदंड सेरांचा विस्तारु ।
पाहातां नाहीं मळियागरु । बोरि बाभळा उदंडी । १३ ।

कामधेनु जाणिजे इंद्रें । सृष्टींत उदंड खिल्लारें ।
महद्भाग्य भोगिजे नृपवरें । इतर कर्मानुसार । १४ ।

नाना व्यापार करिती जन । आवघेचि म्हणती सकांचन ।
परंतु कुबेराचें महिमान । कोणासीचि न ये । १५ ।

तैसा ज्ञानी योगेश्वर । गुप्तार्थलाभाचा ईश्वर ।
इतर ते पोटाचे किंकर । नाना मतें धुंडिती ।।१६।।

तस्मात सार तें दिसेना । आणी असार तें दिसे जना ।
सारासारविवंचना । साधु जाणती ।।१७।।

इतरांस हें काये सांगणें । खरें खोटें कोण जाणे ।
साधुसंतांचिये खुणे । साधुसंत जाणती ।।१८।।

दिसेना जें गुप्त धन । तयासि करणें लागे अंजन ।
गुप्त परमात्मा सज्जन– । संगतीं शोधावा ।।१९।।

रायाचे सन्निध होतां । सहजचि लाभे श्रीमंतता ।
तैसा हा सत्संग धरितां । सद्वस्तु लाभे ।।२०।।

सद्वस्तूस लाभे सद्वस्तु । अव्यावेस्तास अव्यावेस्तु ।
पाहातां प्रशस्तास प्रशस्तु । विचार लाभे ।।२१।।

म्हणौनि हें दृश्यजात । आवघेंचि आहे अशाश्वत ।
परमात्मा अच्युत अनंत । तो या दृश्यावेगळा ।।२२।।

दृश्यावेगळा दृश्याअंतरीं । सर्वात्मा तो सचराचरीं ।
विचार पाहातां अंतरीं । निश्चये बाणे ।।२३।।

संसारत्याग न करितां । प्रपंचउपाधी न सांडितां ।
जनामध्यें सार्थकता । विचारेंचि होये ।।२४।।

हें प्रचितीचें बोलणें । विवेकें प्रचित पाहाणें ।
प्रचित पाहे तें शाहाणे । अन्यथा नव्हे ।।२५।।

सप्रचित आणि अनुमान । उधार आणी रोकडें धन ।
मानसपूजा प्रत्यक्ष दर्शन । यांस महदांतर ।।२६।।

पुढें जन्मांतरी होणार । हा तों अवघाच उधार ।
तैसा नव्हे सारासार । तत्काळ लाभे ।२७।

तत्काळचि लाभ होतो । प्राणी संसारी सुटतो ।
संशय अवघाचि तुटतो । जन्ममरणाचा ।२८।

याचि जन्में येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ।२९।

ये गोष्टीस करी अनुमान । तो सिद्धचि पावेल पतन ।
मिथ्या वदे त्यास आण । उपासनेची ।३०।

हें येथार्थचि आहे बोलणें । विवेकें सीघ्रचि मुक्त होणें ।
असोनी कांहींच नसणें । जनामधें ।३१।

देवपद आहे निर्गुण । देवपदीं अनन्यपण ।
हाचि अर्थ पाहातां पूर्ण । समाधान बाणे ।३२।

देहींच विदेह होणें । करून कांहींच न करणें ।
जीवनमुक्तांचीं लक्षणें । जीवन्मुक्त जाणे ।३३।

येरवीं हें खरें न वटे । अनुमानेंचि संदेह वाटे ।
संदेहाचें मूळ तुटे । सद्गुरुवचनें ।३४।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सारशोधननाम'
समास नववा समाप्त.

❑❑❑

दशक ६ : समास १०

अनुर्वाच्य

॥ श्रीराम ॥

समाधान पुसतां कांहीं । म्हणती बोलिजे ऐसें नाहीं ।
तरी तें कैसें आहे सर्वही । निरोपावें । १ ।

मुक्यानें गूळ खादला । गोडी न स्ये सांगाव्याला ।
याचा अभिप्राव मजला । निरोपण कीजे । २ ।

अनुभवहि पुसों जातां । म्हणती न ये किं सांगतां ।
कोणापासीं पुसों आतां । समाधान । ३ ।

जे ते अगम्य सांगती । न ये माझिये प्रचिती ।
विचार बैसे माझे चित्तीं । ऐसें करावें । ४ ।

ऐसें श्रोत्यांचें उत्तर । याचें कैसें प्रत्योत्तर ।
निरोपिजेल तत्पर । होऊन ऐका । ५ ।

जें समाधानाचें स्थळ । किं तो अनुभवचि केवळ ।
तें स्वरूप प्रांजळ । बोलोन दाऊं । ६ ।

जें बोलास आकळेना । बोलिल्याविणहि कळेना ।
जयासी कल्पितां कल्पना । हिंपुटी होये । ७ ।

तें जाणावें परब्रह्म । जें वेदांचें गुह्य परम ।
धरितां संतसमागम । सर्वहि कळे । ८ ।

तेंचि आतां सांगिजेल । जें समाधान सखोल ।
ऐक अनुभवाचे बोल । अनुर्वाच्य वस्तु । ९ ।

सांगतां न ये तें सांगणें । गोडी कळाया गूळ देणें ।
ऐसें हें सद्गुरुविणें । होणार नाहीं । १० ।

सद्गुरुकृपा कळे त्यासी । जो शोधील आपणासी ।
पुढें कळे अनुभवासी । आपेंआप वस्तु ।।११।।

दृढ करूनियां बुद्धि । आधीं घ्यावी आपशुद्धी ।
तेणें लागे समाधी । अकस्मात ।।१२।।

आपलें मूळ बरें शोधिता । आपली तों माईक वार्ता ।
पुढें वस्तुच तत्वतां । समाधान ।।१३।।

आत्मा आहे सर्वसाक्षी । हें बोलिजे पूर्वपक्षीं ।
जो कोणी सिद्धांत लक्षी । तोचि सिद्ध ।।१४।।

सिद्धांतवस्तु लक्षूं जातां । सर्वसाक्षी ते अवस्ता ।
आत्मा तीहून पर्ता । अवस्तातीत ।।१५।।

पदार्थज्ञान जेव्हां सरे । द्रष्टा द्रष्टेपणें नुरे ।
ते समईं उतरे । फुंज मीपणाचा ।।१६।।

जेथे मुरालें मीपण । तेंचि अनुभवाची खूण ।
अनुर्वाच्य समाधान । या कारणें बोलिजे ।।१७।।

अत्यंत विचाराचे बोल । तरी ते माईक फोल ।
शब्द सबाह्य सखोल । अर्थचि अवघा ।।१८।।

शब्दाकरितां कळे अर्थ । अर्थ पाहातां शब्द वेर्थ ।
शब्द सांगे तें येथार्थ । परी आपण मिथ्या ।।१९।।

शब्दाकरितां वस्तु भासे । वस्तु पाहातां शब्द नासे ।
शब्द फोल अर्थ असे । घनवटपणें ।।२०।।

भुंसाकरितां धान्य निपजे । धान्ये घेऊन भूंस टाकिजे ।
तैसें शब्द भूंस जाणिजे । अर्थ धान्य ।।२१।।

पोचटामधें घनवट । घनवटीं उडे पोचट ।
तैसा शब्द हा फलगट । परब्रह्मीं ।२२।

शब्द बोलोनि राहे । अर्थ शब्दापूर्वींच आहे ।
या कारणें न साहे । उपमा तया अर्थासी ।२३।

भूंस सांडून कण घ्यावा । तैसा वाच्यांश त्यजावा ।
कण लक्ष्यांश लक्षावा । शुद्ध स्वानुभवें ।२४।

दृश्यावेगळें बोलिजे । त्यासी वाच्यांश म्हणिजे ।
त्याचा अर्थ तो जाणिजे । शुद्ध लक्ष्यांश ।२५।

ऐसा जो शुद्ध लक्ष्यांश । तोचि जाणावा पूर्वपक्ष ।
स्वानुभव तो अलक्ष । लक्षिला नवचे ।२६।

जेथें गाळून सांडिलें नभा । जो अनुभवाचा गाभा ।
ऐसा तोहि उभा । कल्पित केला ।२७।

मिथ्या कल्पनेपासूनि जाला । खरेंपण कैंचें असेल त्याला ।
म्हणौनि तेथें अनुभवाला । ठावचि नाहीं ।२८।

दुजेविण अनुभव । हें बोलणेंचि तों वाव ।
याकारणें नाहीं ठाव । अनुभवासी ।२९।

अनुभवें त्रिपुटी उपजे । अद्वैतीं द्वैतचि लाजे ।
म्हणौनि बोलणें साजे । अनुर्वाच्य ।३०।

दिवसरजनीचें परमित्य । करावया मूळ आदित्य ।
तो आदित्य गेलियां उर्वरित । त्यासी काये म्हणावें ।३१।

शब्दमौन्याचा विचार । व्हावया मूळ वोंकार ।
तो वोंकार गेलिया उच्चार । कैसा करावा ।३२।

अनुभव आणि अनुभविता । सकळ ये मायेचि करितां ।
ते माया मुळीं नस्तां । त्यासीं काये म्हणावें ।३३।

वस्तु येक आपण येक । ऐसी अस्ती वेगळिक ।
तरि अनुभवाचा विवेक । बोलों येता सुखें ।३४।

वेगळेपणाची माता । ते लटिके वंधेची सुता ।
म्हणोनियां अभिन्नता । मुळींच आहे ।३५।

अजन्मा होता निजेला । तेणें स्वप्नीं स्वप्न देखिला ।
सद्गुरूस शरण गेला । संसारदुःखें ।३६।

सद्गुरुकृपेस्तव । जाला संसार वाव ।
ज्ञान जालियां ठाव । पुसे अज्ञानाचा ।३७।

आहे तितुकें नाहीं जालें । नाहीं नाहींपणें निमालें ।
आहे नाहीं जाऊन उरलें । नसोन कांहीं ।३८।

सुन्यत्वातीत शुद्धज्ञान । तेणें जालें समाधान ।
ऐक्यरूपें अभिन्न । सहजस्थिती ।३९।

अद्वैतनिरूपण होतां । निमाली द्वैताची वार्ता ।
ज्ञानचर्चा बोलो जातां । जागृती आली ।४०।

श्रोता व्हावें सावधान । अर्थीं घालावें मन ।
खुणे पावतां समाधान । अंतरीं कळे ।४१।

तेणें जितुकें ज्ञान कथिलें । तितुकें स्वप्नावारीं गेलें ।
अनुर्वाच्य सुख उरलें । शब्दातीत ।४२।

तेथें शब्देंविण ऐक्यता । अनुभव ना अनुभविता ।
ऐसा निवांत तो मागुतां । जागृती आला ।४३।

तेणें स्वप्नीं स्वप्न देखिला । जागा होऊनि जागृती आला ।
तेथें शब्द कुंठित जाला । अंत नलगे ।४४।

या निरूपणाचें मूळ । केलेंचि करूं प्रांजळ ।
तेणें अंतरीं निवळ । समाधान कळे ।४५।

तंव शिष्यें विनविलें । जी हें आतां निरोपिलें ।
तें पाहिजे बोलिलें । मागुतें स्वामी ।४६।

मज कळाया कारण । केलेंचि करावें निरूपण ।
येथील जे कां निजखूण । ते मज अनुभवावी ।४७।

अजन्मा तो सांग कवण । तेणें देखिला कैसा स्वप्न ।
तेथें कैसें निरूपण । बोलिलें आहे ।४८।

जाणोनी शिष्याचा आदर । स्वामी देती प्रत्योत्तर ।
तेंचि आतां अति तत्पर । श्रोतीं येथें परिसावें ।४९।

ऐक शिष्या सावधान । अजन्मा तो तूंच जाण ।
तुवां देखिला स्वप्नीं स्वप्न । तोहि आतां सांगतों ।५०।

स्वप्नीं स्वप्नाचा विचार । तो तूं जाण हा संसार ।
येथें तुवां सारासार । विचार केला ।५१।

रिघोनी सद्गुरूस शरण । काढून शुद्ध निरूपण ।
याची करिसी ऊणखूण । प्रत्यक्ष आतां ।५२।

याचाचि घेतां अनुभव । बोलणें तितुकें होतें वाव ।
निवांत विश्रांतीचा ठाव । ते तूं जाण जागृती ।५३।

ज्ञानगोष्टीचा गल्बला । सरोन अर्थ प्रगटला ।
याचा विचार घेतां आला । अंतरीं अनुभव ।५४।

तुज वाटे हे जागृती । मज जाली अनुभवप्राप्ती ।
या नांव केवळ भ्रांती । फिटलीच नाहीं ।५५।

अनुभव अनुभवीं विराला । अनुभवेंविण अनुभव आला ।
हाहि स्वप्नींचा चेईला । नाहींस बापा ।५६।

जागा जालियां स्वप्नउर्मीं । स्वप्नीं म्हणसी अजन्मा तो मी ।
जागेपणें स्वप्नउर्मी । गेलीच नाहीं ।५७।

स्वप्नीं वाटे जागेपण । तैसी अनुभवाची खूण ।
आली परी तें सत्य स्वप्न । भ्रमरूप ।५८।

जागृती या पैलिकडे । तें सांगणें केवि घडे ।
जेथें धारणाचि मोडे । विवेकाची ।५९।

म्हणोनि तें समाधान । बोलतांचि न ये ऐसें जाण ।
निशब्दाची ऐसी खूण । वोळखावी ।६०।

ऐसें आहे समाधान । बोलतांच न ये जाण ।
इतुकेन बाणली खूण । निशब्दाची ।६१।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'अनुर्वाच्यनाम'
समास दहावा समाप्त.

❑❑

दशक सहावा समाप्त

❑❑

दशक सातवा : चौदा ब्रह्मांचा

दशक ७ : समास १

मंगलाचरण

॥ श्रीराम ॥

विद्यावंताचां पूर्वजु । मत्तानु येकद्विजु ।
त्रिनयेन चतुर्भुजु । फरशपाणी । १ ।

कुबेरापासूनि अर्थ । वेदापासून परमार्थ ।
लक्ष्मीपासून समर्थ । भाग्यासि आले । २ ।

तैसी मंगळमूर्ती अद्या । पासूनि जाल्या सकळ विद्या ।
तेणें कवी लाघव गद्या । सत्पात्रें जाले । ३ ।

जैसी समर्थाचीं लेंकुरें । नाना आळंकारीं सुंदरें ।
मूळ पुरुषाचेनि द्वारें । तैसे कवी । ४ ।

नमूं ऐसिया गणेंद्रा । विद्याप्रकाशें पूर्णचंद्रा ।
जयाचेनि बोधसमुद्रा । भरितें दाटे बळें । ५ ।

जो कर्तुत्वास आरंभ । मूळपुरुष मुळारंभ ।
जो परात्पर स्वयंभ । आदिअंतीं । ६ ।

तयापासून प्रमदा । इछा कुमारी शारदा ।
आदित्यापासून गोदा । मृगजळ वाहे । ७ ।

जे मिथ्या म्हणतांच गोवी । माईकपणें लाघवी ।
वक्तयास वेढा लावी । वेगळेपणें । ८ ।

जे द्वैताची जननी । किं ते अद्वैताची खाणी ।
मूळमाया गवसणी । अनंत ब्रह्मांडांची ।९।
किं ते अवदंबरी वल्ली । अनंत ब्रह्मांडीं लगडली ।
मूळपुरुषाची माउली । दुहितारूपें ।१०।
वंदूं ऐसी वेदमाता । आदिपुरुषाची जे सत्ता ।
आतां आठवीन समर्था । सद्गुरूसी ।११।
जयाचेनि कृपादृष्टी । होये आनंदाची वृष्टी ।
तेणें सुखें सर्व सृष्टी । आनंदमये ।१२।
किं तो आनंदाचा जनक । सायोज्यमुक्तीचा नायेक ।
कैवल्यपददायक । अनाथबंधु ।१३।
मुमुक्ष चातकीं सुस्वर । करुणा पाहिजे अंबर ।
वोळे कृपेचा जळधर । साधकांवरी ।१४।
किं तें भवार्णवींचें तारूं । बोधें पाववी पैलपारु ।
माहां आवर्तीं आधारु । भाविकांसी ।१५।
किं तो काळाचा नियंता । नांतरी संकटीं सोडविता ।
किं ते भाविकांची माता । परम स्नेहाळु ।१६।
किं जो परत्रींचा आधार । किं ते विश्रांतीची थार ।
नांतरी सुखाचें माहेर । सुखस्वरूप ।१७।
ऐसा सद्गुरू पूर्णपणी । तुटे भेदाची कडसणी ।
देहविण लोटांगणी । तया प्रभूसी ।१८।
साधु संत आणी सज्जन । वंदूनियां श्रोतेजन ।
आतां कथानुसंधान । सावध ऐका ।१९।
संसार हाचि दीर्घ स्वप्न । लोभें वोसणाती जन ।
माझी कांता माझें धन । कन्या पुत्र माझे ।२०।

ज्ञानसूर्य मावळला । तेणें प्रकाश लोपला ।
अंधकारें पूर्ण जाला । ब्रह्मगोळा आवघा ।२१।

नाहीं सत्वाचें चांदिणें । कांहीं मार्ग दिसे जेणें ।
सर्व भ्रांतीचेनि गुणें । आपेंआप न दिसे ।२२।

देहबुद्धिअहंकारें । निजेले घोरती घोरें ।
दुःखें आक्रंदती थोरें । विषयसुखाकारणें ।२३।

निजेले असतांच मेले । पुन्हा उपजतांच निजेले ।
ऐसे आले आणी गेले । बहुत लोक ।२४।

निदसुरेपणेंचि सैरा । बहुतीं केल्या येरझारा ।
नेणोनियां परमेश्वरा । भोगिले कष्ट ।२५।

तया कष्टाचें निर्शन । व्हावया पाहिजे आत्मज्ञान ।
म्हणोनि हें निरूपण । अध्यात्मग्रंथ ।२६।

सकळ विद्येमध्यें सार । अध्यात्मविद्येचा विचार ।
दशमोध्याईं सारंगधर । भगवद्गीतेसि बोलिला ।२७।

अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम् ।

याकारणें अद्वैतग्रंथ । अध्यात्मविद्येचा परमार्थ ।
पाहावया तोचि समर्थ । जो सर्वांगें श्रोता ।२८।

जयाचें चंचल हृदये । तेणें ग्रंथ सोडूंचि नये ।
सोडितां अलभ्य होये । अर्थ येथीचा ।२९।

जयास जोडला परमार्थ । तेणें पाहावा हा ग्रंथ ।
अर्थ शोधितां परमार्थ । निश्चयें बाणे ।३०।

जयासि नाहीं परमार्थ । तयासि न कळे येथीचा अर्थ ।
नेत्रेंविण निधानस्वार्थ । अंधास कळेना ।३१।

येक म्हणती मऱ्हाटें काये । हें तों भल्यांसि ऐकों नये ।
तीं मूर्खें नेणती सोये । अर्थान्वयाची ।३२।

लोहाची मांदुस केली । नाना रत्नें साठविलीं ।
ते अभाग्यानें त्यागिली । लोखंड म्हणौनी ।३३।

तैसी भाषा प्राकृत । अर्थ वेदांत आणि सिद्धांत ।
नेणोनि त्यागी भ्रांत । मंदबुद्धिस्तव ।३४।

आहाच सांपडतां धन । त्याग करणें मूर्खपण ।
द्रव्य घ्यावें सांठवण । पाहोंचि नये ।३५।

परिस देखिला आंगणीं । मार्गीं पडिला चिंतामणी ।
आव्हावेल माहांगुणी । कूपांमधें ।३६।

तैसें प्राकृतीं अद्वैत । सुगम आणी सप्रचित ।
अध्यात्म लाभे अकस्मात । तरी अवश्य घ्यावें ।३७।

न करितां वित्पत्तीचा श्रम । सकळ शास्त्रार्थ होये सुगम ।
सत्समागमाचें वर्म । तें हें ऐसें असे ।३८।

जें वित्पत्तीनें न कळे । तें सत्समागमें कळे ।
सकळ शास्त्रार्थ आकळे । स्वानुभवासी ।३९।

म्हणौनि कारण सत्समागम । तेथें नलगे वित्पत्तीश्रम ।
जन्मसार्थकाचें वर्म । वेगळेंचि आहे ।४०।

भाषाभेदाश्च वर्तन्ते ह्यर्थ एको न संशयः।
पात्रद्वये यथा खाद्यं स्वादभेदो न विद्यते ॥

भाषापालटें कांहीं । अर्थ वायां जात नाहीं ।
कार्यसिद्धि ते सर्वही । अर्थाचपासीं ।४१।

तथापी प्राकृताकरितां । संस्कृताची सार्थकता ।
येन्हवीं त्या गुप्तार्था । कोण जाणे ।४२।

आतां असो हें बोलणें । भाषा त्यागूनि अर्थ घेणें ।
उत्तम घेऊन त्याग करणें । सालीटरफलांचा ।४३।

अर्थ सार भाषा पोचट । अभिमानें करावी खटपट ।
नाना अहंतेनें वाट । रुधिली मोक्षाची ।४४।

शोध घेतां लक्ष्यांशाचा । तेथें आधीं वाच्यांश कैंचा ।
अगाध महिमा भगवंताचा । कळला पाहिजे ।४५।

मुंकेपणाचें बोलणें । हें जयाचें तोचि जाणे ।
स्वानुभवाचिये खुणे । स्वानुभवी पाहिजे ।४६।

अर्थ जाणे अध्यात्माचा । ऐसा श्रोता मिळेल कैंचा ।
जयासि बोलतां वाचेचा । हव्यासचि पुरे ।४७।

परीक्षवंतांपुढें रत्न । ठेवितां होये समाधान ।
तैसें ज्ञानियांपुढें ज्ञान । बोलावें वाटे ।४८।

मायाजाळें दुश्चीत होये । तें निरूपणीं कामा न ये ।
सांसारिकां कळे काये । अर्थ येथीचा ।४९।

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन ।
बहुशाखा ह्यनंताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ।।

वेवसाईं जो मळिण । त्यासि न कळे निरूपण ।
येथें पाहिजे सावधपण । अतिशयेंसीं ।५०।

नाना रत्नें नाना नाणीं । दुश्चीतपणें घेतां हानी ।
परीक्षा नेणतां प्राणी । ठकला तेथें ।५१।

तैसें निरूपणीं जाणा । आहाच पाहातां कळेना ।
मऱ्हाटेंचि उमजेना । कांहीं केल्यां ।५२।

जेथें निरूपणाचे बोल । आणि अनुभवाची वोल ।
तें संस्कृतापरीस खोल । अध्यात्मश्रवण ।५३।

मायाब्रह्म वोळखावें । तयास अध्यात्म म्हणावें ।
तरी तें मायेचें जाणावें । स्वरूप आधीं ।५४।

माया सगुण साकार । माया सर्वस्व विकार ।
माया जाणिजे विस्तार । पंचभूतांचा ।५५।

माया दृश्य दृष्टीस दिसे । माया भास मनासि भासे ।
माया क्षणभंगुर नासे । विवेकें पाहातां ।५६।

माया अनेक विश्वरूप । माया विष्णूचें स्वरूप ।
मायेची सीमा अमूप । बोलिजे तितुकी ।५७।

माया बहुरूपी बहुरंग । माया ईश्वराचा संग ।
माया पाहातां अभंग । अखिळ वाटे ।५८।

माया सृष्टीची रचना । माया आपुली कल्पना ।
माया तोडितां तुटेना । ज्ञानेंविण ।५९।

ऐसी माया निरोपिली । स्वल्प संकेतें बोलिली ।
पुढें वृत्ति सावध केली । पाहिजे श्रोतीं ।६०।

पुढें ब्रह्मनिरोपण । निरोपिलें ब्रह्मज्ञान ।
जेणें तुटे मायाभान । येकसरें ।६१।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'मंगलाचरणनाम'
समास पहिला समाप्त.

❑❑

दशक ७ : समास २

ब्रह्मनिरूपण

॥ श्रीराम ॥

ब्रह्म निर्गुण निराकार । ब्रह्म निःसंग निर्विकार ।
ब्रह्मासि नाहीं पारावार । बोलती साधु । १ ।

ब्रह्म सर्वांस व्यापक । ब्रह्म अनेकीं येक ।
ब्रह्म शाश्वत हा विवेक । बोलिला शास्त्रीं । २ ।

ब्रह्म अच्युत अनंत । ब्रह्म सदोदित संत ।
ब्रह्म कल्पनेरहित । निर्विकल्प । ३ ।

ब्रह्म या दृश्यावेगळें । ब्रह्म सुन्यत्वास निराळें ।
ब्रह्म इंद्रियांच्या मेळें । चोजवेना । ४ ।

ब्रह्म दृष्टीस दिसेना । ब्रह्म मूर्खासी असेना ।
ब्रह्म साधुविण येना । अनुभवासी । ५ ।

ब्रह्म सकळांहूनि थोर । ब्रह्मा ऐसें नाहीं सार ।
ब्रह्म सूक्ष्म अगोचर । ब्रह्मादिकांसी । ६ ।

ब्रह्म शब्दीं ऐसें तैसें । बोलिजे त्याहूनि अनारिसें ।
परी तें श्रवणअभ्यासें । पाविजे ब्रह्म । ७ ।

ब्रह्मास नामें अनंत । परी तें ब्रह्म नामातीत ।
ब्रह्मास हेतदृष्टांत । देतां न शोभती । ८ ।

ब्रह्मासारिखें दुसरें । पाहातां काय आहे खरें ।
ब्रह्म दृष्टांत उत्तरें । कदा न साहे । ९ ।

यतो वाचो निवर्तंते अप्राप्य मनसा सह ।

जेथें वाचा निवर्तती । मनासी नाहीं ब्रह्मप्राप्ती ।
ऐसी बोलिली श्रुती । सिद्धांतवचन ।१०।

कल्पनारूप मन पाहीं । ब्रह्मीं कल्पनाचि नाहीं ।
म्हणौनि वाक्य कांहीं । अन्यथा नव्हे ।११।

आतां मनासि जें अप्राप्त । तें कैसें होईल प्राप्त ।
ऐसें म्हणाल तरी कृत्य । सद्गुरुविण नाहीं ।१२।

भांडारगृहें भरलीं । परी असती आडकिलीं ।
हातास न येतां किली । सर्वही अप्राप्त ।१३।

तरी ते किली ते कवण । मज करावी निरूपण ।
ऐसा श्रोता पुसे खूण । वक्तयासी ।१४।

सद्गुरुकृपा तेचि किली । जेणें बुद्धि प्रकाशली ।
द्वैतकपाटें उघडलीं । येकसरीं ।१५।

तेथें सुख असे वाड । नाहीं मनास पवाड ।
मनेंविण कैवाड । साधनाचा ।१६।

त्याची मनेंविण प्राप्ती । किं वासनेविण तृप्ती ।
तेथें न चले वित्पत्ती । कल्पनेची ।१७।

तें परेहूनि पर । मनबुद्धीअगोचर ।
संग सोडितां सत्वर । पाविजेतें ।१८।

संग सोडावा आपुला । मग पाहावें तयाला ।
अनुभवी तो या बोला । सुखावेल गा ।१९।

आपण म्हणिजे मीपण । मीपण म्हणिजे जीवपण ।
जीवपण म्हणिजे अज्ञान । संग जडला ।२०।

सोडितां तया संगासी । ऐक्य होये निःसंगासी ।
कल्पनेविण प्राप्तीसी । अधिकार ऐसा ।२१।

मी कोण ऐसें नेणिजे । तया नांव अज्ञान बोलिजे ।
अज्ञान गेलियां पाविजे । परब्रह्म तें ।।२२।

देहबुद्धीचें थोरपण । परब्रह्मीं न चले जाण ।
तेथें होतसे निर्वाण । अहंभावासी ।।२३।

उंचनीच नाहीं परी । राया रंका येकचि सरी ।
जाला पुरुष अथवा नारी । येकचि पद ।।२४।

ब्राह्मणाचें ब्रह्म तें सोंवळें । शूद्राचें ब्रह्म तें वोवळें ।
ऐसें वेगळें आगळें । तेथें असेचिना ।।२५।

उंच ब्रह्म तें रायासी । नीच ब्रह्म तें परिवारासी ।
ऐसा भेद तयापासीं । मुळींच नाहीं ।।२६।

सकळांसि मिळोन ब्रह्म येक । तेथें नाहीं हे अनेक ।
रंक अथवा ब्रह्मादिक । तेथेंचि जाती ।।२७।

स्वर्ग मृत्य आणि पाताळ । तिहीं लोकींचे ज्ञाते सकळ ।
सकळांसि मिळोन येकचि स्थळ । विश्रांतीचें ।।२८।

गुरुशिष्या येकचि पद । तेथें नाहीं भेदाभेद ।
परी या देहाचा समंध । तोडिला पाहिजे ।।२९।

देहबुद्धीचा अंतीं । सकळांसि येकचि प्राप्ती ।
येक ब्रह्म द्वितीयं नास्ति । हें श्रुतिवचन ।।३०।

साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपी मिळाले ।
अवघे मिळोन येकचि जाले । देहातीत वस्तु ।।३१।

ब्रह्म नाहीं नवें जुनें । ब्रह्म नाहीं अदिक उणें ।
उणें भाविल तें सुणें । देहबुद्धीचें ।।३२।

देहबुद्धीचा संशयो । करी समाधानाचा क्षयो ।
चुके समाधानसमयो । देहबुद्धीयोगें ।।३३।

देहाचें जें थोरपण । तेंचि देहबुद्धीचें लक्षण ।
मिथ्या जाणोनि विचक्षण । निंदिती देहो ।३४।

देह पावे जंवरी मरण । तंवरी धरी देहाभिमान ।
पुन्हा दाखवी पुनरागमन । देहबुद्धि मागुती ।३५।

देहाचेनि थोरपणें । समाधानासी आलें उणें ।
देहो पडेल कोण्या गुणें । हेंहि कळेना ।३६।

हित आहे देहातीत । म्हणौनि निरोपिती संत ।
देहबुद्धीने अन्हित । होंचि लागे ।३७।

सामर्थ्यबळें देहबुद्धी । योगियांसि तेहि बाधी ।
देहबुद्धीची उपाधी । पैसावों लागे ।३८।

म्हणौनि देहबुद्धि हे झडे । तरीच परमार्थ घडे ।
देहबुद्धीनें विघडे । ऐक्यता ब्रह्मीची ।३९।

विवेक वस्तूकडे ओढी । देहबुद्धि तेथूनि पाडी ।
अहंता लाऊन निवडी । वेगळेपणें ।४०।

विचक्षणें याकारणें । देहबुद्धि त्यजावी श्रवणें ।
सत्यब्रह्मीं साचारपणें । मिळोन जावें ।४१।

सत्यब्रह्म तें कवण । ऐसा श्रोता करी प्रश्न ।
प्रत्योत्तर दे आपण । वक्ता श्रोतयासी ।४२।

म्हणे ब्रह्म येकचि असे । परी तें बहुविध भासे ।
अनुभव देहीं अनारिसें । नाना मतीं ।४३।

जें जें जया अनुभवलें । तेंचि तयासि मानलें ।
तेथेंचि त्याचें विस्वासलें । अंतःकर्ण ।४४।

ब्रह्म नामरूपातीत । असोनि नामें बहुत ।
निर्मळ निश्चळ निवांत । निजानंद ।४५।

अरूप अलक्ष अगोचर । अच्युत अनंत अपरांपर ।
अदृश्य अतर्क्ये अपार । ऐसीं नामें ।४६।

नादरूप ज्योतिरूप । चैतन्यरूप सत्तारूप ।
साक्षरूप सस्वरूप । ऐसीं नामें ।४७।

सुन्य आणी सनातन । सर्वेश्वर आणी सर्वज्ञ ।
सर्वात्मा जगजीवन । ऐसीं नामें ।४८।

सहज आणी सदोदित । शुद्ध बुद्ध सर्वातीत ।
शाश्वत आणी शब्दातीत । ऐसीं नामें ।४९।

विशाळ विस्तीर्ण विश्वंभर । विमळ वस्तु व्योमाकार ।
आत्मा परमात्मा परमेश्वर । ऐसीं नामें ।५०।

परमात्मा ज्ञानघन । येकरूप पुरातन ।
चिद्रूप चिन्मात्र जाण । नामें अनाम्याचीं ।५१।

ऐसीं नामें असंख्यात । परी तो परेश नामातीत ।
त्याचा करावा निश्चितार्थ । ठेविलीं नामें ।५२।

तो विश्रांतीचा विश्राम । आदिपुरुष आत्माराम ।
तें येकचि परब्रह्म । दुसरें नाहीं ।५३।

तेंचि कळायाकारणें । चौदा ब्रह्मांचीं लक्षणें ।
सांगिजेती तेणें श्रवणें । निश्चयो बाणे ।५४।

खोटें निवडितां येकसरें । उरलें तें जाणिजे खरें ।
चौदा ब्रह्में शास्त्राधारें । बोलिजेती ।५५।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'ब्रह्मनिरूपणनाम'
समास दुसरा समाप्त.

❑❑

दशक ७ : समास ३

चतुर्दशब्रह्मनिरूपण

॥ श्रीराम ॥

श्रोतां व्हावें सावधान । आतां सांगतो ब्रह्मज्ञान ।
जेणें होये समाधान । साधकाचें ॥ १ ॥

रत्नें साधायाकारणें । मृत्तिका लागे येकवटणें ।
चौदा ब्रह्मांची लक्षणें । जाणिजे तैसीं ॥ २ ॥

पदार्थेंविण संकेत । द्वैतावेगळा दृष्टांत ।
पूर्वपक्षेंविण सिद्धांत । बोलतांचि न ये ॥ ३ ॥

आधीं मिथ्या उभारावें । मग तें वोळखोन सांडावें ।
पुढें सत्य तें स्वभावें । अंतरीं बाणे ॥ ४ ॥

म्हणौन चौदा ब्रह्मांचा संकेत । बोलिला कळाया सिद्धांत ।
येथें श्रोतीं सावचित । क्षण येक असावें ॥ ५ ॥

पहिलें तें शब्दब्रह्म । दुजें मीतिकाक्षरब्रह्म ।
तिसरें खंब्रह्म । बोलिली श्रुती ॥ ६ ॥

चौथें जाण सर्वब्रह्म । पांचवें चैतन्यब्रह्म ।
साहावें सत्ताब्रह्म । साक्षब्रह्म सातवें ॥ ७ ॥

आठवें सगुणब्रह्म । नवें निर्गुणब्रह्म ।
दाहावें वाच्यब्रह्म । जाणावें पैं ॥ ८ ॥

अनुभव तें अक्रावें । आनंदब्रह्म तें बारावें ।
तदाकार तेरावें । चौदावें अनुर्वाच्य ॥ ९ ॥

ऐसीं हे चौदा ब्रह्में । यांची निरोपिलीं नामें ।
आतां स्वरूपाचीं वर्में । संकेत दाऊं ॥ १० ॥

अनुभवेंविण भ्रम । या नांव शब्दब्रह्म ।
आतां मीतिकाक्षरब्रह्म । तें येकाक्षर ।११।

खंशब्दें आकाशब्रह्म । महदाकाश व्यापकधर्म ।
आतां बोलिलें सूक्ष्म । सर्वब्रह्म ।१२।

पंचभूतांचें कुवाडें । जें जें तत्व दृष्टी पडे ।
तें तें ब्रह्मचि चोखडें । बोलिजेत आहे ।१३।

या नांव सर्वब्रह्म । श्रुतिआश्रयाचें वर्म ।
आतां चैतन्यब्रह्म । बोलिजेल ।१४।

पंचभूतादि मायेतें । चैतन्य चि चेतवितें ।
म्हणौनि त्या चैतन्यातें । चैतन्यब्रह्म बोलिजे ।१५।

चैतन्यास ज्याची सत्ता । ते सत्ताब्रह्म तत्वता ।
तये सत्तेस जाणता । या नाव साक्षब्रह्म ।१६।

साक्षत्व जयापासुनी । तें हि आकळिलें गुणीं ।
सगुणब्रह्म हे वाणी । तयासि वदे ।१७।

जेथें नाहीं गुणवार्ता । तें निर्गुणब्रह्म तत्वता ।
वाच्यब्रह्म तें हि आतां । बोलिजेल ।१८।

जें वाचें बोलतां आलें । तें वाच्यब्रह्म बोलिलें ।
अनुभवासि कथिलें । न वचे सर्वथा ।१९।

या नांव अनुभव ब्रह्म । आनंदवृत्तीचा धर्म ।
परंतु याचेंहि वर्म । बोलिजेल ।२०।

ऐसें हें ब्रह्म आनंद । तदाकार तें अभेद ।
अनुर्वाचीं संवाद । तुटोन गेला ।२१।

ऐसीं हे चौदा ब्रह्मों । निरोपिलीं अनुक्रमें ।
साधकें पाहातां भ्रमें । बाधिजेना ।२२।

ब्रह्म जाणावें शाश्वत । माया तेचि अशाश्वत ।
चौदा ब्रह्मांचा सिद्धांत । होईल आतां ।२३।

शब्दब्रह्म तें शाब्दिक । अनुभवेंविण माईक ।
शाश्वताचा विवेक । तेथें नाहीं ।२४।

जें क्षर ना अक्षर । तेथें कैंचें मीतिकाक्षर ।
शाश्वताचा विचार । तेथेंहि न दिसे ।२५।

खंब्रह्म ऐसें वचन । तरी सुन्यातें नासी ज्ञान ।
शाश्वताचें अधिष्ठान । तेथेंहि न दिसे ।२६।

सर्वत्रास आहे अंत । सर्वब्रह्म नासिवंत ।
प्रळये बोलिला निश्चित । वेदांतशास्त्रीं ।२७।

ब्रह्मप्रळये मांडेल जेथें । भूतान्वय कैचा तेथें ।
म्हणौनियां सर्वब्रह्मातें । नाश आहे ।२८।

अचळासि आणी चळण । निर्गुणास लावितां गुण ।
आकारास विचक्षण । मानीतना ।२९।

जें निर्माण पंचभूत । तें प्रत्यक्ष नासिवंत ।
सर्वब्रह्म हे मात । घडे केवी ।३०।

असो आतां हें बहुत । सर्वब्रह्म नासिवंत ।
वेगळेपणास अंत । पाहाणें कैचें ।३१।

आतां जयास चेतवावें । तेंचि माईक स्वभावें ।
तेथें चैतन्याच्या नावें । नास आला ।३२।

परिवारेंविण सत्ता । ते सत्ता नव्हे तत्वता ।
पदार्थेंविण साक्षता । तेहि मिथ्या ।३३।

सगुणास नाश आहे । प्रत्यक्षास प्रमाण काये ।
सगुणब्रह्म निश्चयें । नासिवंत ।३४।

निर्गुण ऐसें जें नाव । त्या नांवास कैचा ठाव ।
गुणेंविण गौरव । येईल कैंचें ।३५।

माया जैसें मृगजळ । ऐसें बोलती सकळ ।
कां तें कल्पनेचें आभाळ । नाथिलेंचि ।३६।

ग्रामो नास्ति कुतः सीमा । जन्मेंविण जीवात्मा ।
अद्वैतासी उंपमा । द्वैताची ।३७।

मायेविरहित सत्ता । पदार्थेंविण जाणता ।
अविद्येंविण चैतन्यता । कोणास आली ।३८।

सत्ता चैतन्यता साक्षी । सर्वहि गुणाचपासीं ।
ठाईचें निर्गुण त्यासी । गुण कैंचे ।३९।

ऐसें जें गुणरहित । तेथें नामाचा संकेत ।
तोचि जाणावा अशाश्वत । निश्चयेंसी ।४०।

निर्गुण ब्रह्मासि संकेतें । नामें ठेविलीं बहुतें ।
तें वाच्यब्रह्म त्यातें । नाश आहे ।४१।

आनंदाचा अनुभव । हाहि वृत्तीचाचि भाव ।
तदाकारीं ठाव । वृत्तीस नाहीं ।४२।

अनुर्वाच्य याकारणें । संकेत वृत्तीच्या गुणें ।
तया संकेतास उणें । निवृत्तीनें आणिलें ।४३।

अनुर्वाच्य ते निवृत्ती । तेचि उन्मनीची स्थिती ।
निरोपाधी विश्रांति । योगियांची ।४४।

वस्तु जे कां निरोपाधी । तेचि सहज समाधी ।
जेणें तुटे आदिव्याधी । भवदुखाची ।।४५।।

जो उपाधीचा अंत । तोचि जाणावा सिद्धांत ।
सिद्धांत आणी वेदांत । धादांत आत्मा ।।४६।।

असो ऐसे जे शाश्वत ब्रह्म । जेथें नाहीं मायाभ्रम ।
अनुभवी जाणे वर्म । स्वानुभवें ।।४७।।

आपुलेन अनुभवें । कल्पनेसि मोडावें ।
मग सुकाळी पडावें । अनुभवाचे ।।४८।।

निर्विकल्पास कल्पावें । कल्पना मोडे स्वभावें ।
मग नसोनि असावें । कल्पकोटी ।।४९।।

कल्पनेचें येक बरें । मोहरितांच मोहरे ।
स्वरूपीं घालिता भरे । निर्विकल्पीं ।।५०।।

निर्विकल्पासि कल्पितां । कल्पनेचि नुरे वार्ता ।
निःसंगास भेटों जातां । निःसंग होइजे ।।५१।।

पदार्थाऐसें ब्रह्म नव्हे । मा तें हातीं धरून द्यावें ।
असो हें अनुभवावें । सद्गुरुमुखें ।।५२।।

पुढें कथेचा अन्वये । केलाचि करूं निश्चये ।
जेणें अनुभवासि ये । केवळब्रह्म ।।५३।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'चतुर्दशब्रह्मनिरूपणनाम'
समास तिसरा समाप्त.

❑❑

दशक ७ : समास ४

विमलब्रह्मनिरूपण

॥ श्रीराम ॥

ब्रह्म नभाहून निर्मळ । पाहातां तैसेंचि पोकळ ।
अरूप आणी विशाळ । मर्यादेवेगळें । १ ।

येकविस स्वर्गें सप्त पाताळ । मिळोन एक ब्रह्मगोळ ।
ऐसीं अनंत तें निर्मळ । व्यापून असे । २ ।

अनंत ब्रह्मांडांखालतें । अनंत ब्रह्मांडांवरुतें ।
तेणेंविण स्थळ रितें । अणुमात्र नाहीं । ३ ।

जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं । ऐसी वदे लोकवाणी ।
तेणेंविण रिता प्राणी । येकहि नाहीं । ४ ।

जळचरांस जैसें जळ । बाह्याभ्यांतरीं निखळ ।
तैसें ब्रह्म हें केवळ । जीवमात्रासी । ५ ।

जळावेगळा ठाव आहे । ब्रह्माबाहेरी जातां नये ।
म्हणौनि उपमा न साहे । जळाची तया । ६ ।

आकाशाबाहेरी पळों जातां । पुढें आकाशचि तत्वता ।
तैसें तया अनंता । अंतचि नाहीं । ७ ।

परी जे अखंड भेटलें । सर्वांगास लिगटलें ।
अति निकट परी चोरलें । सकळांसि जें । ८ ।

तयामधेंचि असिजे । परी तयास नेणिजे ।
उमजे भास नुमजे । परब्रह्म तें । ९ ।

आकाशामधें आभाळ । तेणें आकाश वाटे डहुळ ।
परी तें मिथ्या निवळ । आकाशचि असे । १० ।

नेहार देतां आकाशीं । चक्रें दिसती डोळ्यांसी ।
तैसें दृश्य ज्ञानियांसी । मिथ्यारूप ।११।

मिथ्याचि परी आभासे । निद्रिस्तांस स्वप्न जैसें ।
जागा जालियां अपैसें । बुझों लागे ।१२।

तैसें आपुलेन अनुभवें । ज्ञानें जागृतीसि यावें ।
मग माईक स्वभावें । कळों लागे ।१३।

आतां असो हें कुवाडें । जे ब्रह्मांडापैलिकडे ।
तेंचि आता निवाडें । उमजोन दाऊं ।१४।

ब्रह्म ब्रह्मांडीं कालवलें । पदार्थासी व्यापून ठेलें ।
सर्वांमधें विस्तारलें । अंशमात्रें ।१५।

ब्रह्मामधें सृष्टी भासे । सृष्टीमध्यें ब्रह्म असे ।
अनुभव घेतां आभासे । अंशमात्रें ।१६।

अंशमात्रें सृष्टीभीतरीं । बाहेरी मर्यादा कोण करी ।
सगळें ब्रह्म ब्रह्मांडोदरीं । माईल कैसें ।१७।

अमृतीमधें आकाश । सगळें सांठवतां प्रयास ।
म्हणौन तयाचा अंश । बोलिजेतो ।१८।

ब्रह्म तैसें कालवलें । परी तें नाहीं हालवलें ।
सर्वांमधें परी संचलें । संचलेपणें ।१९।

पंचभूतीं असे मिश्रित । परंतु तें पंचभूतातीत ।
पंकीं आकाश अलिप्त । असोनि जैसें ।२०।

ब्रह्मास दृष्टांत न घडे । बुझावया देणें घडे ।
परी दृष्टांतीं साहित्य पडे । विचारितां आकाश ।२१।

खंब्रह्म ऐसी श्रुती । गगनसदृशं हे स्मृती ।
म्हणौनि ब्रह्मास दृष्टांतीं । आकाश घडे ।२२।

काळिमा नस्तां पितळ । मग तें सोनेंचि केवळ ।
सुन्यत्व नस्तां निवळ । आकाश ब्रह्म ।२३।

म्हणौनि ब्रह्म जैसें गगन । आणि माया जैसा पवन ।
आडळे परी दर्शन । नव्हे त्याचें ।२४।

शब्दसृष्टीची रचना । होत जात क्षणक्षणा ।
परंतु ते स्थिरावेना । वायुच ऐसी ।२५।

असो ऐसी माया माईक । शाश्वत तें ब्रह्म येक ।
पाहों जातां अनेक । व्यापून आहे ।२६।

पृथ्वीसी भेदून आहे । परी तें ब्रह्म कठीण नव्हे ।
दुजी उपमा न साहे । तया मृदत्वासी ।२७।

पृथ्वीहूनि मृद जळ । जळाहूनि तो अनळ ।
अनळाहूनि कोमळ । वायो जाणावा ।२८।

वायोहून तें गगन । अत्यंतचि मृद जाण ।
गगनाहून मृद पूर्ण । ब्रह्म जाणावें ।२९।

वज्रास असे भेदिलें । परी मृदत्व नाहीं गेलें ।
उपमेरहित संचलें । कठिण ना मृद ।३०।

पृथ्वीमधें व्यापून असे । पृथ्वी नासे तें न नासे ।
जळ शोषे तें न शोषे । जळीं असोनी ।३१।

तेजीं असे परी जळेना । पवनीं असे परी चळेना ।
गगनीं असे परी कळेना । परब्रह्म तें ।३२।

शेरीर अवघें व्यापलें । परी तें नाहीं आडळलें ।
जवळिच दुरावलें । नवल कैसें ।३३।

सन्मुखचि चहुंकडे । तयामधें पाहाणें घडे ।
बाह्याभ्यांतरी रोकडें । सिद्धचि आहे ।३४।

तयामधेंचि आपण । आपणा सबाह्य तें जाण ।
दृश्यावेगळी खूण । गगनासारिखी ।३५।

कांहीं नाहींसें वाटलें । तेथेंचि तें कोंदाटलें ।
जैसें न दिसे आपलें । आपणासि धन ।३६।

जो जो पदार्थ दृष्टी पडे । तें त्या पदार्था ऐलिकडे ।
अनुभवें हें कुवाडें । उकलावें ।३७।

मागें पुढें आकाश । पदार्थेंविण जो पैस ।
पृथ्वीविण भकास । येकरूप ।३८।

जें जें रूप आणी नाम । तो तो नाथिलाच भ्रम ।
नामरूपातीत वर्म । अनुभवी जाणे ।३९।

नभीं धूम्राचे डोंगर । उचलती थोर थोर ।
तैसें दावी वोडंबर । मायादेवी ।४०।

ऐसी माया अशाश्वत । ब्रह्म जाणावें शाश्वत ।
सर्वां ठाईं सदोदित । भरलें असे ।४१।

पोथी वाचूं जातां पाहे । मातृकांमधेंचि आहे ।
नेत्रीं निघोनि राहे । मृदपणें ।४२।

श्रवणें शब्द ऐकतां । मनें विचार पाहतां ।
मना सबाह्य तत्वतां । परब्रह्म तें ।४३।

चरणें चालतां मार्गीं । जें आडळे सर्वांगीं ।
करें घेतां वस्तुलागीं । आडवें ब्रह्म ।४४।

असो इंद्रियेंसमुदाव । तयामधें वर्ते सर्व ।
जाणों जातां मोडे हांव । इंद्रियांची ।४५।

तें जवळिच असे । पाहों जातां न दिसे ।
न दिसोन वसे । कांहीं येक ।४६।

जें अनुभवेंचि जाणावें । सृष्टीचेनि अभावें ।
आपुलेन स्वानुभवें । पाविजे ब्रह्म ।४७।

ज्ञानदृष्टीचें देखणें । चर्मदृष्टी पाहों नेणे ।
अंतरवृत्तीचिये खुणे । अंतरवृत्ति साक्ष ।४८।

जाणे ब्रह्म जाणे माया । जाणे अनुभवाच्या ठाया ।
ते येक जाणावी तुर्या । सर्वसाक्षिणी ।४९।

साक्षत्व वृत्तीचें कारण । उन्मनी ते निवृत्ति जाण ।
जेथें विरे जाणपण । विज्ञान तें ।५०।

जेथें अज्ञान सरे । ज्ञान तेंहि नुरे ।
विज्ञानवृत्ति मुरे । परब्रह्मीं ।५१।

ऐसें ब्रह्म शाश्वत । जेथें कल्पनेसी अंत ।
योगी जना येकांत । अनुभवें जाणावा ।५२।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'विमलब्रह्मनिरूपणनाम'
समास चौथा समाप्त.

❑❑

दशक ७ : समास ५
द्वैतकल्पना निर्शन

॥ श्रीराम ॥

केवळ ब्रह्म जें बोलिलें । तें अनुभवास आलें ।
आणी मायेचेंहि लागलें । अनुसंधान ।१।

ब्रह्म अंतरीं प्रकाशे । आणी मायाहि प्रत्यक्ष दिसे ।
आतां हें द्वैत निरसे । कवणेपरी हो ।२।

तरी आतां सावधान । येकाग्र करूनियां मन ।
माया ब्रह्म हें कवण । जाणताहे । ३ ।

सत्य ब्रह्माचा संकल्प । मिथ्या मायेचा विकल्प ।
ऐसिया द्वैताचा जल्प । मनचि करी । ४ ।

जाणे ब्रह्म जाणे माया । ते येक जाणावी तुर्या ।
सर्व जाणे म्हणोनिया । सर्वसाक्षिणी । ५ ।

ऐक तुर्येचें लक्षण । जेथें सर्व जाणपण ।
सर्वचि नाहीं कवण । जाणेल गा । ६ ।

संकल्पविकल्पाची सृष्टी । जाली मनाचिये पोटीं ।
तें मनचि मिथ्या सेवटीं । साक्षी कवणु । ७ ।

साक्षत्व चैतन्यत्व सत्ता । हे गुण ब्रह्माचिया माथां ।
आरोपले जाण वृथा । मायागुणें । ८ ।

घटमठाचेनि गुणें । त्रिविधा आकाश बोलणें ।
मायेचेनि खरेंपणें । गुण ब्रह्मीं । ९ ।

जंव खरेंपण मायेसी । तंवचि साक्षत्व ब्रह्मासी ।
मायेअविद्येचे निरासीं । द्वैत कैचें ।१०।

म्हणोनि सर्वसाक्षी मन । तेंचि जालिया उन्मन ।
मग तुर्यारूप ज्ञान । तें मावळोन गेलें ।११।

जयास द्वैत भासलें । ते मन उन्मन जालें ।
द्वैताअद्वैताचें तुटलें । अनुसंधान ।१२।

येवं द्वैत आणी अद्वैत । होये वृत्तीचा संकेत ।
वृत्ति जालिया निवृत्त । द्वैत कैंचें ।१३।

वृत्तिरहित जें ज्ञान । तेंचि पूर्ण समाधान ।
जेथें तुटे अनुसंधान । मायाब्रह्मीचें ।१४।

मायाब्रह्म ऐसा हेत । मनें कल्पिला संकेत ।
ब्रह्म कल्पनेरहित । जाणती ज्ञानी ।१५।

जें मनबुद्धिअगोचर । जें कल्पनेहून पर ।
तें अनुभवितां साचार । द्वैत कैंचें ।१६।

द्वैत पाहातां ब्रह्म नसें । ब्रह्म पाहातां द्वैत नासे ।
द्वैताद्वैत भासे । कल्पनेसी ।१७।

कल्पना माया निवारी । कल्पना ब्रह्म थावरी ।
संशय धरी आणी वारी । तेहि कल्पना ।१८।

कल्पना करी बंधन । कल्पना दे समाधान ।
ब्रह्मीं लावी अनुसंधान । तेहि कल्पना ।१९।

कल्पना द्वैताची माता । कल्पना ज्ञेप्ती तत्वता ।
बद्धता आणी मुक्तता । कल्पनागुणें ।२०।

कल्पना अंतरीं सबळ । नस्ते दावी ब्रह्मगोळ ।
क्षणा येकातें निर्मळ । स्वरूप कल्पी ।२१।

क्षणा येका धोका वाहे । क्षणा येका स्थिर राहे ।
क्षणा येका पाहे । विस्मित होउनी ।२२।

क्षणा येकातें उमजे । क्षणा येकातें निर्बुजे ।
नाना विकार करिजे । ते कल्पना जाणावी ।२३।

कल्पना जन्माचें मूळ । कल्पना भक्तीचें फळ ।
कल्पना तेचि केवळ । मोक्षदाती ।२४।

असो ऐसी हे कल्पना । साधनें दे समाधाना ।
येरवी हे पतना । मूळच कीं ।२५।

म्हणौन सर्वांचें मूळ । ते हे कल्पनाच केवळ ।
इचें केलियां निर्मूळ । ब्रह्मप्राप्ती ।२६।

श्रवण आणी मनन । निजध्यासें समाधान ।
मिथ्या कल्पनेचें भान । उडोन जाये ।२७।

शुद्ध ब्रह्माचा निश्चयो । करी कल्पनेचा जयो ।
निश्चितार्थें संशयो । तुटोन गेला ।२८।

मिथ्या कल्पनेचें कोडें । कैसें राहे साचापुढें ।
जैसें सूर्याचेनि उजेडें । नासे तम ।२९।

तैसें ज्ञानाचेनि प्रकाशें । मिथ्या कल्पना हे नासे ।
मग हें तुटे अपैसें । द्वैतानुसंधान ।३०।

कल्पनेनें कल्पना उडे । जैसा मृगें मृग सांपडे ।
कां शरें शर आतुडे । आकाशमार्गीं ।३१।

शुद्ध कल्पनेचें बळ । जालियां नासे सबळ ।
हेंचि वचन प्रांजळ । सावध ऐका ।३२।

शुद्ध कल्पनेची खूण । स्वयें कल्पिजे निर्गुण ।
सस्वरूपीं विस्मरण । पडोंचि नेदी ।३३।

सदा स्वरूपानुसंधान । करी द्वैताचें निर्शन ।
अद्वयनिश्चयाचें ज्ञान । तेचि शुद्ध कल्पना ।३४।

अद्वैत कल्पी ते शुद्ध । द्वैत कल्पी ते अशुद्ध ।
अशुद्ध तेचि प्रसिद्ध । सबळ जाणावी ।३५।

शुद्ध कल्पनेचा अर्थ । अद्वैताचा निश्चितार्थ ।
आणी सबळ वेर्थ । द्वैत कल्पी ।३६।

अद्वैतकल्पना प्रकाशे । तेचि क्षणीं द्वैत नासे ।
द्वैतासरिसी निरसे । सबळ कल्पना ।३७।

कल्पनेनें कल्पना सरे । ऐसी जाणावी चतुरें ।
सबळ गेलियां नंतरें । शुद्ध उरली ।३८।

शुद्ध कल्पनेचें रूप । तेंचि जें कल्पी स्वरूप ।
स्वरूप कल्पितां तद्रूप । होये आपण ।३९।

कल्पनेसी मिथ्यत्व आलें । सहजचि तद्रूप जालें ।
आत्मनिश्चयें नासिलें । कल्पनेसी ।४०।

जेचि क्षणीं निश्चये चळे । तेचि क्षणीं द्वैत उफाळे ।
जैसा अस्तमानीं प्रबळे । अंधकार ।४१।

तैसें ज्ञान होतां मळिण । अज्ञान प्रबळे जाण ।
याकारणें श्रवण । अखंड असावें ।४२।

आतां असो हें बोलणें जालें । आशंका फेडूं येका बोलें ।
जयास द्वैत भासलें । तें तूं नव्हेसी सर्वथा ।४३।

मागील आशंका फिटली । इतुकेन हे कथा संपली ।
पुढें वृत्ति सावध केली । पाहिजे श्रोतीं ।४४।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'द्वैतकल्पनानिरसननाम'
समास पाचवा समाप्त.

❑❑

दशक ७ : समास ६
बद्धमुक्तनिरूपण

॥ श्रीराम ॥

अद्वैत ब्रह्म निरोपिलें । जें कल्पनेरहित संचलें ।
क्षणयेक तदाकार केलें । मज या निरूपणें ।१।

परी म्यां तदाकार व्हावें । ब्रह्मचि होऊन असावें ।
पुन्हा संसारास न यावें । चंचळपणें सर्वथा ।२।

कल्पनारहित जें सुख । तेथें नाहीं संसारदुःख ।
म्हणोनि तेंचि येक । होऊन असावें । ३ ।
ब्रह्मचि होईजे श्रवणें । पुन्हा वृत्तीवरी लागे येणें ।
ऐसें सदा येणें जाणें । चुकेना कीं । ४ ।
मनें अंतरिक्ष जावें । क्षणयेक ब्रह्मचि व्हावें ।
पुन्हा तेथून कोंसळावें । वृत्तीवरी मागुतें । ५ ।
प्रत्यावृत्ती सैरावैरा । किती करूं येरझारा ।
पाईं लाउनियां दोरा । कीटक जैसा । ६ ।
उपदेशकाळीं तदाकार । होतां पडे हें शरीर ।
अथवा नेणे आपपर । ऐसें जालें पाहिजे । ७ ।
ऐसें नस्तां जें बोलणें । तेंचि वाटे लाजिरवाणें ।
ब्रह्म होऊन संसार करणें । हेंहि विपरीत दिसे । ८ ।
जो स्वयें ब्रह्मचि जाला । तो मागुता कैसा आला ।
ऐसें ज्ञान माझें मजला । प्रशस्त न वटे । ९ ।
ब्रह्मचि होऊन जावें । कां तें संसारींच असावें ।
दोहींकडे भरंगळावें । किती म्हणूनी । १० ।
निरूपणीं ज्ञान प्रबळे । उठोन जातां तें मावळे ।
मागुता कामक्रोध खवळे । ब्रह्मरूपासी । ११ ।
ऐसा कैसा ब्रह्म जाला । दोहींकडे अंतरला ।
वोडगस्तपणेंचि गेला । संसार त्याचा । १२ ।
घेतां ब्रह्मसुखाची गोडी । संसारिक मागें वोडी ।
संसार करितां आवडी । ब्रह्मीं उपजे मागुती । १३ ।
ब्रह्मसुख नेलें संसारें । संसार गेला ज्ञानद्वारें ।
दोनी अपुरीं पुरें । येकहि नाहीं । १४ ।

याकारणें माझें चित्त । चंचळ जालें दुश्चीत ।
काये करणें निश्चीत । येकहि नाहीं ।१५।

ऐसा श्रोता करी विनती । आतां राहावें कोणे रीतीं ।
म्हणे अखंड माझी मती । ब्रह्माकार नाहीं ।१६।

आतां याचें प्रत्योत्तर । वक्ता देईल सुंदर ।
श्रोतीं व्हावें निरोत्तर । क्षणयेक आतां ।१७।

ब्रह्मचि होऊन जे पडिले । तेचि मुक्तपदास गेले ।
येर ते काये बुडाले । व्यासादिक ।१८।

श्रोता विनती करी पुढती । शुको मुक्तो वामदेवो वा हे श्रुती ।
दोघेचि मुक्त आदिअंतीं । बोलतसे ।१९।

वेदें बद्ध केले सर्व । मुक्त शुक वामदेव ।
वेदवचनीं अभाव । कैसा धरावा ।२०।

ऐसा श्रोता वेदाधारें । देता झाला प्रत्योत्तरें ।
दोघेचि मुक्त अत्यादरें । प्रतिपाद्य केलें ।२१।

वक्ता बोले याउपरी । दोघेचि मुक्त सृष्टीवरी ।
ऐसें बोलतां उरी । कोणास आहे ।२२।

बहु ऋषि बहु मुनी । सिद्ध योगी आत्मज्ञानी ।
जाले पुरुष समाधानी । असंख्यात ।२३।

प्रह्लादनारदपराशरपुंडरीकव्यासांबरीषशुकशौनकभीष्मदाल्भ्यान् ।
रुक्मांगदार्जुनवसिष्ठबिभीषणादीन् पुण्यानिमान्परमभागवतान्स्मरामि ।

कविर्हरिरंतरिक्षः प्रबुद्धः पिप्पलायनः ।
आविर्होत्रोऽथ द्रुमिलश्चमसः करभाजनः ॥

याहि वेगळे थोर थोर । ब्रह्माविष्णुमहेश्वर ।
आदिकरून दिगंबर । विदेहादिक ।२४।

शुक वामदेव मुक्त जाले । येर हे अवघेचि बुडाले ।
या वचना विश्वासले । ते पढतमूर्ख ।२५।

तरी वेद कैसें बोलिला । तो काये तुम्ही मिथ्या केला ।
ऐकोन वक्ता देता जाला । प्रत्योत्तर । २ ६

वेद बोलिला पूर्वपक्ष । मूर्ख तेथेंचि लावी लक्ष ।
साधु आणी वित्पन्न दक्ष । त्यांस हें न मने ।२७।

तथापी हें जरी मानलें । तरी वेदसामर्थ्य बुडालें ।
वेदांचेनि उद्धरिलें । न वचे कोणा ।२८।

वेदाआंगी सामर्थ्य नसे । तरी या वेदास कोण पुसे ।
म्हणौनि वेदीं सामर्थ्य असे । जन उधरावया ।२९।

वेदाक्षर घडे ज्यासी । तो बोलिजे पुण्यरासी ।
म्हणौन वेदीं सामर्थ्यासी । काये उणें ।३०।

वेदशास्त्रपुराण । भाग्यें जालियां श्रवण ।
तेणें होईजे पावन । हें बोलती साधु ।३१।

श्लोक अथवा श्लोकार्ध । नाहीं तरी श्लोकपाद ।
श्रवण होतां येक शब्द । नाना दोष जाती ।३२।

वेदशास्त्रीं पुराणीं । ऐशा वाक्याच्या आईणी ।
अगाध महिमा व्यासवाणी । वदोन गेली ।३३।

येकाक्षर होतां श्रवण । तत्काळचि होईजे पावन ।
ऐसें ग्रंथाचें महिमान । ठाईं ठाईं बोलिलें ।३४।

दोहीवेगळा तिजा नुधरे । तरी महिमा कैंचा उरे ।
असो हें जाणिजे चतुरें । येरां गथागोवी ।३५।

वेदशास्त्रें पुराणें । कैसीं होतीं अप्रमाणें ।
दोघांवांचून तिसरा कोणें । उद्धरावा ।३६।

म्हणसी काष्ठीं लागोन पडला । तोचि येक मुक्त जाला ।
शुक तोहि अनुवादला । नाना निरूपणें ।३७।

शुक मुक्त ऐसें वचन । वेद बोलिला हें प्रमाण ।
परी तो नव्हता अचेतन । ब्रह्माकार ।३८।

अचेतन ब्रह्माकार । असता शुक योगेश्वर ।
तरी सारासारविचार । बोलणें न घडे ।३९।

जो ब्रह्माकार जाला । तो काष्ठ होऊन पडिला ।
शुक भागवत बोलिला । परीक्षितीपुढें ।४०।

निरूपण हें सारासार । बोलिला पाहिजे विचार ।
धांडोळावें सचराचर । दृष्टांताकारणें ।४१।

क्षण येक ब्रह्मचि व्हावें । क्षण येक दृश्य धांडोळावें ।
नाना दृष्टांतीं संपादावें । वगतृत्वासी ।४२।

असो भागवतनिरूपण । शुक बोलिला आपण ।
तया आंगीं बद्धपण । लाऊं नये कीं ।४३।

म्हणोनी बोलतां चालतां । निचेष्टित पडिलें नस्तां ।
मुक्ति लाभे सायोज्यता । सद्गुरुबोधें ।४४।

येक मुक्त येक नित्यमुक्त । येक जाणावे जीवन्मुक्त ।
येक योगी विदेहमुक्त । समाधानी ।४५।

सचेतन ते जीवन्मुक्त । अचेतन ते विदेहमुक्त ।
दोहिवेगळे नित्यमुक्त । योगेश्वर जाणावे ।४६।

स्वरूपबोधें स्तब्धता । ते जाणावी ताटस्तता ।
ताटस्तता आणी स्तब्धता । हा देहसमंधु ।४७।

येथें अनुभवासी कारण । येर सर्व निःकारण ।
तृप्ती पावावी आपण । आपुल्या स्वानुभवें ।।४८।।

कंठमर्याद जेविला । त्यास म्हणती भुकेला ।
तेणें शब्दें जाजावला । हें तों घडेना ।।४९।।

स्वरूपीं नाहीं देहो । तेथें काईसा संदेहो ।
बद्ध मुक्त ऐसा भावो । देहाचकडे ।।५०।।

देहबुद्धि धरून चिंती । मुक्त ब्रह्मादिक नव्हेती ।
तेथें शुकाची कोण गती । मुक्तपणाची ।।५१।।

मुक्तपण हेंचि बद्ध । मुक्त बद्ध हें अबद्ध ।
सस्वरूप स्वतसिद्ध । बद्ध ना मुक्त ।।५२।।

मुक्तपणाची पोटीं शिळा । बांधतां जाईजे पाताळा ।
देहबुद्धीचा आगळा । स्वरूपीं न संटे ।।५३।।

मीपणापासून सुटला । तोचि येक मुक्त जाला ।
मुका अथवा बोलिला । तरी तो मुक्त ।।५४।।

जयास बाधावें तें वाव । तेथें कैंचा मुक्तभाव ।
पाहों जातां सकळ वाव । गुणवार्ता ।।५५।।

बद्धो मुक्त इति व्याख्या गुणतो मे न वस्तुतः ।
गुणस्य मायामूलत्वान्न मे मोक्षो न बंधनम् ।।

तत्वज्ञाता परमशुद्ध । तयासी नाहीं मुक्त बद्ध ।
मुक्त बद्ध हा विनोद । मायागुणें ।।५६।।

जेथें नामरूप हें सरे । तेथें मुक्तपण कैंचें उरे ।
मुक्त बद्ध हें विसरे । विसरलेपणेंसीं ।।५७।।

बद्ध मुक्त जाला कोण । तो तरी नव्हे कीं आपण ।
बधक जाणावें मीपण । धर्त्यास बाधी ।५८।

एवं हा अवघा भ्रम । अहंतेचा जाला श्रम ।
मायातीत जों विश्राम । सेविला नाहीं ।५९।

असो बद्धता आणी मुक्तता । आली कल्पनेच्या माथां ।
ते कल्पना तरी तत्वता । साच आहे ।६०।

म्हणौनि हें मृगजळ । माया नाथिलें आभाळ ।
स्वप्न मिथ्या तत्काळ । जागृतीसी होये ।६१।

स्वप्नीं बद्ध मुक्त जाला । तो जागृतीस नाहीं आला ।
कैंचा कोण काये जाला । कांहीं कळेना ।६२।

म्हणोनि मुक्त विश्वजन । जयास जालें आत्मज्ञान ।
शुद्धज्ञानें मुक्तपण । समूळ वाव ।६३।

बद्ध मुक्त हा संदेहो । धरी कल्पनेचा देहो ।
साधु सदा निःसंदेहो । देहातीत वस्तु ।६४।

आतां असो हें पुढती । पुढें रहावें कोणे रिती ।
तेंचि निरूपण श्रोतीं । सावध परिसावें ।६५।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'बद्धमुक्तनिरूपण' नाम समास सहावा समाप्त.

❑❑

दशक ७ : समास ७

साधनप्रतिष्ठानिरूपण

॥ श्रीराम ॥

वस्तूसि जरी कल्पावें । तरी ते निर्विकल्प स्वभावें ।
तेथें कल्पनेच्या नांवें । सुन्याकार । १ ।

तथापि कल्पूं जातां । न ये कल्पनेच्या हातां ।
वोळखी ठाईं न पडे चित्ता । भ्रंश पडे । २ ।

कांहीं दृष्टीसचि न दिसे । मनास तेंहि न भासे ।
न भासे न दिसे कैसें । वोळखावें । ३ ।

पाहों जातां निराकार । मनासि पडे सुन्याकार ।
कल्पूं जातां अंधकार । भरला वाटे । ४ ।

कल्पूं जातां वाटे काळें । ब्रह्म काळें ना पिवळें ।
आरक्त निळें ना धवळें । वर्णरहित । ५ ।

जया वर्णविवंक्ती नसे । भासाहून अनारिसें ।
रूपचि नाहीं कैसें । वोळखावें । ६ ।

न दिसतां वोळखण । किती धरावी आपण ।
हें तों श्रमासीच कारण । होतसे । ७ ।

जो निर्गुण गुणातीत । जो अदृश्य अवेक्त ।
जो अचिंत्य चिंतनातीत । परम पुरुष । ८ ।

अचिंत्याव्यक्तरूपाय निर्गुणाय गुणात्मने ।
समस्तजगदाधारमूर्तये ब्रह्मणे नमः ॥

अचिंत्य तेंचि चिंतावें । अव्यक्तास आठवावें ।
निर्गुणास वोळखावें । कोणेपरी ।९।

जें दृष्टीसचि न पडे । जें मनासहि नातुडे ।
तया कैसें पाहाणें घडे । निर्गुणासी ।१०।

असंगाचा संग धरणें । निरावलंबीं वास करणें ।
निशब्दासी अनुवादणें । कोणेपरी ।११।

अचिंत्यासी चिंतूं जातां । निर्विकल्पासी कल्पितां ।
अद्वैताचें ध्यान करितां । द्वैतचि उठे ।१२।

आतां ध्यानचि सोडावें । अनुसंधान तें मोडावें ।
तरी मागुतें पडावें । माहां संशईं ।१३।

द्वैताच्या भेणें अंतरी । वस्तु न पाहिजे तरी ।
तेणें समाधाना उरी । कदा असेचिना ।१४।

सवे लावितां सवे पडे । सवे पडतां वस्तु आतुडे ।
नित्यानित्यविचारें घडे । समाधान ।१५।

वस्तु चिंततां द्वैत उपजे । सोडी करितां कांहींच नुमजे ।
सुन्यत्वसंदेहीं पडिजे । विवेकेंविण ।१६।

म्हणोनि विवेक धरावा । ज्ञानें प्रपंच सारावा ।
अहंभाव वोसरावा । परी तो वोसरेना ।१७।

परब्रह्म तें अद्वैत । कल्पितांच उठे द्वैत ।
तेथें हेत आणी दृष्टांत । कांहींच न चले ।१८।

तें आठवितां विसरिजे । कां तें विसरोनि आठविजे ।
जाणोनियां नेणिजे । परब्रह्म तें ।१९।

त्यास न भेटतां होये भेटी । भेटों जातां पडे तुटी ।
ऐसी हे नवल गोष्टी । मुकेपणाची ।२०।

तें साधूं जातां साधवेना । नांतरी सोडितां सुटेना ।
लागला समंध तुटेना । निरंतर ।२१।

तें असतचि सदां असे । नांतरी पाहातां दुरासे ।
न पाहातां प्रकाशे । जेथें तेथें ।२२।

जेथें उपाये तोचि अपाये । आणी अपाये तोचि उपाये ।
हें अनुभवेंविण काये । उमजों जाणें ।२३।

तें नुमजतांच उमजे । उमजोन कांहींच नुमजे ।
तें वृत्तीविण पाविजे । निवृत्तिपद ।२४।

तें ध्यानीं धरितां नये । चिंतनीं चिंतावें तें काये ।
मनामधें न समाये । परब्रह्म तें ।२५।

त्यास उपमे द्यावें जळ । तरी तें निर्मळ निश्चळ ।
विश्व बुडालें सकळ । तरी तें कोरडेंचि असे ।२६।

नव्हे प्रकाशासारिखें । अथवा नव्हे काळोखें ।
आतां तें कासयासारिखें । सांगावें हो ।२७।

ऐसें ब्रह्म निरंजन । कदा नव्हे दृश्यमान ।
लावावें तें अनुसंधान । कोणेपरी ।२८।

अनुसंधान लाऊं जातां । कांहीं नाहीं वाटे आतां ।
तेणें मनाचिया माथां । संदेह वाजे ।२९।

लटिकेंचि काये पाहावें । कोठें जाऊन राहावें ।
अभाव घेतला जीवें । सत्य स्वरूपाचा ।३०।

अभावचि म्हणों सत्य । तरी वेदशास्त्र कैसें मिथ्य ।
आणी व्यासादिकांचें कृत्य । वाउगें नव्हे ।३१।

म्हणोनि मिथ्या म्हणतां नये । बहुत ज्ञानाचे उपाये ।
बहुतीं निर्मिलें तें काये । मिथ्या म्हणावें ।३२।

अद्वैतज्ञानाचा उपदेश । गुरुगीता तो महेश ।
सांगता होये पार्वतीश । पार्वतीप्रती ।३३।

अवधूतगीता केली । गोरक्षीस निरोपिली ।
ते अवधूतगीता बोलिली । ज्ञानमार्ग ।३४।

विष्णु होऊन राजहंस । विधीस केला उपदेश ।
ते हंसगीता जगदीश । बोलिला स्वमुखें ।३५।

ब्रह्मा नारदा उपदेशित । चतुश्लोकी भागवत ।
पुढें व्यासमुखें बहुत । विस्तारलें ।३६।

वसिष्ठसार वसिष्ठऋषी । सांगता जाला रघुनाथासी ।
कृष्ण सांगे अर्जुनासी । सप्तश्लोकी गीता ।३७।

ऐसें सांगावें तें किती । बहुत ऋषी बोलिले बहुतीं ।
अद्वैत ज्ञान आदिअंतीं । सत्यचि असे ।३८।

म्हणोनि मिथ्या आत्मज्ञान । म्हणतां पाविजे पतन ।
प्रज्ञेरहित जे जन । तयांसी हें कळेना ।३९।

जेंथे शेषाची प्रज्ञा मंदली । श्रुतीस मौन्यमुद्रा पडिली ।
जाणपणें न वचे वदली । स्वरूपस्थिती ।४०।

आपणास नुमजे बरवें । म्हणोनि मिथ्या कैसें करावें ।
नातरी सदृढ धरावें । सद्गुरुमुखे ।४१।

मिथ्य तेंचि सत्य जालें । सत्य असोन मिथ्य केलें ।
संदेहसागरी बुडालें । अकस्मात मन ।४२।

मनास कल्पायाची सवे । मनें कल्पिले तें नव्हे ।
तेणे गुणें संदेह धावे । मीपणाचेनि पंथे ।४३।

तरी तो पथचि मोडावा । मग परमात्मा जोडावा ।
समूळ संदेह तोडावा । साधुचेनि संगतीं ।४४।

मीपण शस्त्रें तुटेना । मीपण फोडितां फुटेना ।
मीपण सोडितां सुटेना । कांहीं केल्यां ।४५।

मीपणें वस्तु नाकळे । मीपणें भक्ति मावळे ।
मीपणें शक्ति गळे । वैराग्याची ।४६।

मीपणें प्रपंच न घडे । मीपणें परमार्थ बुडे ।
मीपणें सकळहि उडे । येशकीर्तिप्रताप ।४७।

मीपणें मैत्री तुटे । मीपणें प्रीति आटे ।
मीपणें लिगटे । अभिमान आंगीं ।४८।

मीपणें विकल्प उठे । मीपणें कळह सुटे ।
मीपणें संमोह फुटे । ऐक्यतेचा ।४९।

मीपण कोणासिच न साहे । तें भगवंती कैसेनि साहे ।
म्हणौनि मीपण सांडून राहे । तोचि समाधानी ।५०।

मीपण कैसें त्यागावें । ब्रह्म कैसें अनुभवावें ।
समाधान कैंसे पावावें । कोणा प्रकारें ।५१।

मीपण जाणोनि त्यागावें । ब्रह्म होऊन अनुभवावें ।
समाधान तें पावावें । निःसंगपणे ।५२।

आणीक येक समाधान । मीपणेंविण साधन ।
करूं जाणे तोचि धन्य । समाधानी ।५३।

मी तों ब्रह्मचि जालों स्वता । साधन कोण करील आतां।
ऐसें मनीं कल्पूं जातां । कल्पनाचि उठे ।५४।

ब्रह्मीं कल्पना न साहे । तेचि तेथें उभी राहे ।
तयेसि शोधून पाहे । तोचि साधु ।५५।

निर्विकल्पासी कल्पावें । परी कल्पिते आपण न व्हावें ।
मीपणासि त्यागावें । येणें रिती ।५६।

या ब्रह्मविद्येच्या लपणी । कांहींच नसावें असोनी ।
दक्ष आणी समाधानी । तोचि हें जाणे ।५७।

जयासी आपण कल्पावें । तेंचि आपण स्वभावें ।
येथें कल्पनेच्या नांवें । सुन्य आलें ।५८।

पदीहून चळों नये । करावें साधन उपाये ।
तरीच सांपडे सोये । अलिप्तपणाची ।५९।

राजा राजपदीं असतां । उगीच चाले सर्व सत्ता ।
साध्यचि होऊन तत्वतां । साधन करावें ।६०।

साधन आलें देहाच्या माथां । आपण देह नव्हे सर्वथा ।
ऐसा करूनि अकर्ता । सहजचि जाला ।६१।

देह आपण ऐसें कल्पावें । तरीच साधन त्यागावें ।
देहातीत अस्तां स्वभावें । देह कैचां ।६२।

ना तें साधन ना तें देह । आपला आपण निःसंदेह ।
देहींच असोन विदेह । स्थिति ऐसी ।६३।

साधनेंविण ब्रह्म होतां । लागों पाहे देहममता ।
आळस प्रबळे तत्वतां । ब्रह्मज्ञानमिसें ।६४।

परमार्थमिसें अर्थ जागे । ध्यानमिसें निद्रा लागे ।
मुक्तिमिसें दोष भोगे । अनर्गळता ।६५।

निरूपणमिसें निंदा घडे । संवादमिसें वेवाद पडे ।
उपाधीमिसें येऊन जडे । अभिमान आंगीं ।६६।

तैसा ब्रह्मज्ञानमिसें । आळस अंतरीं प्रवेशे ।
म्हणे साधनाचें पिसें । काये करावें ।६७।

किं करोमि क्व गच्छामि किं गृह्णामि त्यजामि किम् ।
आत्मना पूरितं सर्वं महाकल्पांबुना यथा ॥

वचन आधारीं लाविलें । जैसें शस्त्र फिराविलें ।
स्वता हाणोन घेतलें । जयापरी ।६८।

तैसा उपायाचा अपाये । विपरीतपणें स्वहित जाये ।
साधन सोडितां होये । मुक्तपणें बद्ध ।६९।

साधन करितां च सिद्धपण । हातींचें जाईल निघोन ।
तेणें गुणें साधन । करूंच नावडे ।७०।

लोक म्हणती हा साधक । हेचि लज्या वाटे येक ।
साधन करिती ब्रह्मादिक । हें ठाउकें नाहीं ।७१।

आतां असो हे अविद्या । अभ्याससारणी विद्या ।
अभ्यासें पाविजे अद्या । पूर्ण ब्रह्म ।७२।

अभ्यास करावा कवण । ऐसा श्रोता करी प्रश्न ।
परमार्थाचें साधन । बोलिलें पाहिजे ।७३।

याचें उत्तर श्रोतयांसी । दिधलें पुढिले समासीं ।
निरोपिलें साधनासी । परमार्थाच्या ।७४।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'साधनाप्रतिष्ठानाम'
समास सातवा समाप्त.

❑❑

दशक ७ : समास ८

श्रवणनिरूपण

॥ श्रीराम ॥

ऐका परमार्थाचें साधन । जेणें होये समाधान ।
तें तूं जाण गा श्रवण । निश्चयेंसीं । १ ।

श्रवणें आतुडे भक्ती । श्रवणें उद्धवे विरक्ती ।
श्रवणें तुटे आसक्ती । विषयांची । २ ।

श्रवणें घडे चित्तशुद्धी । श्रवणें होये दृढबुद्धी ।
श्रवणें तुटे उपाधी । अभिमानाची । ३ ।

श्रवणें निश्चयो घडे । श्रवणें ममता मोडे ।
श्रवणें अंतरीं जडे । समाधान । ४ ।

श्रवणें आशंका फिटे । श्रवणें संशय तुटे ।
श्रवण होतां पालटे । पूर्वगुण आपुला । ५ ।

श्रवणें आवरे मन । श्रवणें घडे समाधान ।
श्रवणें तुटे बंधन । देहबुद्धीचें । ६ ।

श्रवणें मीपण जाये । श्रवणें धोका न ये ।
श्रवणें नाना अपाये । भस्म होती । ७ ।

श्रवणें होये कार्यसिद्धी । श्रवणें लागे समाधी ।
श्रवणें घडे सर्व सिद्धी । समाधानासी । ८ ।

सत्संगावरी श्रवण । तेणें कळे निरूपण ।
श्रवणें होईजे आपण । तदाकार । ९ ।

श्रवणें प्रबोध वाढे । श्रवणें प्रज्ञा चढे ।
श्रवणें विषयांचे वोढे । तुटोन जाती । १० ।

श्रवणें विचार कळे । श्रवणें ज्ञान हें प्रबळे ।
श्रवणें वस्तु निवळे । साधकासी ।११।

श्रवणें सद्‌बुद्धि लागे । श्रवणें विवेक जागे ।
श्रवणें मन हे मागे । भगवंतासी ।१२।

श्रवणें कुसंग तुटे । श्रवणें काम वोहटे ।
श्रवणें धोका आटे । येकसरां ।१३।

श्रवणें मोह नासे । श्रवणें स्फूर्ति प्रकाशे ।
श्रवणें सद्‌वस्तु भासे । निश्चयात्मक ।१४।

श्रवणें होय उत्तम गती । श्रवणें आतुडे शांती ।
श्रवणें पाविजे निवृत्ती । अचळ पद ।१५।

श्रवणा ऐसें सार नाहीं । श्रवणें घडे सर्व कांहीं ।
भवनदीचा प्रवाहीं । तरणोपाव श्रवणें ।१६।

श्रवण भजनाचा आरंभ । श्रवण सर्वीं सर्वारंभ ।
श्रवणें होये स्वयंभ । सर्व कांहीं ।१७।

प्रवृत्ती अथवा निवृत्ती । श्रवणेंविण न घडे प्राप्ती ।
हे तों सकळांस प्रचिती । प्रत्यक्ष आहे ।१८।

ऐकिल्याविण कळेना । हें ठाउकें आहे जना ।
याकारणें मूळ प्रेत्ना । श्रवण आधीं ।१९।

जें जन्मीं ऐकिलेंचि नाहीं । तेथें पडिजे संदेहीं ।
म्हणोनियां दुजें कांहीं । साम्यता न घडे ।२०।

बहुत साधनें पाहातां । श्रवणास न घडे साम्यता ।
श्रवणेंविण तत्वतां । कार्य न चले ।२१।

न देखतां दिनकर । पडे अवघा अंधकार ।
श्रवणेंविण प्रकार । तैसा होये ।२२।

कैसी नवविधा भक्ती । कैसी चतुर्विधा मुक्ती ।
कैसी आहे सहजस्थिती । हें श्रवणेंविण न कळे ।२३।

न कळे शड्कर्माचरण । न कळे कैसें पुरश्चरण ।
न कळे कैसें उपासन । विधियुक्त ।२४।

नाना व्रतें नाना दानें । नाना तपें नाना साधनें ।
नाना योग तीर्थाटणें । श्रवणेंविण न कळती ।२५।

नाना विद्या पिंडज्ञान । नाना तत्त्वांचे शोधन।
नाना कळा ब्रह्मज्ञान । श्रवणेंविण न कळे ।२६।

आठराभार वनस्पती । येका जळें प्रबळती ।
येका रसें उत्पत्ती । सकळ जीवांची ।२७।

सकळ जीवां येक पृथ्वी । सकळ जीवां येक रवी ।
सकळ जीवां वर्तवी । येक वायो ।२८।

सकळ जीवां येक पैस । जयास बोलिजे आकाश ।
सकळ जीवांचा वास । येका परब्रह्मीं ।२९।

तैसें सकळ जीवांस मिळोन । सार येकचि साधन ।
तें हें जाण श्रवण । प्राणीमात्रांसी ।३०।

नाना देश भाषा मतें । भूमंडळीं असंख्यातें ।
सर्वांस श्रवणापरतें । साधनचि नाहीं ।३१।

श्रवणें घडे उपरती । बद्धाचे मुमुक्ष होती ।
मुमुक्षाचे साधक अती । नेमेंसिं चालती ।३२।

साधकाचे होती सिद्ध । आंगीं बाणतां प्रबोध ।
हें तों आहे प्रसिद्ध । सकळांस ठाउकें ।३३।

ठाईंचे खळ चांडाळ । तेचि होती पुण्यसिळ ।
ऐसा गुण तत्काळ । श्रवणाचा ।३४।

जो दुर्बुद्धि दुरात्मा । तोचि होये पुण्यात्मा ।
अगाध श्रवणाचा महिमा । बोलिला न वचे ।।३५।।

तीर्थांव्रतांची फळश्रुती । पुढें होणार सांगती ।
तैसें नव्हे हातीचा हातीं । सप्रचित श्रवण ।।३६।।

नाना रोग नाना व्याधी । तत्काळ तोडिजे औषधी ।
तैसी आहे श्रवणसिद्धी । अनुभवी जाणती ।।३७।।

श्रवणाचा विचार कळे । तरीच भाग्यश्री प्रगटे बळें ।
मुख्य परमात्माच आकळे । स्वानुभवासी ।।३८।।

या नाव जाणावें मनन । अर्थालागीं सावधान ।
निजध्यासें समाधान । होत असे ।।३९।।

बोलिल्याचा अर्थ कळे । तरीच समाधान निवळे ।
अकस्मात अंतरीं वोळे । निःसंदेहता ।।४०।।

संदेह जन्माचें मूळ । तें श्रवणें होये निर्मूळ ।
पुढें सहजचि प्रांजळ । समाधान ।।४१।।

जेथें नाहीं श्रवण मनन । तेथें कैचें समाधान ।
मुक्तपणाचें बंधन । जडलें पाई ।।४२।।

मुमुक्ष साधक अथवा सिद्ध । श्रवणेंविण तो अबद्ध ।
श्रवणमननें शुद्ध । चित्तवृत्ति होये ।।४३।।

जेथें नाहीं नित्य श्रवण । तें जाणावें विलक्षण ।
तेथें साधकें येक क्षण । क्रमूं नये सर्वथा ।।४४।।

जेथें नाहीं श्रवणस्वार्थ । तेथें कैंचा हो परमार्थ ।
मागें केलें तितुकें वेर्थ । श्रवणेंविण होये ।।४५।।

तस्मात् श्रवण करावें । साधन मनीं धरावें ।
नित्यनेमें तरावें । संसारसागरीं ।।४६।।

सेविलेंच सेवावें अन्न । घेतलेंचि घ्यावें जीवन ।
तैसें श्रवणमनन । केलेंचि करावें ।४७।

श्रवणाचा अनादर । आळसें करी जो नर ।
त्याचा होय अपहार । स्वहितविषईं ।४८।

आळसाचें संरक्षण । परमार्थाची बुडवण ।
याकारणें श्रवण । केलेंचि पाहिजे ।४९।

आतां श्रवण कैसें करावें । कोण्या पंथास पाहावें ।
पुढिले समासीं आघवें । सांगिजेल ।५०।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'श्रवणनिरूपणनाम'
समास आठवा समाप्त.

❑❑

दशक ७ : समास ९
श्रवणनिरूपण

॥ श्रीराम ॥

आतां श्रवण कैसें करावें । तेंहि सांगिजेल अघवें ।
श्रोतां अवधान द्यावें । येकचित्तें । १ ।

येक वगतृत्व श्रवणीं पडे । तेणें जालें समाधान मोडे ।
केला निश्चय विघडे । अकस्मात । २ ।

तें वगतृत्व त्यागावें । जें माईक स्वभावें ।
जेथें निश्चयाचा नांवें । सुन्याकार । ३ ।

येक्या ग्रंथें निश्चय केला । तो दुजयानें उडविला ।
तेणें संशयोचि वाढला । जन्मवरी । ४ ।

जेथें संशय तुटती । होये आशंकानिवृत्ती ।
अद्वैत ग्रंथ परमार्थी । श्रवण करावे । ५ ।

जो मोक्षाचा अधिकारी । तो परमार्थपंथ धरी ।
प्रीति लागली अंतरीं । अद्वैतग्रंथाची । ६ ।

जेणें सांडिला इहलोक । जो परलोकींचा साधक ।
तेणें पाहावा विवेक । अद्वैतशास्त्रीं । ७ ।

जयास पाहिजे अद्वैत । तयापुढें ठेवितां द्वैत ।
तेणें क्षोभलें उठे चित्त । तया श्रोतयाचें । ८ ।

आवडीसारिखें मिळे । तेणें सुखचि उचंबळे ।
नाहीं तरी कंटाळे । मानस ऐकतां । ९ ।

ज्याची उपासना जैसी । त्यासी प्रीति वाटे तैसी ।
तेथें वर्णितां दुजयासी । प्रशस्त न वटे ।१०।

प्रीतीचें लक्षण ऐसें । अंतरीं उठे अनायासें ।
पाणी पाणवाटें जैसें । आपणचि धांवे ।११।

तैसा जो आत्मज्ञानी नर । तयास नावडे इतर ।
तेथें पाहिजे सारासार । विचारणा ते ।१२।

जेथें कुळदेव्या भगवती । तेथें पाहिजे सप्तशती ।
इतर देवांची स्तुती । कामा न ये सर्वथा ।१३।

घेतां अनंताच्या व्रता । तेथें नलगे भगवद्गीता ।
साधुजनासी वार्ता । फळाशेची नाहीं ।१४।

वीरकंकण घालितां नाकीं । परीं तें शोभा पावेना कीं ।
जेथील तेथें आणिकीं । कामा न ये सर्वथा ।१५।

नाना माहात्में बोलिलीं । जेथील तेथें वंद्य जालीं ।
विपरीत करून वाचिलीं । तरी तें विलक्षण ।१६।

मलारमाहात्म द्वारकेसी । द्वारकामाहात्म नेलें कासीं ।
कासीमाहात्म वेंकटसीं । शोभा न पवे ।१७।

ऐसें सांगतां असे वाड । परी जेथील तेथेंचि गोड ।
तैसी ज्ञानीयांस चाड । अद्वैत ग्रंथाची ।१८।

योगीयांपुढें राहाण । परीक्षवंतांपुढें पाषाण ।
पंडितांपुढें डफगाण । शोभा न पवे ।१९।

वेदज्ञापुढें जती । निस्पृहापुढें फळश्रुती ।
ज्ञानीयांपुढें पोथी । कोकशास्त्राची ।२०।

ब्रह्मचर्यापुढें नाचणी । रासक्रीडा निरूपणीं ।
राजहंसापुढें पाणी । ठेविलें जैसें ।२१।

तैसें अंतर्निष्ठांपुढें । ठेविलें शृंघारिक टिपडें ।
तेणें त्याचें कैसें घडे । समाधान ।२२।

रायास रंकाची आशा । तक्र सांगणें पीयूषा ।
संन्याशासी वोवसा । उचिष्ट चांडाळी ।२३।

कर्मनिष्ठां वशीकर्ण । पंचाक्षरी निरूपण ।
तेथें भंगे अंतःकर्ण । सहजचि त्याचें ।२४।

तैसे परमार्थिक जन । तयांस नस्तां आत्मज्ञान ।
ग्रंथ वाचितां समाधान । होणार नाहीं ।२५।

आतां असो हें बोलणें । जयासि स्वहित करणें ।
तेणें सदा विचरणें । अद्वैतग्रंथीं ।२६।

आत्मज्ञानी येकचित्त । तेणें पाहाणें अद्वैत ।
येकांत स्थळीं निवांत । समाधान ।२७।

बहुत प्रकारें पाहातां । ग्रंथ नाहीं अद्वैतापरता ।
परमार्थास तत्वतां । तारूंच कीं ।२८।

इतर जे प्रपंचिक । हास्य विनोद नवरसिक ।
हित नव्हे तें पुस्तक । परमार्थासी ।२९।

जेणें परमार्थ वाढे । आंगीं अनुताप चढे ।
भक्तीसाधन आवडे । त्या नांव ग्रंथ ।३०।

जो ऐकतांच गर्व गळे । कां ते भ्रांतीच मावळे ।
नातरी येकसरें वोळे । मन भगवंतीं ।३१।

जेणें होये उपरती । अवगुण पालटती ।
जेणें चुके अधोगती । त्या नांव ग्रंथ ।३२।

जेणें धारिष्ट चढे । जेणें परोपकार घडे ।
जेणें विषयवासना मोडे । त्या नांव ग्रंथ ।३३।

जेणें परत्रसाधन । जेणें ग्रंथें होये ज्ञान ।
जेणें होईजे पावन । या नांव ग्रंथ ।३४।

ग्रंथ बहुत असती । नाना विधानें फळश्रुती ।
जेथें नुपजे विरक्ती भक्ती । तो ग्रंथचि नव्हे ।३५।

मोक्षेंविण फळश्रुती । ते दुराशेची पोथी ।
ऐकतां ऐकतां पुढती । दुराशाचि वाढे ।३६।

श्रवणीं लोभ उपजेल जेथें । विवेक कैंचा असेल तेथें ।
बैसलीं दुराशेचीं भूतें । तया अधोगती ।३७।

ऐकोनिच फळश्रुती । पुढें तरि पावोन म्हणती ।
तयां जन्म अधोगती । सहजचि जाली ।३८।

नाना फळें पक्षी खाती । तेणेंचि तयां होये तृप्ति ।
परी त्या चकोराचे चित्तीं । अमृत वसे ।३९।

तैसें संसारी मनुष्य । पाहे संसाराची वास ।
परी ते भगवंताचे अंश । भगवंतचि इछिती ।४०।

ज्ञानियास पाहिजे ज्ञान । भजकास पाहिजे भजन ।
साधकास पाहिजे साधन । इछेसारिखें ।४१।

परमार्थ्यास परमार्थ । स्वार्थ्यास पाहिजे स्वार्थ ।
कृपणास पाहिजे अर्थ । मनापासुनी ।४२।

योगियांस पाहिजे योग । भोगियांस पाहिजे भोग ।
रोगियांस पाहिजे रोग- । हर्ति मात्रा ।४३।

कवीस पाहिजे प्रबंद । तार्किकांस तर्कवाद ।
भाविकांस संवाद । गोड वाटे ।४४।

पंडितांस पाहिजे वित्पत्ती । विद्वांसास अधेनप्रीती ।
कळावंतां आवडती । नाना कळा ।४५।

हरिदासा आवडे कीर्तन । सुचिस्मंतां संध्यास्नान ।
कर्मनिष्ठां विधिविधान । पाहिजे तें ।४६।

प्रेमळांस पाहिजे करुणा । दक्षता पाहिजे विचक्षणां ।
चातुर्य पाहे शाहाणा । आदरेंसीं ।४७।

भक्त पाहे मूर्तिध्यान । संगीत पाहे ताळज्ञान ।
रागज्ञानी तानमान । मूर्छना पाहे ।४८।

योगाभ्यासी पिंडज्ञान । तत्वज्ञासि तत्वज्ञान ।
नाडिज्ञानी मात्राज्ञान । पाहातुसे ।४९।

कामिक पाहे कोकशास्त्र । चेटकी पाहे चेटकमंत्र ।
यंत्री पाहे नाना यंत्र । आदरेंसीं ।५०।

टवाळां आवडे विनोद । उन्मत्तास नाना छंद ।
तामसास अप्रमाद । गोड वाटे ।५१।

मूर्ख होये नादलुब्धी । निंदक पाहे उणी संधी ।
पापी पाहे पापबुद्धि । लाऊन आंगीं ।५२।

येकां पाहिजे रसाळ । येकां पाहिजे पाल्हाळ ।
येकां पाहिजे केवळ । साबडी भक्ती ।५३।

आगमी पाहे आगम । शूर पाहे संग्राम ।
येक पाहाती नाना धर्म । इछेसारिखे ।५४।

मुक्त पाहे मुक्तलीळा । सर्व पाहे सर्व कळा ।
जोतिषी भविष्य पिंगळा । वर्णू पाहे ।५५।

ऐसें सांगावें तें किती । आवडीसारिखें ऐकती ।
नाना पुस्तकें वाचिती । सर्वकाळ ।५६।
परी परत्र साधनेंविण । म्हणों नये तें श्रवण ।
जेथें नाहीं आत्मज्ञान । तया नांव कर्मणा ।५७।
गोडीविण गोडपण । नाकेंविण सुलक्षण ।
ज्ञानेंविण निरूपण । बोलोंचि नये ।५८।
आतां असो हें बहुत । ऐकावा परमार्थग्रंथ ।
परमार्थग्रंथेंविण वेर्थ । गथागोवी ।५९।
म्हणोनि नित्यानित्यविचार । जेथें बोलिला सारासार।
तोचि ग्रंथ पैलपार । पाववी विवेवें ।६०।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'श्रवणनिरूपणनाम'
समास नववा समाप्त.

❑❑

दशक ७ : समास १०

देहांतनिरूपण

॥ श्रीराम ॥

मिथ्या तेंचि जालें सत्य । सत्य तेंचि जालें असत्य ।
मायाविभ्रमाचें कृत्य । ऐसें असे पाहातां । १ ।
सत्य कळाया कारणें । बोलिलीं नाना निरूपणें ।
तरी उठेना धरणें । असत्याचें । २ ।
असत्य अंतरीं बिंबलें । न सांगतां तें दृढ जालें ।
सत्य असोन हारपलें । जेथील तेथें । ३ ।
वेदशास्त्रें पुराणें सांगती । सत्याचा निश्चय करिती ।
तरी नये आत्मप्रचिती । सत्यस्वरूप । ४ ।

सत्य असोन आछ्यादलें । मिथ्या नसोन सत्य जालें ।
ऐसें विपरीत वर्तलें । देखत देखतां । ५ ।

ऐसी मायेची करणी । कळों आली तत्क्षणीं ।
संतसंगें निरूपणीं । विचार घेतां । ६ ।

मागां जालें निरूपण । देखिलें आपणासि आपण ।
तेणें बाणली खूण । परमार्थाची । ७ ।

तेणें समाधान जालें । चित्त चैतंनीं मिळालें ।
निजस्वरूपें वोळखिलें । निजवस्तुसी । ८ ।

प्रारब्धीं टाकिला देहो । बोधें फिटला संदेहो ।
आतांचि पडो अथवा राहो । मिथ्या कळीवर । ९ ।

ज्ञानियांचें जें शेरीर । तें मिथ्यत्वें निर्विकार ।
जेथें पडे तेचि सार । पुण्यभूमी ।१०।

साधुदर्शनें पावन तीर्थ । पुरती त्यांचे मनोरथ ।
साधु न येतां जिणें वेर्थ । तयां पुण्यक्षेत्रांचे ।११।

पुण्यनदीचें जें तीर । तेथें पडावें शरीर ।
हा इतर जनाचा विचार । साधु नित्यमुक्त ।१२।

उत्तरायेण तें उत्तम । दक्षणायेन तें अधम ।
हा संदेहीं वसे भ्रम । साधु तो निःसंदेह ।१३।

शुक्लपक्ष उत्तरायेण । गृहीं दीप दिवा मरण ।
अंतीं राहावें स्मरण । गतीकारणें ।१४।

इतुकें नलगे योगियांसी । तो जीतचि मुक्त पुण्यरासी ।
तिळांजुळी पापपुण्यासी । दिधली तेणें ।१५।

देहाचा अंत बरा आला । देह सुखरूप गेला ।
त्यासी म्हणती धन्य जाला । अज्ञान जन ।१६।

जनाचें विपरीत मत । अंतीं भेटतो भगवंत ।
ऐसें कल्पून घात । करिती आपुला स्वयें ।१७।

जितां सार्थक नाहीं केलें । वेर्थ आयुष्य निघोन गेलें ।
मुळीं धान्येचि नाहीं पेरिलें । तें उगवेल कैंचें ।१८।

जरी केलें ईश्वरभजन । तरीच होईजे पावन ।
जैसें वेव्हारितां धन । रासि माथां लाभे ।१९।

दिधल्याविण पाविजेना । पेरल्याविण उगवेना ।
ऐसें हें वाक्य जना । ठाउकेंचि आहे ।२०।

न करितां सेवेच्या व्यापारा । स्वामीस म्हणे कोठें मुशारा ।
तैसें अंतीं अभक्त नरां । स्वहित न घडे ।२१।

जितां नाहीं भगवद्भक्ती । मेल्यां कैंची होईल मुक्ती ।
असो जे जे जैसें करिती । ते ते पावती तैसें ।२२।

एवं न करितां भगवद्भजन । अंतीं नव्हीजे पावन ।
जरी आलें बरें मरण । तरी भक्तीविण अधोगति।२३।

म्हणौन साधूनें आपलें । जीत अस्ताच सार्थक केलें ।
शरीर कारणीं लागलें । धन्य त्याचें ।२४।

जे कां जीवन्मुक्त ज्ञानी । त्यांचें शरीर पडो रानीं ।
अथवा पडो स्मशानीं । तरी धन्य जालें ।२५।

साधूचा देह खितपला । अथवा श्वानादिकीं भक्षिला ।
हें प्रशस्त न वटे जनाला । मंदबुद्धीस्तव ।२६।

अंत बरा नव्हेचि म्हणोन । कष्टी होती इतर जन ।
परी बापुडे अज्ञान । नेणती वर्म ।२७।

जो जन्मलाच नाहीं ठाईंचा । त्यास मृत्य येईल कैंचा ।
विवेकबळें जन्ममृत्याचा । घोट भरिला जेणें ।२८।

स्वरूपानुसंधानबळें । सगळी मायाच नाडळे ।
तयाचा पार न कळे । ब्रह्मादिकासी ।२९।

तो जीतिच असतां मेला । मरणास मारून ज्याला ।
जन्ममृत्य न स्मरे त्याला । विवेकबळें ।३०।

जो जनीं दिसतो परी वेगळा । वर्ततां भासे निराळा ।
दृश्यपदार्थ त्या निर्मळा । स्पर्शलाचि नाहीं ।३१।

असो ऐसे साधुजन । त्यांचें घडलियां भजन ।
तेणें भजनें पावन । इतर जन होती ।३२।

सद्गुरूचा जो अंकित साधक । तेणें केलाचि करावा विवेक ।
विवेक केलियां तर्क । फुटे निरूपणीं ।३३।

हेंचि साधकासी निरवणें । अद्वैत प्रांजळ निरूपणें ।
तुमचेंहि समाधान बाणे । साधूच ऐसें ।३४।

जो संतांस शरण गेला । तो संतचि होऊन ठेला ।
इतर जनास उपेगा आला । कृपाळूपणें ।३५।

ऐसें संतांचे महिमान । संतसंगें होतें ज्ञान ।
सत्संगापरतें साधन । आणीक नाहीं ।३६।

गुरुभजनाचेंनि आधारें । निरूपणाचेनि विचारें ।
क्रियाशुद्ध निधरिं । पाविजे पद ।३७।

परमार्थाचें जन्मस्थान । तेंचि सद्गुरूचें भजन ।
सद्गुरुभजनें समाधान । अकस्मात बाणे ।३८।

देह मिथ्या जाणोनि जीवें । याचें सार्थकचि करावें ।
भजनभावें तोषवावें । चित्त सद्गुरूचें ।३९।

शरणांगतांची वाहे चिंता । तो येक सद्गुरू दाता ।
जैसें बाळक वाढवी माता । नाना येत्नें करूनी ।४०।

म्हणौन सद्गुरूचें भजन । जयासि घडे तोचि धन्य ।
सद्गुरुविण समाधान । आणीक नाहीं ।४१।

सरली शब्दाची खटपट । आला ग्रंथाचा सेवट ।
येथें सांगितलें पष्ट । सद्गुरुभजन ।४२।

सद्गुरुभजनापरतें कांहीं । मोक्षदायेक दुसरें नाहीं ।
जयास न मने तेंहीं । अवलोकावी गुरुगीता ।४३।

तेथें निरोपिलें बरवें । पार्वतीप्रति सदाशिवें ।
याकारणें सद्भावें । सद्गुरुचरण सेवावे ।४४।

जो ये ग्रंथींचा विवेक । विवंचूनि पाहे साधक ।
तयास सांपडे येक । निश्चय ज्ञानाचा ।४५।

जें ग्रंथीं बोलिलें अद्वैत । तो म्हणों नये प्राकृत ।
सत्य जाणावा वेदांत । अर्थविषईं ।४६।

प्राकृतें वेदांत कळे । सकळ शास्त्रीं पाहातां मिळे ।
आणी समाधान निवळे । अंतर्यामीं ।४७।

तें प्राकृत म्हणों नये । जेथें ज्ञानाचे उपाये ।
मूर्खासि हें कळे काये । मर्कटा नारिकेळ जैसें ।४८।

आतां असो हें बोलणें । अधिकारपरत्वें घेणें ।
शिंपीमधील मुक्त उणें । म्हणों नये ।४९।

जेथे नेति नेति श्रुती । तेथें न चले भाषावित्पत्ती ।
परब्रह्म आदिअंतीं । अनुर्वाच्य ।५०।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'देहान्तनिरूपणनाम'
समास दहावा समाप्त.

❑❑

दशक सातवा समाप्त

❑❑

दशक आठवा : मायोद्भव अथवा ज्ञानदशक

दशक ८ : समास १

देवदर्शन

॥ श्रीराम ॥

श्रोतीं व्हावें सावध । विमळ ज्ञान बाळबोध ।
गुरुशिष्यांचा संवाद । अति सुगम परियेसा । १ ।

नाना शास्त्रें धांडोळितां । आयुष्य पुरेना सर्वथा ।
अंतरीं संशयाची वेथा । वाढोंचि लागे । २ ।

नाना तीर्थें थोरथोरें । सृष्टीमध्यें अपारें ।
सुगमें दुर्गमें दुष्करें । पुण्यदायकें । ३ ।

ऐसी तीर्थें सर्वहि करी । ऐसा कोण रे संसारीं ।
फिरों जातां जन्मवरी । आयुष्य पुरेना । ४ ।

नाना तपें नाना दानें । नाना योग नाना साधनें ।
हें सर्वहि देवाकारणें । करिजेत आहे । ५ ।

पावावया देवाधिदेवा । बहुविध श्रम करावा ।
तेणें देव ठाईं पाडावा । हें सर्वमत । ६ ।

पावावया भगवंतातें । नाना पंथ नाना मतें ।
तया देवाचें स्वरूप तें । कैसें आहे । ७ ।

बहुत देव सृष्टीवरी । त्यांची गणणा कोण करी ।
येक देव कोणेपरी । ठाईं पडेना । ८ ।

बहुविध उपासना । ज्याची जेथें पुरे कामना ।
तो तेथेंचि राहिला मना । सदृढ करूनि ।९।

बहु देव बहु भक्त । इछ्या जाले आसक्त ।
बहु ऋषी बहु मत । वेगळालें ।१०।

बहु निवडितां निवडेना । येक निश्चय घडेना ।
शास्त्रें भांडती पडेना । निश्चय ठाईं ।११।

बहुत शास्त्रीं बहुत भेद । मतांमतांस विरोध ।
ऐसा करितां वेवाद । बहुत गेले ।१२।

सहस्त्रामधें कोणी येक । पाहे देवाचा विवेक ।
परी त्या देवाचें कौतुक । ठाईं न पडे ।१३।

ठाईं न पडे कैसें म्हणतां । तेथें लागली अहंता ।
देव राहिला परता । अहंतागुणें ।१४।

आतां असों हे बोलणें । नाना योग ज्याकारणें ।
तो देव कोण्या गुणें । ठाईं पडे ।१५।

देव कोणासी म्हणावें । कैसें तयासी जाणावें ।
तेंचि बोलणें स्वभावें । बोलिजेल ।१६।

जेणें केलें चराचर । केले सृष्ट्यादि व्यापार ।
सर्वकर्ता निरंतर । नाम ज्याचें ।१७।

तेणें केल्या मेघमाळा । चंद्रबिंबीं अमृतकळा ।
तेज दिधलें रविमंडळा । जया देवें ।१८।

ज्याची मर्यादा सागरा । जेणें स्थापिलें फणिवरा ।
जयाचेनि गुणें तारा । अंतरिक्ष ।१९।

च्यारी खाणी च्यारी वाणी । चौऱ्यासि लक्ष जीवयोनी ।
जेणें निर्मिले लोक तिनी । तया नांव देव ।२०।

ब्रह्मा विष्णु आणी हर । हे जयाचे अवतार ।
तोचि देव हा निर्धार । निश्चयेंसीं ।।२१।

देव्हाराचा उठोनि देव । करूं नेणे सर्व जीव ।
तयाचेनि ब्रह्मकटाव । निर्मिला न वचे ।।२२।

ठाईं ठाईं देव असती । तेहिं केली नाहीं क्षिती ।
चंद्र सूर्य तारा जीमूती । तयांचेनि नव्हे ।।२३।

सर्वकर्ता तोचि देव । पाहों जातां निरावेव ।
ज्याची कळा लीळा लाघव । नेणती ब्रह्मादिक ।।२४।

येथें आशंका उठिली । ते पुढीलीये समासीं फिटली ।
आतां वृत्ती सावध केली । पाहिजे श्रोतीं ।।२५।

पैस अवकाश आकाश । कांहींच नाहीं जें भकास ।
तये निर्मळीं वायोस । जन्म जाला ।।२६।

वायोपासून जाला वन्ही । वन्हीपासुनी जालें पाणी ।
ऐसी जयाची करणी । अघटित घडली ।।२७।

उदकापासून सृष्टि जाली । स्तंभेंविण उभारली ।
ऐसी विचित्र कळा केली । या नांव देव ।।२८।

देवें निर्मिली हे क्षिती । तिचे पोटीं पाषाण होती ।
तयासचि देव म्हणती । विवेकहीन ।।२९।

जो सृष्टिनिर्माणकर्ता । तो ये सृष्टीपूर्वी होता ।
मग हे तयाची सत्ता । निर्माण जाली ।।३०।

कुल्लाळ पात्रापूर्वी आहे । पात्रें कांहीं कुल्लाळ नव्हे ।
तैसा देव पूर्वीच आहे । पाषाण नव्हे सर्वथा ।।३१।

मृत्तिकेचें शैन्य केलें । कर्ते वेगळे राहिले ।
कार्यकारण येक केलें । तरी होणार नाहीं ।।३२।

तथापि होईल पंचभूतिक । निर्गुण नव्हे कांहीं येक ।
कार्यकारणाचा विवेक । भूतांपरता नाहीं ।३३।
अवघी सृष्टि जो कर्ता । तो ते सृष्टीहूनि पर्ता ।
तेथें संशयाची वार्ता । काढूंचि नये ।३४।
खांबसूत्रींची बाहुली । जेणें पुरुषें नाचविली ।
तोचि बाहुली हे बोली । घडे केवी ।३५।
छायामंडपीची सेना । सृष्टीसारिखीच रचना ।
सूत्रें चाळी परी तो नाना । वेक्ति नव्हे ।३६।
तैसा सृष्टिकर्ता देव । परी तो नव्हे सृष्टिभाव ।
जेणें केले नाना जीव । तो जीव कैसेनी ।३७।
जें जें जया करणें पडे । तें तें तो हें कैसें घडे ।
म्हणोनि वायांचि बापुडे । संदेहीं पडती ।३८।
सृष्टि ऐसेंचि स्वभावें । गोपुर निर्मिलें बरवें ।
परी तो गोपुर कर्ता नव्हे । निश्चयेंसीं ।३९।
तैसें जग निर्मिलें जेणें । तो वेगळा पूर्णपणें ।
येक म्हणती मूर्खपणें । जग तोचि जगदीश ।४०।
एवं जगदीश तो वेगळा । जग निर्माण त्याची कळा ।
तो सर्वांमधें परी निराळा । असोन सर्वीं ।४१।
म्हणोनि भूतांचा कर्दमु । यासी अलिप्त आत्मारामु ।
अविद्यागुणें माथाभ्रमु । सत्यचि वाटे ।४२।
मायोपाधी जगडंबर । आहे सर्वहि साचार ।
ऐसा हा विपरीत विचार । कोठेंचि नाहीं ।४३।
म्हणोनि जग मिथ्या साच आत्मा । सर्वांपर जो परमात्मा ।
अंतर्बाह्य अंतरात्मा । व्यापूनि असे ।४४।

तयास म्हणावें देव । येर हें अवघेंचि वाव ।
ऐसा आहे अंतर्भाव । वेदांतीचा ।४५।

पदार्थवस्तु नासिवंत । हें तों अनुभवास येत ।
याकारणें भगवंत । पदार्थावेगळा ।४६।

देव विमळ आणी अचळ । शास्त्रें बोलती सकळ ।
तया निश्चळास चंचळ । म्हणों नये सर्वथा ।४७।

देव आला देव गेला । देव उपजला देव मेला ।
ऐसें बोलतां दुरिताला । काये उणें ।४८।

जन्ममरणाची वार्ता । देवास लागेना सर्वथा ।
देव अमर ज्याची सत्ता । त्यासी मृत्य कैसेनी ।४९।

उपजणें आणी मरणें । येणें जाणें दु:ख भोगणें ।
हें त्या देवाचें करणें । तो कारण वेगळा ।५०।

अंत:करण पंचप्राण । बहुतत्वीं पिंडज्ञान ।
यां सर्वांस आहे चळण । म्हणोनि देव नव्हेती ।५१।

येवं कल्पनेरहित । तया नाव भगवंत ।
देवपणाची मात । तेथें नाहीं ।५२।

तंव शिष्यें आक्षेपिलें । तरी कैसें ब्रह्मांड केलें ।
कर्तेपणें कारण पडिलें । कार्यामधें ।५३।

द्रष्टेपणें द्रष्टा दृश्यीं । जैसा पडे अनायासीं ।
कर्तेपणें निर्गुणासी । गुण तैसे ।५४।

ब्रह्मांडकर्ता कवण । कैसी त्याची वोळखण ।
देव सगुण किं निर्गुण । मज निरोपावा ।५५।

येक म्हणती त्या ब्रह्मातें । इछ्यामात्रें सृष्टिकर्ते ।
सृष्टिकर्ते त्यापर्ते । कोण आहे ।५६।

आतां असो हे बहु बोली । सकळ माया कोठून जाली ।
ते हे आतां निरोपिली । पाहिजे स्वामी ।५७।
ऐसें ऐकोनि वचन । वक्ता म्हणे सावधान ।
पुढिले समासीं निरूपण । सांगिजेल ।५८।
ब्रह्मीं माया कैसी जाली । पुढें असे निरोपिली ।
श्रोतीं वृत्ति सावध केली । पाहिजे आतां ।५९।
पुढें हेंचि निरूपण । विशद केलें श्रवण ।
जेणें होये समाधान । साधकांचें ।६०।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'देवदर्शननाम'
समास पहिला समाप्त.

❑❑

दशक ८ : समास २
सूक्ष्म आशंका

॥ श्रीराम ॥

मागां श्रोतीं आक्षेपिलें । तें पाहिजे निरोपिलें ।
निरावेवीं कैसें जालें । चराचर ।१।
याचें ऐसें प्रतिवचन । ब्रह्म जें कां सनातन ।
तेथें माया मिथ्याभान । विवर्तरूप भासे ।२।
आदि येक परब्रह्म । नित्यमुक्त अक्रिय परम ।
तेथें अव्याकृत सूक्ष्म । जाली मूळमाया ।३।

आद्यमेकं परब्रह्म नित्यमुक्तमविक्रियम् ।
तस्य मायासमावेशो जीवमव्याकृतात्मकम् ॥

आशंका ।

येक ब्रह्म निराकार ।मुक्त अक्रिये निर्विकार ।
तेथें माया वोडंबर । कोठून जाली । ४ ।

ब्रह्म अखंड निर्गुण । तेथें इच्छा धरी कोण ।
निर्गुणीं सगुणेविण । इछा नाहीं । ५ ।

मुळीं असेचिना सगुण । ह्मणोनि नामें निर्गुण ।
तेथें जालें सगुण । कोणेपरी । ६ ।

निर्गुणचि गुणा आलें । ऐसें जरी अनुवादलें ।
लागों पाहे येणें बोलें । मूर्खपण । ७ ।

येक म्हणती निरावेव । करून अकर्ता तो देव ।
त्याची लीळा बापुडे जीव । काये जाणती । ८ ।

येक म्हणती तो परमात्मा । कोण जाणे त्याचा महिमा ।
प्राणी बापुडा जीवात्मा । काये जाणे । ९ ।

उगाच महिमा सांगती । शास्त्रार्थ अवघा लोपिती ।
बळेंचि निर्गुणास म्हणती । करूनि अकर्ता ।१०।

मुळीं नाहीं कर्तव्यता । कोण करून अकर्ता ।
कर्ता अकर्ता हे वार्ता । समूळ मिथ्या ।११।

जे ठाईंचें निर्गुण । तेथें कैंचें कर्तेपण ।
तरी ते इछा धरी कोण । सृष्टिरचाव्याची ।१२।

इछा परमेश्वराची । ऐसी युक्ती बहुतेकांची ।
परी त्या निर्गुणास इछा कैंची । हें कळेना ।१३।

तरी हें इतुकें कोणें केलें । किंवा आपणचि जालें ।
देवेंविण उभारलें । कोणेपरी ।१४।

देवेंविण जालें सर्व । मग देवास कैंचा ठाव ।
येथें देवाचा अभाव । दिसोन आला ।१५।

देव म्हणों सृष्टिकर्ता । तरीं येवं पाहे सगुणता ।
निर्गुणपणाची वार्ता । देवाची बुडाली ।१६।

देव ठाईंचा निर्गुण । तरी सृष्टिकर्ता कोण ।
कर्तेपणाचें सगुण । नासिवंत ।१७।

येथें पडिले विचार । कैसें जालें सचराचर ।
माया म्हणों स्वतंतर । तरी हेंहि विपरीत दिसे ।१८।

माया कोणीं नाहीं केली । हे आपणचि विस्तारली ।
ऐसें बोलतां बुडाली । देवाची वार्ता ।१९।

देव निर्गुण स्वतसिद्ध । त्यासी मायेसि काये समंध ।
ऐसें बोलतां विरुद्ध । दिसोन आलें ।२०।

सकळ कांहीं कर्तव्यता । आली मायेच्याचि माथां ।
तरी भक्तांस उद्धरिता । देव नाहीं कीं ।२१।

देवेंविण नुस्ती माया । कोण नेईल विलया ।
आम्हां भक्तां सांभाळाया । कोणीच नाहीं ।२२।

म्हणोनि माया स्वतंतर । ऐसा न घडे कीं विचार ।
मायेस निर्मिता सर्वेश्वर । तो येकचि आहे ।२३।

तरी तो कैसा आहे ईश्वर । मायेचा कैसा विचार ।
तरी हें आतां सविस्तर । बोलिलें पाहिजे ।२४।

श्रोतां व्हावें सावधान । येकाग्र करूनियां मन ।
आतां कथानुसंधान । सावध ऐका ।२५।

येके आशंकेचा भाव । जनीं वेगळाले अनुभव ।
तेहि बोलिजेती सर्व । येथानुक्रमें ।२६।

येक म्हणती देवें केली । म्हणोनि हे विस्तारली ।
देवास इछ्या नस्ती जाली । तरी हे माया कैंची ।२७।

येक म्हणती देव निर्गुण । तेथें इछा करी कोण ।
माया मिथ्या हे आपण । जालीच नाहीं ।२८।

येक म्हणती प्रत्यक्ष दिसे । तयेसी नाहीं म्हणतां कैसें ।
माया हे अनादि असे । शक्ती ईश्वराची ।२९।

येक म्हणती साच असे । तरी हे ज्ञानें कैसी निरसे ।
साचासारिखीच दिसे । परी हे मिथ्या ।३०।

येक म्हणती मिथ्या स्वभावें । तरी साधन कासया करावें ।
भक्तिसाधन बोलिलें देवें । मायात्यागाकारणें ।३१।

येक म्हणती मिथ्या दिसतें । भयें अज्ञानसन्येपातें ।
साधन औषधही घेईजेतें । परी तें दृश्य मिथ्या ।३२।

अनंत साधनें बोलिलीं । नाना मतें भांबावलीं ।
तरी माया नवचे त्यागिली । मिथ्या कैसी म्हणावी ।३३।

मिथ्या बोले योगवाणी । मिथ्या वेदशास्त्रीं पुराणीं ।
मिथ्या नाना निरूपणीं । बोलिली माया ।३४।

माया मिथ्या म्हणतां गेली । हे वार्ता नाहीं ऐकिली ।
मिथ्या म्हणतांच लागली । समागमें ।३५।

जयाचे अंतरीं ज्ञान । नाहीं वोळखिले सज्जन ।
तयास मायामिथ्याभान । सत्यचि वाटे ।३६।

जेणें जैसा निश्चये केला । तयासी तैसाचि फळला ।
पाहे तोचि दिसे बिंबला । तैसी माया ।३७।

येक म्हणती माया कैंची । आहे तें सर्व ब्रह्मचि ।
थिजल्या विघुरल्या घृताची । ऐक्यता न मोडे ।३८।

थिजलें आणी विघुरलें । हें स्वरूपीं नाहीं बोलिलें ।
साहित्य भंगलें येणें बोलें । म्हणती येक ।३९।

येक म्हणती सर्व ब्रह्म । हें न कळे जयास वर्म ।
तयाचे अंतरींचा भ्रम । गेलाच नाहीं ।४०।

येक म्हणती येकचि देव । तेथें कैंचें आणिलें सर्व ।
सर्व ब्रह्म हें अपूर्व । आश्चिर्य वाटे ।४१।

येक म्हणती येकचि खरें । आनुहि नाहीं दुसरें ।
सर्व ब्रह्म येणें प्रकारें । सहजचि जालें ।४२।

सर्व मिथ्या येकसरें । उरलें तेंचि ब्रह्म खरें ।
ऐसीं वाक्यें शास्त्राधारें । बोलती येक ।४३।

आळंकार आणी सुवर्ण । तेथें नाहीं भिन्नपण ।
आटाआटी वेर्थ सीण । म्हणती येक ।४४।

हीन उपमा येकदेसी । कैसी साहेल वस्तूसी ।
वर्णवेक्ती अव्यक्तासी । साम्यता न घडे ।४५।

सुवर्णीं दृष्टी घालितां । मुळींच आहे वेक्तता ।
आळंकार सोने पाहातां । सोनेंचि असे ।४६।

मुळीं सोनेंचि हें वेक्त । जड येकदेसी पीत ।
पूर्णास अपूर्णाचा दृष्टांत । केवीं घडे ।४७।

दृष्टांत तितुका येकदेसी । देणें घडे कळायासी ।
सिंधु आणी लहरीसी । भिन्नत्व कैंचें ।४८।

उत्तम मधेम कनिष्ठ । येका दृष्टांतें कळे पष्ट ।
येका दृष्टांतें नष्ट । संदेह वाढे ।४९।

कैंचा सिंधु कैंची लहरी । अचळास चळाची सरी ।
साचाऐसी वोडंबरी । मानूंच नये ।५०।

वोडंबरी हे कल्पना । नाना भास दाखवी जना ।
येरवी हे जाणा । ब्रह्मचि असे ।५१।

ऐसा वाद येकमेकां । लागतां राहिली आशंका ।
तेचि आतां पुढें ऐका । सावध होउनि ।५२।

माया मिथ्या कळों आली । परी ते ब्रह्मीं कैसी जाली ।
म्हणावी ते निर्गुणें केली । तरी ते मुळींच मिथ्या ।५३।

मिथ्या शब्दीं कांहींच नाहीं । तेथें केलें कोणें काई ।
करणें निर्गुणाचा ठाईं । हेंहि अघटित ।५४।

कर्ता ठाईंचा अरूप । केलें तेंहि मिथ्यारूप ।
तथापी फेडूं आक्षेप । श्रोतयांचा ।५५।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सूक्ष्मआशंकानिरूपणनाम'
समास दुसरा समाप्त.

❑❑

दशक ८ : समास ३
सूक्ष्म आशंका

॥ श्रीराम ॥

अरे जे जालेंचि नाहीं । त्याची वार्ता पुससी काई ।
तथापि सांगों जेणें कांहीं । संशय नुरे । १ ।

दोरीकरितां भुजंग । जळाकरितां तरंग ।
मार्तंडाकरितां चांग । मृगजळ वाहे । २ ।

कल्पनेकरितां स्वप्न दिसे । सिंपीकरितां रूपें भासे ।
जळाकरितां गार वसे । निमिष्य येक । ३ ।

मातीकरितां भिंती जाली । सिंधुकरितां लहरी आली ।
तिळाकरितां पुतळी । दिसों लागे । ४ ।

सोन्याकरितां आळंकार । तंतुकरितां जालें चीर ।
कासवाकरितां विस्तार । हातापायांचा । ५ ।

तूप होतें तरी थिजलें । तरीकरितां मीठ जालें ।
बिंबाकरितां बिंबलें । प्रतिबिंब । ६ ।

पृथ्वीकरितां जालें झाड । झाडाकरितां छ्याया वाड ।
धातुकरितां पवाड । उंच नीच वर्णाचा । ७ ।

आतां असो हा दृष्टांत । अद्वैतास कैंचें द्वैत ।
द्वैतेंविण अद्वैत । बोलतांच न ये । ८ ।

भासाकरितां भास भासे । दृश्याकरितां अदृश्य दिसे ।
अदृश्यास उपमा नसे । म्हणोनि निरोपम । ९ ।

कल्पनेविरहित हेत । दृश्यावेगळा दृष्टांत ।
द्वैतावेगळें द्वैत । कैसें जालें । १० ।

विचित्र भगवंताची करणी । वर्णवेना सहस्रफणी ।
तेणें केली उभवणी । अनंत ब्रह्मांडाची । ११ ।

परमात्मा परमेश्वरु । सर्वकर्ता जो ईश्वरु ।
तयापासूनि विस्तारु । सकळ जाला । १२ ।

ऐसीं अनंत नामें धरी । अनंत शक्ती निर्माण करी ।
तोचि जाणावा चतुरीं । मूळपुरुष । १३ ।

त्या मूळपुरुषाची वोळखण । ते मूळमायाचि आपण ।
सकळ कांहीं कर्तेपण । तेथेंचि आलें । १४ ।

कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ।

हें उघड बोलतां नये । मोडों पाहातो उपाये ।
येरवीं हें पाहातां काये । साच आहे । १५ ।

देवापासून सकळ जालें । हें सर्वांस मानलें ।
परी त्या देवास वोळखिलें । पाहिजे कीं ।१६।

सिद्धांचे जें निरूपण । तें साधकांस न मने जाण ।
पक्व नाहीं अंत:कर्ण । म्हणोनियां ।१७।

अविद्यागुणें बोलिजे जीव । मायागुणें बोलिजे शिव ।
मूळमायागुणें देव । बोलिजेतो ।१८।

म्हणौनि कारण मूळमाया । अनंत शक्ती धरावया ।
तेथीचा अर्थ जाणावया । अनुभवी पाहिजे ।१९।

मूळमाया तोचि मूळपुरुष । तोचि सर्वांचा ईश ।
अनंतनामी जगदीश । तयासीचि बोलिजे ।२०।

अवघी माया विस्तारली । परी हे निशेष नाथिली ।
ऐसिया वचनाची खोली । विरुळा जाणे ।२१।

ऐसें अनुर्वाच्य बोलिजे । परी हें स्वानुभवें जाणिजे ।
संतसंगेंविण नुमजे । कांहीं केल्यां ।२२।

माया तोचि मूळपुरुष । साधकां न मने हें निशेष ।
परी अनंतनामी जगदीश । कोणास म्हणावें ।२३।

नामरूप माये लागलें । तरी हें बोलणें नीटचि जालें ।
येथें श्रोतीं अनुमानिलें । कासयासी ।२४।

आता असो हे सकळ बोली । मागील आशंका राहिली ।
निराकारीं कैसी जाली । मूळमाया ।२५।

दृष्टीबंधन मिथ्या सकळ । परी तो कैसा जाला खेळ ।
हेंचि आतां अवघें निवळ । करून दाऊं ।२६।

आकाश असतां निश्चळ । मधें वायो जाला चंचळ ।
तैसी जाणावी केवळ । मूळमाया ।२७।

रूप वायोचें जालें । तेणें आकाश भंगलें ।
ऐसें हें सत्य मानलें । नवचे किं कदा ।२८।

तैसी मूळमाया जाली । आणी निर्गुणता संचली ।
येणें दृष्टांतें तुटली । मागील आशंका ।२९।

वायु नव्हता पुरातन । तैसी मूळमाया जाण ।
साच म्हणतां पुन्हां लीन । होतसे ।३०।

वायो रूपें कैसा आहे । तैसी मूळमाया पाहें ।
भासे परी तें न लाहे । रूप तयेचें ।३१।

वायो सत्य म्हणों जातां । परी तो न ये दाखवितां ।
तयाकडे पाहों जातां । धुळीच दिसे ।३२।

तैसी मूळमाया भासे । भासे परी ते न दिसे ।
पुढें विस्तारली असे । माया अविद्या ।३३।

जैसें वायोचेनि योगें । दृश्य उडे गगनमार्गें ।
मूळमायेच्या संयोगें । तैसें जग ।३४।

गगनीं अभाळ नाथिलें । अकस्मात उद्भवलें ।
मायेचेनि गुणें जालें । तैसें जग ।३५।

नाथिलेंचि गगन नव्हतें । अकस्मात आलें तेथें ।
तैसें दृश्य जालें येथें । तैसियापरी ।३६।

परी त्या अभाळाकरितां । गगनाची गेली निश्चळता ।
वाटे परी ते तत्वता । तैसीच आहे ।३७।

तैसें मायेकरितां निर्गुण । वाटे जालें सगुण ।
परी तें पाहतां संपूर्ण । जैसें तैसें ।३८।

आभाळ आलें आणि गेलें । तरी गगन तें संचलें ।
तैसें गुणा नाहीं आलें । निर्गुण ब्रह्म ।३९।

नभ माथां लागलें दिसे । परी तें जैसें तैसें असे ।
तैसें जाणावें विश्वासें । निर्गुण ब्रह्म ।४०।

ऊर्ध पाहातां आकाश । निळिमा दिसे सावकास ।
परी तो जाणिजे मिथ्या भास । भासलासे ।४१।

आकाश पालथें घातलें । चहूंकडे आटोपलें ।
वाटे विश्वास कोंडिलें । परी तें मोकळेंचि असे ।४२।

पर्वतीं निळा रंग दिसे । परी तो तया लागला नसे ।
अलिप्त जाणावें तैसें । निर्गुण ब्रह्म ।४३।

रथ धावतां पृथ्वी चंचळ । वाटे परी ते असे निश्चळ ।
तैसें परब्रह्म केवळ । निर्गुण जाणावें ।४४।

अभाळाकरितां मयंक । वाटे धावतो निशंक ।
परी तें अवघें माईक । अभाळ चळे ।४५।

झळे अथवा अग्निज्वाळ । तेणें कंपित दिसे अंत्राळ ।
वाटे परी तें निश्चळ । जैसें तैसें ।४६।

तैसें स्वरूप हें संचलें । असतां वाटे गुणा आलें ।
ऐसें कल्पनेसि गमलें । परी तें मिथ्या ।४७।

दृष्टिबंधनाचा खेळ । तैसी माया हे चंचळ ।
वस्तु शाश्वत निश्चळ । जैसी तैसी ।४८।

ऐसी वस्तु निरावेव । माया दाखवी अवेव ।
ईचा ऐसाच स्वभाव । नाथिलीच हे ।४९।

माया पाहाता मुळींच नसे । परी हे साचाऐसी भासे ।
उद्धवे आणि निरसे । अभाळ जैसें ।५०।

ऐसी माया उद्धवली । वस्तु निर्गुण संचली ।
अहं ऐसी स्फूर्ति जाली । तेचि माया ।५१।

गुणमायेचे पवाडे । निर्गुणीं हें काहींच न घडे ।
परी हें घडे आणी मोडे । सस्वरूपीं ।५२।

जैसी दृष्टी तरळली । तेणें सेनाच भासली ।
पाहातां आकाशींच जाली । परी ते मिथ्या ।५३।

मिथ्या मायेचा खेळ । उद्धव बोलिला सकळ ।
नाना तत्वांचा पाल्हाळ । सांडूनियां ।५४।

तत्वें मुळींच आहेती । वोंकार वायोची गती ।
तेथीचा अर्थ जाणती । दक्ष ज्ञानी ।५४।

मूळमायेचें चळण । तेंचि वायोचें लक्षण ।
सूक्ष्म तत्त्वें तेंचि जाण । जडत्वा पावलीं ।५६।

ऐसीं पंचमाहांभूतें । पूर्वी होतीं अवेक्तें ।
पुढें जालीं वेक्तें । सृष्टिरचनेसी ।५७।

मूळमायेचें लक्षण । तेंचि पंचभूतिक जाण ।
त्याची पाहें वोळखण । सूक्ष्म दृष्टी ।५८।

आकाश वायोविण । इछ्याशब्द करी कोण ।
इच्छाशक्ति तेचि जाण । तेजस्वरूप ।५९।

मृदपण तेंचि जळ । जडत्व पृथ्वी केवळ ।
ऐसी मूळमाया सकळ । पंचभूतिक जाणावी ।६०।

येक येक भूतांपोटीं । पंचभूतांची राहाटी ।
सर्व कळे सूक्ष्मदृष्टी । घालून पाहातां ।६१।

पुढें जडत्वास आलीं । तरी असतीं कालवलीं ।
ऐसी माया विस्तारली । पंचभूतिक ।६२।

मूळमाया पाहातां मुळीं । अथवा अविद्या भूमंडळीं ।
स्वर्ग मृत्य पाताळीं । पांचचि भूतें ।।६३।।

स्वर्गे मृत्यौ पाताले वा यत्किंचित्सचराचरम् ।
सर्वं पंचभूतकं राम षष्ठं किंचिन्न दृश्यते ।।

सत्य स्वरूप आदिअंतीं । मध्यें पंचभूतें वर्तती ।
पंचभूतिक जाणिजे श्रोतीं । मूळमाया ।।६४।।

येथें उठिली आशंका । सावध होऊन ऐका ।
पंचभूतें जालीं येका । तमोगुणापासुनी ।।६५।।

मूळमाया गुणापरती । तेथें भूतें कैंचीं होती ।
ऐसी आशंका हे श्रोतीं । घेतली मागां ।।६६।।

ऐसें श्रोतीं आक्षेपिलें । संशयास उभें केलें ।
याचें उत्तर दिधलें । पुढिले समासीं ।।६७।।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सूक्ष्मआशंकानाम'
समास तिसरा समाप्त.

❑❑

दशक ८ : समास ४
सूक्ष्मपंचभूतेनिरूपण

।। श्रीराम ।।

मागील आशंकेचें मूळ । आतां होईल प्रांजळ ।
वृत्ति करावी निवळ । निमिष्य येक ।।१।।

ब्रह्मीं मूळमाया जाली । तिच्या पोटा माया आली ।
मग ते गुणा प्रसवली । म्हणौनि गुणक्षोभिणी ।।२।।

पुढें तिजपासाव कोण । सत्वरजतमोगुण ।
तमोगुणापासून निर्माण । जालीं पंचभूतें । ३ ।

ऐसीं भूतें उद्भवलीं । पुढें तत्वें विस्तारलीं ।
एवं तमोगुणापासून जालीं । पंचमाहांभूतें । ४ ।

मूळमाया गुणापरती । तेथें भूतें कैंचीं होतीं ।
ऐसी आशंका हे श्रोतीं । घेतली मागां । ५ ।

आणीक येकयेके भूतीं । पंचभूतें असतीं ।
तेहि आतां कैसी स्थिती । प्रांजळ करू । ६ ।

सूक्ष्मदृष्टीचें कौतुक । मूळमाया पंचभूतिक ।
श्रोतीं विमळ विवेक । केला पाहिजे । ७ ।

आधीं भूतें तीं जाणावीं । रूपें कैसीं वोळखावीं ।
मग ते शोधून पाहावीं । सूक्ष्मदृष्टी । ८ ।

वोळखी नाहीं अंतरीं । ते वोळखावी कोणेपरी ।
म्हणोनि भूतांची वोळखी चतुरीं । नावेक परिसावी । ९ ।

जें जें जड आणी कठिण । तें तें पृथ्वीचें लक्षण ।
मृद आणी वोलेपण । तितुकें आप । १० ।

जें जें उष्ण आणी सतेज । तें तें जाणावें पैं तेज ।
आतां वायोहि सहज । निरोपिजेल । ११ ।

चैतन्य आणी चंचळ । तो हा वायोचि केवळ ।
सुन्य अवकाश निश्चळ । आकाश जाणावें । १२ ।

ऐसीं पंचमाहांभूतें । वोळखी धरावी संकेतें ।
आतां येकीं पांच भूतें । सावध ऐका । १३ ।

जें त्रिगुणाहूनि पर । त्याचा सूक्ष्म विचार ।
यालागीं अति तत्पर । होऊन ऐका । १४ ।

सूक्ष्म आकाशीं कैसी पृथ्वी । तेचि आधीं निरोपावी ।
येथें धारणा धरावी । श्रोतेजनीं ।१५।

आकाश म्हणजे अवकाश सुन्य । सुन्य म्हणिजे तें अज्ञान ।
अज्ञान म्हणिजे जडत्व जाण । तेचि पृथ्वी ।१६।

आकाश स्वयें आहे मृद । तेंचि आप स्वतसिद्ध ।
आतां तेज तेंहि विशद । करून दाऊं ।१७।

अज्ञानें भासला भास । तोचि तेजाचा प्रकाश ।
आतां वायो सावकाश । साकल्य सांगों ।१८।

वायु आकाशा नाहीं भेद । आकाशाइतुका असे स्तब्ध ।
तथापी आकाशीं जो निरोध । तोचि वायो ।१९।

आकाशीं आकाश मिसळलें । हें तों नलगे किं बोलिलें ।
येणें प्रकारें निरोपिलें । आकाश पंचभूत ।२०।

वायोमध्यें पंचभूतें । तेहिं ऐका येकचित्तें ।
बोलिजेती ते समस्तें । येथान्वयें ।२१।

हळु फूल तरी जड । हळु वारा तरी निबिड ।
वायो लागतां कडाड । मोडती झाडें ।२२।

तोलेंविण झाड मोडे । ऐसें हें कहींच न घडे ।
तोल तोचि तये जडे । पृथ्वीचा अंश ।२३।

येथें श्रोते आशंका घेती । तेथें कैंचीं झाडें होतीं ।
झाडें नव्हतीं तरी शक्ती । कठिणरूप आहे ।२४।

वन्हीस्फुलिंग लाहान । कांहीं तन्ही असे उष्ण ।
तैसें सूक्ष्मीं जडपण । सूक्ष्मरूपें ।२५।

मृदपण तेंचि आप । भास तेजाचें स्वरूप ।
वायो तेथें चंचळरूप । सहजचि आहे ।२६।

सकळांस मिळोन आकाश । सहजचि आहे अवकाश ।
पंचभूतांचे अंश । वायोमधें निरोपिले ।२७।

आतां तेजाचें लक्षण । भासलेंपण तें कठिण ।
तेजीं ऐसी वोळखण । पृथ्वीयेची ।२८।

भासला भास वाटे मृद । तेजीं आप तेंचि प्रसिद्ध ।
तेजीं तेज स्वतसिद्ध । सांगणेंचि नलगे ।२९।

तेजीं वायो ते चंचळ । तेजीं आकाश निश्चळ ।
तेजी पंचभूतें सकळ । निरोपिलीं ।३०।

आतां आपाचें लक्षण । आप तेंचि जें मृदपण ।
मृदपण तें कठिण । तेचि पृथ्वी ।३१।

आपीं आप सहजचि असे । तेज मृदपणें भासे ।
वायो स्तब्धपणें दिसे । मृदत्वाआंगी ।३२।

आकाश नलगे सांगावें । तें व्यापकचि स्वभावें ।
आपीं पंचभूतांची नांवें । सूक्ष्म निरोपिलीं ।३३।

आतां पृथ्वीचें लक्षण । कठिण पृथ्वी आपण ।
कठिणत्वीं मृदपण । तेंचि आप ।३४।

कठिणत्वाचा जो भास । तोचि तेजाचा प्रकाश ।
कठिणत्वीं निरोधांश । तोचि वायो ।३५।

आकाश सकळांस व्यापक । हा तो प्रगटचि विवेक ।
आकाशींच कांहीं येक । भास भासे ।३६।

आकाश तोडितां तुटेना । आकाश फोडितां फुटेना ।
आकाश परतें होयेना । तिळमात्र ।३७।

असो आतां पृथ्वीअंत । दाविला भूतांचा संकेत ।
येक भूतीं पंचभूत । तेंहि निरोपिलें ।३८।

परी हें आहाच पाहातां नातुडे । बळेंचि पोटीं संदेह पडे ।
भ्रांतिरूपें अहंता चढे । अकस्मात ।३९।

सूक्ष्मदृष्टीनें पाहातां । वायोचि वाटे तत्वतां ।
सूक्ष्म वायो शोधूं जातां । पंचभूतें दिसती ।४०।

एवं पंचभूतिक पवन । तेचि मूळमाया जाण ।
माया आणी सूक्ष्म त्रिगुण । तेहि पंचभूतिक ।४१।

भूतें गुण मेळविजे । त्यासी अष्टधा बोलिजे ।
पंचभूतिक जाणिजे । अष्टधा प्रकृती ।४२।

शोधून पाहिल्यावीण । संदेह धरणें मूर्खपण ।
याची पाहावी वोळखण । सूक्ष्मदृष्टी ।४३।

गुणापासुनी भूतें । पावलीं पष्ट दशेतें ।
जडत्वा येऊन समस्तें । तत्वें जालीं ।४४।

पुढें तत्वविवंचना । पिंडब्रह्मांड तत्वरचना ।
बोलिली असे ते जना । प्रगटचि आहे ।४५।

हा भूतकर्दम बोलिला । सूक्ष्म संकेतें दाविला ।
ब्रह्मगोळ उभारला । तत्पूर्वी ।४६।

या ब्रह्मांडापैलिकडिल गोष्टी । जैं जाली नव्हती सृष्टी ।
मूळमाया सूक्ष्मदृष्टी । वोळखावी ।४७।

सप्तकंचुक प्रचंड । जालें नव्हतें ब्रह्मांड ।
मायेअविद्येचें बंड । ऐलिकडे ।४८।

ब्रह्मा विष्णु महेश्वर । हा ऐलिकडिल विचार ।
पृथ्वी मेरु सप्त सागर । ऐलिकडे ।४९।

नाना लोक नाना स्थानें । चंद्र सूर्य तारांगणें ।
सप्त द्वीपें चौदा भुवनें । ऐलिकडे ।५०।

शेष कूर्म सप्त पाताळ । येकविस स्वर्गे अष्ट दिग्पाळ ।
तेतिस कोटी देव सकळ । ऐलिकडे ।५१।

बारा आदित्य अक्रा रुद्र । नव नाग सप्त ऋषेश्वर ।
नाना देवांचे अवतार । ऐलिकडे ।५२।

मेघ मनु चक्रवती । नाना जीवांची उत्पत्ती ।
आतां असो सांगों किती । विस्तार हा ।५३।

सकळ विस्ताराचें मूळ । ते मूळमायाच केवळ ।
मागां निरोपिली सकळ । पंचभूतिक ।५४।

सूक्ष्मभूतें जे बोलिलीं । तेचि पुढें जडत्वा आलीं ।
ते सकळहि बोलिलीं । पुढिले समासीं ।५५।

पंचभूतें पृथकाकारें । पुढें निरोपिलीं विस्तारें ।
वोळखीकारणें अत्यादरें । श्रोतीं श्रवण करावीं ।५६।

पंचभूतिक ब्रह्मगोळ । जेणें कळे हा प्रांजळ ।
दृश्य सांडून केवळ । वस्तुच पाविजे ।५७।

माहाद्वार वोलांडावें । मग देवदर्शन घ्यावें ।
तैसें दृश्य हें सांडावें । जाणोनियां ।५८।

म्हणोनि दृश्याचा पोटीं । आहे पंचभूतांची दाटी ।
येकपणें पडिली मिठी । दृश्य पंचभूतां ।५९।

एवं पंचभूतांचेंचि दृश्य । सृष्टी रचली सावकास ।
श्रोतीं करून अवकाश । श्रवण करावें ।६०।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सूक्ष्मपंचभूतेनिरूपणनाम'
समास चौथा समाप्त.

❑❑

दशक ८ : समास ५

स्थूळ पंचमहाभूते स्वरूपाकाशभेद

॥ श्रीराम ॥

केवळ मूर्ख तें नेणे । ह्मणौन घडलें सांगणें ।
पंचभूतांचीं लक्षणें । विशद करूनि । १ ।

पंचभूतांचा कर्दम जाला । आतां नवचे वेगळा केला ।
परंतु कांहीं येक वेगळाला । करून दाऊं । २ ।

पर्वत पाषाण शिळा शिखरें । नाना वर्णें लाहान थोरें ।
खडे गुंडे बहु प्रकारें । जाणिजे पृथ्वी । ३ ।

नाना रंगांची मृत्तिका । नाना स्थळोस्थळीं जे कां ।
वाळुकें वाळु अनेका । मिळोन पृथ्वी । ४ ।

पुरें पट्टणें मनोहरें । नाना मंदिरें दामोदरें ।
नाना देवाळयें शिखरें । मिळोन पृथ्वी । ५ ।

सप्त द्वीपावती पृथ्वी । काये ह्मणोनि सांगावी ।
नव खंडें मिळोन जाणावी । वसुंधरा । ६ ।

नाना देव नाना नृपती । नाना भाषा नाना रिती ।
लक्ष चौऱ्यासी उत्पत्ती । मिळोन पृथ्वी । ७ ।

नाना उद्वसें जें वनें । नाना तरुवरांचीं बनें ।
गिरीकंदरें नाना स्थानें । मिळोन पृथ्वी । ८ ।

नाना रचना केली देवीं । जे जे निर्मिली मानवीं ।
सकळ मिळोन पृथ्वी । जाणिजे श्रोतीं । ९ ।

नाना धातु सुवर्णादिक । नाना रत्नें जे अनेक ।
नाना काष्ठवृक्षादिक । मिळोन पृथ्वी ।१०।

आतां असो हें बहुवस । जडांश आणी कठिणांश ।
सकळ पृथ्वी हा विश्वास । मानिला पाहिजे ।११।

बोलिलें पृथ्वीचें रूप । आतां सांगिजेल आप ।
श्रोतीं वोळखावें रूप । सावध होऊनी ।१२।

वापी कूप सरोवर । नाना सरितांचें जें नीर ।
मेघ आणी सप्त सागर । मिळोन आप ।१३।

क्षारक्षीरसुरासर्पिर्दधि इक्षुर्जलं तथा ।

क्षारसमुद्र दिसताहे । सकळ जन दृष्टीस पाहे ।
जेथें लवण होताहे । तोचि क्षारसिंधु ।१४।

येक दुधाचा सागर । त्या नांव क्षीरसागर ।
देवें दिधला निरंतर । उपमन्यासी ।१५।

येक समुद्र मद्याचा । येक जाणावा घृताचा ।
येक निखळ दह्याचा । समुद्र असे ।१६।

येक उसाच्या रसाचा । येक तो शुद्ध जळाचा ।
ऐसा सातां समुद्रांचा । वेढा पृथ्वीयेसी ।१७।

एवं भूमंडळीचें जळ । नाना स्थळींचें सकळ ।
मिळोन अवघें केवळ । आप जाणावें ।१८।

पृथ्वीगर्भीं कितियेक । पृथ्वीतळीं आवर्णोदक ।
तिहीं लोकींचें उदक । मिळोन आप ।१९।

नाना वल्ली बहुवस । नाना तरुवरांचे रस ।
मद्य पारा अमृत विष । मिळोन आप ।२०।

नाना रस स्नेहादिक । याहि वेगळे अनेक ।
जळावेगळें अवश्यक । आप बोलिजे ।२१।

सारद्र आणी सीतळ । जळासारिखें पातळ ।
शुक्लीत श्रोणीत मूत्र लाळ । आप बोलिजे ।२२।

आप संकेतें जाणावें । पातळ वोलें वोळखावें ।
मृद सीतळ स्वभावें । आप बोलिजे ।२३।

जाला आपाचा संकेत । पातळ मृद गुळगुळित ।
स्वेद श्लेष्मा अश्रु समस्त । आप जाणावें ।२४।

तेज ऐका सावधपणें । चंद्र सूर्य तारांगणें ।
दिव्य देह सतेजपणें । तेज बोलिजे ।२५।

वन्ही मेघीं विद्युल्यता । वन्ही सृष्टी संव्हारिता ।
वन्ही सागरा जाळिता । वडवानळु ।२६।

वन्ही शंकराचे नेत्रींचा । वन्ही काळाचे क्षुधेचा ।
वन्ही परीघ भूगोळाचा । तेज बोलिजे ।२७।

जें जें प्रकाशरूप । तें तें तेजाचें स्वरूप ।
शोषक उष्णादि आरोप । तेज जाणावें ।२८।

वायो जाणावा चंचळ । चैतन्य चेतवी केवळ ।
बोलणें चालणें सकळ । वायोमुळें ।२९।

हाले डोले तितुका पवन । कांहीं न चले पवनेंविण ।
सृष्टी चाळाया कारण । मूळ तो वायो ।३०।

चळण वळण आणी प्रासारण । निरोध आणी अकोचन ।
सकळ जाणावा पवन । चंचळरूपी ।३१।

प्राण अपान आणी व्यान । चौथा उदान आणी समान ।
नाग कूर्म कर्कश जाण । देवदत्त धनंजये ।३२।

जितुकें कांहीं होतें चळण । तितुकें वायोचें लक्षण ।
चंद्र सूर्य तारांगण । वायोचि धर्ता ।३३।

आकाश जाणावें पोकळ । निर्मळ आणी निश्चळ ।
अवकाशरूप सकळ । आकाश जाणावें ।३४।

आकाश सकळांस व्यापक । आकाश अनेकीं येक ।
आकाशामध्यें कौतुक । चहूं भूतांचें ।३५।

आकाशाऐसें नाहीं सार । आकाश सकळांहून थोर ।
पाहातां आकाशाचा विचार । स्वरूपासारिखा ।३६।

तंव शिष्यें केला आक्षेप । दोहींचें सारखेंचि रूप ।
तरी आकाशचि स्वरूप । कां म्हणों नये ।३७।

आकाश स्वरूपा कोण भेद । पाहातां दिसती अभेद ।
आकाश वस्तुच स्वतसिद्ध । कां न म्हणावी ।३८।

वस्तु अचळ अढळ । वस्तु निर्मळ निश्चळ ।
तैसेंचि आकाश केवळ । वस्तुसारिखें ।३९।

ऐकोनि वक्ता बोले वचन । वस्तु निर्गुण पुरातन ।
आकाशाआंगीं सप्त गुण । शास्त्रीं निरोपिले ।४०।

काम क्रोध शोक मोहो । भय अज्ञान सुन्यत्व पाहो ।
ऐसा सप्तविध स्वभाव । आकाशाचा ।४१।

ऐसें शास्त्राकारें बोलिलें । ह्मणौनि आकाश भूत जालें ।
स्वरूप निर्विकार संचलें । उपमेरहित ।४२।

काचबंदि आणी जळ । सारिखेंच वाटे सकळ ।
परी येक काच येक जळ । शाहाणे जाणती ।४३।

रुवामध्यें स्फटिक पडिला । लोकीं तद्रूप देखिला ।
तेणें कपाळमोक्ष जाला । कापुस न करी ।४४।

तंदुलामधें श्वेत खडे । तंदुलासारिखेच वांकुडे ।
चाऊं जातां दांत पडे । तेव्हां कळे ।४५।

त्रिभागामधें खडा असे । त्रिभागासारिखाच भासे ।
शोधूं जातां वेगळा दिसे । कठिणपणें ।४६।

गुळासारिखा गुळदगड । परी तो कठिण निचाड ।
नागकांडी आणी वेखंड । येक म्हणों नये ।४७।

सोनें आणी सोनपितळ । येकचि वाटती केवळ ।
परी पितळेसी मिळतां ज्वाळ । काळिमा चढे ।४८।

असो हे हीन दृष्टांत । आकाश म्हणिजे केवळ भूत ।
तें भूत आणि अनंत । येक कैसे ।४९।

वस्तुसी वर्णचि नसे । आकाश शामवर्ण असे ।
दोहींस साम्यता कैसे । करिती विचक्षण ।५०।

श्रोते म्हणती कैंचें रूप । आकाश ठाईंचें अरूप ।
आकाश वस्तुच तद्रूप । भेद नाहीं ।५१।

चहूं भूतांस नाश आहे । आकाश कैसें नासताहे ।
आकाशास न साहे । वर्ण वेक्ती विकार ।५२।

आकाश अचळ दिसतें । त्याचें काये नासों पाहातें ।
पाहातां आमुचेनि मतें । आकाश शाश्वत ।५३।

ऐसें ऐकोन वचन । वक्ता बोले प्रतिवचन ।
ऐका आतां लक्षण । आकाशाचें ।५४।

आकाश तमापासून जालें । म्हणौन कामक्रोधें वेष्टिलें ।
अज्ञान सुन्यत्व बोलिलें । नाम तयाचें ।५५।

अज्ञानें कामक्रोधादिक । मोहो भये आणी शोक ।
हा अज्ञानाचा विवेक । आकाशागुणें ।५६।

नास्तिक नकारवचन । तेंचि सुन्याचें लक्षण ।
तयास म्हणती हृदयसुन्य । अज्ञान प्राणी ।५७।

आकाश स्तब्धपणें सुन्य । सुन्य म्हणिजे तें अज्ञान ।
अज्ञान म्हणिजे कठिण । रूप तयाचें ।५८।

कठिण सुन्य विकारवंत । तयास कैसें म्हणावें संत ।
मनास वाटे हें तद्वत । आहाच दृष्टी ।५९।

अज्ञान कालवलें आकाशीं । तया कर्दमा ज्ञान नासी ।
म्हणोनियां आकाशासी । नाश आहे ।६०।

तैसें आकाश आणि स्वरूप । पाहातां वाटती येकरूप ।
परी दोहींमथें विक्षेप । सुन्यत्वाचा ।६१।

आहाच पाहातां कल्पनेसी । सारिखेंच वाटे निश्चयेंसीं ।
परी आकाश स्वरूपासी । भेद आहे ।६२।

उन्मनी आणि सुषुप्ति अवस्ता । सारिखेंच वाटे तत्वता ।
परी विवंचून पाहों जातां । भेद आहे ।६३।

खोटें खऱ्यासारिखें भाविती । परी परीक्षवंत निवडिती ।
कां कुरंगें देखोन भुलती । मृगजळासी ।६४।

आतां असो हा दृष्टांत । बोलिला कळाया संकेत ।
म्हणौनि भूत आणी अनंत । येक नव्हेती ।६५।

आकाश वेगळेपणें पाहावें । स्वरूपीं स्वरूपचि व्हावें ।
वस्तुचें पाहाणें स्वभावें । ऐसें असे ।६६।

येथें आशंका फिटली । संदेहवृत्ती मावळली ।
भिन्नपणें नवचे अनुभवली । स्वरूपस्थिती ।६७।

आकाश अनुभवा येतें । स्वरूप अनुभवापरतें ।
म्हणोनिया आकाशातें । साम्यता न घडे ।६८।

दुग्धासारिखा जळांश । निवडूं जाणती राजहंस ।
तैसें स्वरूप आणी आकाश । संत जाणती ।६९।
सकळ माया गथागोवी । संतसंगे हे उगवावी ।
पाविजे मोक्षाची पदवी । सत्समागमें ।७०।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'स्थूळपंचमहाभूतेंस्वरूपाकाश-भेदोनाम' समास पाचवा समाप्त.

❑❑

दशक ८ : समास ६

दुश्चीतनिरूपण

॥ श्रीराम ॥

श्रोता विनवी वक्तयासी । सत्संगाची महिमा कैसी ।
मोक्ष लाभे कितां दिवसीं । हें मज निरोपावें । १ ।
धरितां साधूची संगती । कितां दिवसां होते मुक्ती ।
हा निश्चय कृपामूर्ती । मज दीनास करावा । २ ।
मुक्ती लाभे तत्क्षणीं । विश्वासतां निरूपणीं ।
दुश्चीतपणें हानी । होतसे । ३ ।
सुचितपणें दुश्चीत । मन होतें अकस्मात ।
त्यास करावें निवांत । कोणे परीं । ४ ।
मनाच्या तोडून वोढी । श्रवणीं बैसावें आवडी ।
सावधपणें घडीनें घडी । काळ सार्थक करावा । ५ ।
अर्थप्रमेय ग्रंथांतरीं । शोधून घ्यावें अभ्यांतरीं ।
दुश्चीतपण आलें तरी । पुन्हां श्रवण करावें । ६ ।

अर्थांतर पाहिल्यावीण । उगेंचि करी जो श्रवण ।
तो श्रोता नव्हे पाषाण । मनुष्यवेषें ।७।
येथें श्रोते मानितील सीण । आम्हांस केलें पाषाण ।
तरी पाषाणाचें लक्षण । सावध ऐका ।८।
वांकुडा तिकडा फोडिला । पाषाण घडून नीट केला ।
दुसरे वेळेसी पाहिला । तरी तो तैसाचि असे ।९।
टांकीनें खपली फोडिली । ते मागुती नाहीं जडली ।
मनुष्याची कुबुद्धि झाडिली । तरी ते पुन्हा लागे ।१०।
सांगतां अवगुण गेला । पुन्हा मागुता जडला ।
याकारणें माहांभला । पाषाणगोटा ।११।
ज्याचा अवगुण झडेना । तो पाषाणाहून उणा ।
पाषाण आगळा जाणा । कोटिगुणें ।१२।
कोटिगुणें कैसा पाषाण । त्याचेंहि ऐका लक्षण ।
श्रोतीं करावें श्रवण । सावध होउनी ।१३।
माणीक मोतीं प्रवाळ । पाचि वैडूर्य वज्रनीळ ।
गोमेदमणी परिस केवळ । पाषाण बोलिजे ।१४।
याहिवेगळे बहुत । सूर्यकांत सोमकांत ।
नाना मोहरे सप्रचित । औषधाकारणें ।१५।
याहिवेगळे पाषाण भले । नाना तीर्थीं जे लागले ।
वापी कूप सेखीं जाले । हरिहरमूर्ती ।१६।
याचा पाहातां विचार । पाषाणाऐसें नाहीं सार ।
मनुष्य तें काये पामर । पाषाणापुढें ।१७।
तरी तो ऐसा नव्हे पाषाण । जो अपवित्र निःकारण ।
तयासारिखा देह जाण । दुश्चीत अभक्तांचा ।१८।

आतां असो हें बोलणें । घात होतो दुश्चीतपणें ।
दुश्चीतपणाचेनि गुणें । प्रपंच ना परमार्थ ।१९।

दुश्चीतपणें कार्य नासे । दुश्चीतपणें चिंता वसे ।
दुश्चीतपणें स्मरण नसे । क्षण येक पाहातां ।२०।

दुश्चीतपणें शत्रुजिणें । दुश्चीतपणें जन्ममरणें ।
दुश्चीतपणाचेनि गुणें । हानी होये ।२१।

दुश्चीतपणें नव्हे साधन । दुश्चीतपणें न घडे भजन ।
दुश्चीतपणें नव्हे ज्ञान । साधकांसी ।२२।

दुश्चीतपणें नव्हे निश्चयो । दुश्चीतपणें न घडे जयो ।
दुश्चीतपणें होये क्षयो । आपुल्या स्वहिताचा ।२३।

दुश्चीतपणें न घडे श्रवण । दुश्चीतपणें न घडे विवरण ।
दुश्चीतपणें निरूपण । हातीचें जाये ।२४।

दुश्चीत बैसलाचि दिसे । परी तो असतचि नसे ।
चंचळ चक्रीं पडिलें असे । मानस तयाचें ।२५।

वेडें पिशाच्य निरंतर । अंध मुके आणी बधिर ।
तैसा जाणावा संसार । दुश्चीत प्राणियांचा ।२६।

सावध असोन उमजेना । श्रवण असोन ऐकेना ।
ज्ञान असोन कळेना । सारासारविचार ।२७।

ऐसा जो दुश्चीत आळसी । परलोक कैंचा त्यासी ।
जयाचे जिवीं अहर्निशीं । आळस वसे ।२८।

दुश्चीतपणापासूनि सुटला । तरी तो सवेंच आळस आला ।
आळसाहातीं प्राणीयांला । उसंतचि नाहीं ।२९।

आळसें राहिला विचार । आळसें बुडाला आचार ।
आळसें नव्हे पाठांतर । कांहीं केल्यां ।३०।

आळसें घडेना श्रवण । आळसें नव्हे निरूपण ।
आळसें परमार्थाची खूण । मळिण जाली ।३१।

आळसें नित्यनेम राहिला । आळसें अभ्यास बुडाला ।
आळसें आळस वाढला । असंभाव्य ।३२।

आळसें गेली धारणा धृती । आळसें मळिण जाली वृत्ती ।
आळसें विवेकाची गती । मंद जाली ।३३।

आळसें निद्रा वाढली । आळसें वासना विस्तारली ।
आळसें सुन्याकार जाली । सद्बुद्धि निश्चयाची ।३४।

दुश्चीतपणासवें आळस । आळसें निद्राविळास ।
निद्राविळासें केवळ नास । आयुष्याचा ।३५।

निद्रा आळस दुश्चीतपण । हेंचि मूर्खाचें लक्षण ।
येणेंकरितां निरूपण । उमजेचिना ।३६।

हें तिन्हीं लक्षणें जेथें । विवेक कैंचा असेल तेथें ।
अज्ञानास यापरतें । सुखचि नाहीं ।३७।

क्षुधा लागतांच जेविला । जेऊन उठतां आळस आला ।
आळस येतां निजेला । सावकास ।३८।

निजोन उठतांच दुश्चीत । कदा नाहीं सावचित ।
तेथें कैचें आत्महित । निरूपणीं ।३९।

मर्कटापासीं दिल्हें रत्न । पिशाच्याहातीं निधान ।
दुश्चीतापुढें निरूपण । तयापरी होये ।४०।

आतां असो हे उपपत्ती । आशंकेची कोण गती ।
कितां दिवसां होते मुक्ती । सज्जनाचेनि संगें ।४१।

ऐका याचें प्रत्योत्तर । कथेसि व्हावें निरोत्तर ।
संतसंगाचा विचार । ऐसा असे ।४२।

लोहो परीसेसीं लागला । थेंबुटा सागरीं मिळाला ।
गंगे सरिते संगम जाला । तत्क्षणीं ।४३।

सावध साक्षपी आणी दक्ष । तयास तत्काळचि मोक्ष ।
इतरांस तें अलक्ष । लक्षिलें नवचे ।४४।

येथें शिष्यप्रज्ञाच केवळ । प्रज्ञावंतां नलगे वेळ ।
अनन्यास तत्काळ । मोक्ष लाभे ।४५।

प्रज्ञावंत आणी अनन्य । तयास नलगे येक क्षण ।
अनन्य भावार्थेंविण । प्रज्ञा खोटी ।४६।

प्रज्ञेविण अर्थ न कळे । विश्वासेंविण वस्तु ना कळे ।
प्रज्ञाविश्वासें गळे । देहाभिमान ।४७।

देहाभिमानाचे अंतीं । सहजचि वस्तुप्राप्ती ।
सत्संगें सद्गती । विलंबचि नाहीं ।४८।

सावध साक्षपी विशेष । प्रज्ञावंत आणी विश्वास ।
तयास साधनीं सायास । करणेंचि नलगे ।४९।

इतर भाविक साबडे । तयांसहि साधनें मोक्ष जोडे ।
साधुसंगें तत्काळ, उडे । विवेकदृष्टी ।५०।

परी तें साधन मोडूं नये । निरूपणाचा उपाये ।
निरूपणें लागे सोये । सर्वत्रांसी ।५१।

आतां मोक्ष आहे कैसा । कैसी स्वरूपाची दशा ।
त्याचे प्राप्तीचा भर्वसा । सत्संगें केवी ।५२।

ऐसें निरूपण प्रांजळ । पुढें बोलिलें असे सकळ ।
श्रोतीं होऊनियां निश्चळ । अवधान द्यावें ।५३।

अवगुण त्यागावयाकारणें । न्यायनिष्ठुर लागे बोलणें ।
श्रोतीं कोप न धरणें । ऐसिया वचनाचा ।५४।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'दुश्चीतनिरूपणनाम'
समास सहावा समाप्त.

❑❑

दशक ८ : समास ७
मोक्षलक्षण

॥ श्रीराम ॥

मागां श्रोतयांचा पक्ष । कितां दिवसां होतो मोक्ष ।
तेचि कथा श्रोते दक्ष । होऊन ऐका ।१।

मोक्षास कैसें जाणावें । मोक्ष कोणास ह्मणावें ।
संतसंगें पावावें । मोक्षास कैसें ।२।

तरी बद्ध म्हणिजे बांधला । आणी मोक्ष म्हणिजे मोकळा जाला ।
तो संतसंगें कैसा लाधला । तेंहि ऐका ।३।

प्राणी संकल्पें बांधला । जीवपणें बद्ध जाला ।
तो विवेकें मुक्त केला । साधुजनीं ।४।

मी जीव ऐसा संकल्प । दृढ धरितां गेले कल्प ।
तेणें प्राणी जाला अल्प । देहबुद्धीचा ।५।

मी जीव मज बंधन । मज आहे जन्ममरण ।
केल्या कर्माचें फळ आपण । भोगीन आतां ।६।

पापाचें फळ तें दुख । आणी पुण्याचें फळ तें सुख ।
पापपुण्य अवश्यक । भोगणे लागे ।७।

पापपुण्यभोग सुटेना । आणी गर्भवासहि तुटेना ।
ऐसी जयाची कल्पना । दृढ जाली ।८।

तया नांव बांधला । जीवपणें बद्ध जाला ।
जैसा स्वयें बांधोन कोसला । मृत्य पावे ।९।

तैसा प्राणी तो अज्ञान । नेणें भगवंताचें ज्ञान ।
ह्मणे माझें जन्ममरण । सुटेचिना ।१०।

आतां कांहीं दान करूं । पुढिल्या जन्मास आधारु ।
तेणें सुखरूप संसारु । होईल माझा ।११।

पूर्वीं दान नाहीं केलें । ह्मणोन दरिद्र प्राप्त जालें ।
आतां तरी कांहीं केलें । पाहिजे कीं ।१२।

म्हणौनी दिलें वस्त्र जुनें । आणी येक तांब्र नाणें ।
म्हणे आतां कोटिगुणें । पावेन पुढें ।१३।

कुशावर्तीं कुरुक्षेत्रीं । महिमा ऐकोन दान करी ।
आशा धरिली अभ्यांतरीं । कोटिगुणांची ।१४।

रुका आडका दान केला । अतितास टुकडा घातला ।
ह्मणे माझा ढीग जाला । कोटि टुकड्यांचा ।१५।

तो मी खाईन पुढिलिये जन्मीं । ऐसें कल्पी अंतर्यामीं ।
वासना गुंतली जन्मकर्मीं । प्राणीयांची ।१६।

आतां मी जें देईन । तें पुढिले जन्मीं पावेन ।
ऐसें कल्पी तो अज्ञान । बद्ध जाणावा ।१७।

बहुतां जन्मांचे अंतीं । होये नरदेहाची प्राप्ती ।
येथें न होतां ज्ञानें सद्गती । गर्भवास चुकेना ।१८।

गर्भवास नरदेहीं घडे । ऐसें हें सर्वथा न घडे ।
अकस्मात भोगणें पडे । पुन्हा नीच योनी ।१९।

ऐसा निश्चयो शास्त्रांतरीं । बहुतीं केला बहुतांपरीं ।
नरदेह संसारीं । परम दुल्लभ असे ।२०।

पापपुण्य समता घडे । तरीच नरदेह जोडे ।
येरवीं हा जन्म न घडे । हें व्यासवचन भागवतीं ।२१।

नृदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं प्लवं सुकल्पं गुरुकर्णधारम् ।
मयानुकूलेन नभस्वतेरितं पुमान्भवाब्धिं न तरेत्स आत्महा ॥

नरदेह दुल्लभ । अल्प संकल्पाचा लाभ ।
गुरु कर्णधारी स्वयंभ । सुख पाववी ।२२।

देव अनुकूळ नव्हे जया । स्वयें पापी तो प्राणीया ।
भवाब्धी न तरवे तया । आत्महत्यारा बोलिजे ।२३।

ज्ञानेंविण प्राणीयांसी । जन्ममृत्य लक्ष चौऱ्यासी ।
तितुक्या आत्महत्या त्यासी । ह्मणौन आत्महत्यारा ।२४।

नरदेहीं ज्ञानेंविण । कदा न चुके जन्ममरण ।
भोगणें लागती दारुण । नाना नीच योनी ।२५।

रीस मर्कट श्वान सूकर । अश्व वृषभ ह्मैसा खर ।
काक कुर्कुट जंबुक मार्जर । सरड बेडुक मक्षिका ।२६।

इत्यादिक नीच योनी । ज्ञान नस्तां भोगणें जनीं ।
आशा धरी मूर्ख प्राणी । पुढिलिया जन्माची ।२७।

हा नरदेह पडतां । तोचि पाविजे मागुतां ।
ऐसा विश्वास धरितां । लाज नाहीं ।२८।

कोण पुण्याचा संग्रहो । जे पुन्हां पाविजे नरदेहो ।
दुराशा धरिली पाहो । पुढिलिया जन्माची ।२९।

ऐसे मूर्ख अज्ञान जन । केलें संकल्पें बंधन ।
शत्रू आपणासि आपण । होऊन ठेला ।३०।

आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ।

ऐसें संकल्पाचे बंधन । संतसंगे तुटे जाण ।
ऐक तयाचें लक्षण । सांगिजेल ।३१।

पांचा भूतांचें शरीर । निर्माण जालें सचराचर ।
प्रकृतिस्वभावें जगदाकार । वर्तो लागे ।३२।

देह अवस्ता अभिमान । स्थानें भोग मात्रा गुण ।
शक्ती आदिकरून लक्षण । चौपुटी तत्वांचें ।३३।

ऐसी पिंड ब्रह्मांड रचना । विस्तारें वाढली कल्पना ।
निर्धारितां तत्वज्ञाना । मतें भांबावलीं ।३४।

नाना मतीं नाना भेद । भेदें वाढती वेवाद ।
परी तो ऐक्यतेचा संवाद । साधु जाणती ।३५।

तया संवादाचें लक्षण । पंचभूतिक देह जाण ।
त्या देहामध्यें कारण । आत्मा वोळखावा ।३६।

देह अंती नासोन जाये । त्यास आत्मा ह्मणों नये ।
नानां तत्वांचा समुदाये । देहामध्यें आला ।३७।

अंतःकर्ण प्राणादिक । विषये इंद्रियें दशक ।
हा सूक्ष्माचा विवेक । बोलिला शास्त्रीं ।३८।

घेतां सूक्ष्माची शुद्धी । भिन्न अंतःकरण मन बुद्धी ।
नाना तत्वांचे उपाधी । वेगळा आत्मा ।३९।

स्थूळ सूक्ष्म कारण । माहाकारण विराट हिरण्य ।
अव्याकृत मूळप्रकृति जाण । ऐसे अष्टदेह ।४०।

च्यारी पिंडी च्यारी ब्रह्मांडीं । ऐसी अष्टदेहाची प्रौढी ।
प्रकृतिपुरुषांची वाढी । दशदेह बोलिजे ।४१।

ऐसें तत्वांचें लक्षण । आत्मा साक्षी विलक्षण ।
कार्य कर्ता कारण । दृश्य तयाचें ।४२।

जीवशिव पिंड ब्रह्मांड । मायेअविद्येचें बंड ।
हें सांगतां असे उदंड । परी आत्मा तो वेगळा ।४३।

पाहों जातां आत्मे च्यारी । त्यांचें लक्षण अवधारी ।
हें जाणोनि अभ्यांतरीं । सदृढ धरावें ।४४।

येक जीवात्मा दुसरा शिवात्मा । तिसरा परमात्मा जो विश्वात्मा ।
चौथा जाणिजे निर्मळात्मा । ऐसे च्यारी आत्मे ।४५।

भेद उंच नीच भासती । परी च्यारी येकचि असती ।
येविषीं दृष्टांतसंमती । सावध ऐका ।४६।

घटाकाश मठाकाश । महदाकाश चिदाकाश ।
अवघे मिळोन आकाश । येकचि असे ।४७।

तैसा जीवात्मा आणी शिवात्मा । परमात्मा आणी निर्मळात्मा ।
अवघा मिळोन आत्मा । येकचि असे ।४८।

घटीं व्यापक जें आकाश । तया नांव घटाकाश ।
पिंडीं व्यापक ब्रह्मांश । त्यास जीवात्मा बोलिजे ।४९।

मठीं व्यापक जें आकाश । तया नांव मठाकाश ।
तैसा ब्रह्मांडी जो ब्रह्मांश । त्यास शिवात्मा बोलिजे ।५०।

मठाबाहेरील आकाश । तया नांव महदाकाश ।
ब्रह्मांडाबाहेरील ब्रह्मांश । त्यास परमात्मा बोलिजे ।५१।

उपाधीवेगळें आकाश । तया नांव चिदाकाश ।
तैसा निर्मळात्मा परेश । तो उपाधीवेगळा ।५२।

उपाधीयोगें वाटे भिन्न । परी तें आकाश अभिन्न ।
तैसा आत्मा स्वानंदघन । येकचि असे ।५३।

दृश्यासबाह्य अंतरीं । सूक्ष्मात्मा निरंतरीं ।
त्याची वर्णावया थोरी । शेष समर्थ नव्हे ।५४।

ऐसें आत्म्याचें लक्षण । जाणतां नाहीं जीवपण ।
उपाधी शोधितां, अभिन्न । मुळींच आहे ।५५।

जीवपणें येकदेसी । अहंकारें जन्म सोसी ।
विवेक पाहातां प्राणीयांसी । जन्म कैंचा ।५६।

जन्ममृत्यापासून सुटला । या नांव जाणिजे मोक्ष जाला ।
तत्वें शोधितां पावला । तत्वतां वस्तु ।५७।

तेचि वस्तु ते आपण । हें माहावाक्याचें लक्षण ।
साधु करिती निरूपण । आपुलेन मुखें ।५८।

जेचि क्षणीं अनुग्रह केला । तेचि क्षणीं मोक्ष जाला ।
बंधन कांहीं आत्मयाला । बोलोंचि नये ।५९।

आतां आशंका फिटली । संदेहवृत्ती मावळली ।
संतसंगें तत्काळ जाली । मोक्षपदवी ।६०।

स्वप्नामधें जो बांधला । तो जागृतीनें मोकळा केला ।
ज्ञानविवेकें प्राणीयाला । मोक्षप्राप्ती ।६१।

अज्ञाननिसीचा अंतीं । संकल्पदुःखें नासती ।
तेणें गुणें होये प्राप्ती । तत्काळ मोक्षाची ।६२।

तोडावया स्वप्नबंधन । नलगे आणीक साधन ।
तयास प्रेत्न जागृतीवीण । बोलोंचि नये ।६३।

तैसा संकल्पें बांधला जीव । त्यास आणीक नाहीं उपाव ।
विवेक पाहातां वाव । बंधन होये ।६४।

विवेक पाहिल्याविण । जो जो उपाव तो तो सीण ।
विवेक पाहातां आपण । आत्माच असे ।६५।
आत्मयाचा ठाईं कांहीं । बद्ध मोक्ष दोनी नाहीं ।
जन्ममृत्य हें सर्वहि । आत्मत्वीं न घडे ।६६।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'मोक्षलक्षणनाम'
समास सातवा समाप्त.

❑❑

दशक ८ : समास ८

आत्मदर्शन

॥ श्रीराम ॥

मागां जालें निरूपण । परमात्मा तो तूंचि जाण ।
तया परमात्मयाचें लक्षण । तें हें ऐसें असे । १ ।
जन्म नाहीं मृत्य नाहीं । येणें नाहीं जाणें नाही ।
बद्ध मोक्ष दोनी नाहीं । परमात्मयासी । २ ।
परमात्मा निर्गुण निराकार । परमात्मा अनंत अपार ।
परमात्मा नित्य निरंतर । जैसा तैसा । ३ ।
परमात्मा सर्वांस व्यापक । परमात्मा अनेकीं येक ।
परमात्मयाचा विवेक । अतर्क्य आहे । ४ ।
ऐसी परमात्मयाची स्थिती । बोलताती वेद श्रुती ।
परमात्मा पाविजे भक्तीं । येथें संशय नाहीं । ५ ।
तये भक्तीचें लक्षण । भक्ती नवविधा भजन ।
नवविधा भजनें पावन । बहु भक्त जाले । ६ ।

तया नवविधामध्यें सार । आत्मनिवेदन थोर ।
तयेचा करावा विचार । स्वानुभवें स्वयें । ७ ।

आपुलिया स्वानुभवें । आपणास निवेदावें ।
आत्मनिवेदन जाणावें । ऐसें असे । ८ ।

महत्पूजेचा अंतीं । देवास मस्तक वाहाती ।
तैसी आहे निकट भक्ती । आत्मनिवेदनाची । ९ ।

आपणांस निवेदिती । ऐसे भक्त थोडे असती ।
तयांस परमात्मा मुक्ती । तत्काळ देतो । १० ।

आपणास कैसें निवेदावें । कोठें जाऊन पडावें ।
किंवा मस्तक तोडावें । देवापुढें । ११ ।

ऐसें ऐकोन बोलणें । वक्ता वदे सर्वज्ञपणें ।
श्रोतां सावधान होणें । येकाग्र चित्तें । १२ ।

आत्मनिवेदनाचें लक्षण । आधीं पाहावें मी कोण ।
मग परमात्मा निर्गुण । तो वोळखावा । १३ ।

देवाभक्ताचें शोधन । करितां होतें आत्मनिवेदन ।
देव आहे पुरातन । भक्त पाहे । १४ ।

देवास वोळखों जातां । तेथें जाली तद्रूपता ।
देवभक्तविभक्तता । मुळींच नाहीं । १५ ।

विभक्त नाहीं म्हणोन भक्त । बंद्धन नाहीं म्हणोनि मुक्त ।
अयुक्त नाहीं बोलणें युक्त । शास्त्राधारें । १६ ।

देवाभक्ताचें पाहातां मूळ । होये भेदाचें निर्मूळ ।
येक परमात्मा सकळ । दृश्यावेगळा । १७ ।

तयासि होतां मिळणी । उरी नाहीं दुजेपणीं ।
देव भक्त हे कडसणी । निरसोन गेली । १८ ।

आत्मनिवेदनाचे अंतीं । जें कां घडली अभेद भक्ती ।
तये नांव सायोज्यमुक्ती । सत्य जाणावी ।१९।

जो संतांस शरण गेला । अद्वैतनिरूपणें बोधला ।
मग जरी वेगळा केला । तरी होणार नाहीं ।२०।

नदी मिळाली सागरीं । ते निवडावी कोणेपरी ।
लोहो सोनें होतां माघारी । काळिमा न ये ।२१।

तैसा भगवंतीं मिळाला । तो नवचे वेगळा केला ।
देव भक्त आपण जाला । विभक्त नव्हे ।२२।

देव भक्त दोनी येक । ज्यासी कळला विवेक ।
साधुजनीं मोक्षदायेक । तोचि जाणावा ।२३।

आतां असो हें बोलणें । देव पाहावा भक्तपणें ।
तेणें त्याचें ऐश्वर्य बाणे । तत्काळ आंगीं ।२४।

देहचि होऊन राहिजे । तेणें देहदुःख साहिजे ।
देहातीत होतां पाविजे । परब्रह्म तें ।२५।

देहातीत कैसें होणें । कैसें परब्रह्म पावणें ।
ऐश्वर्याचीं लक्षणें । कवण सांगिजे ।२६।

ऐसें श्रोतां आक्षेपिलें । याचें उत्तर काये बोलिलें ।
तेंचि आतां निरोपिलें । सावध ऐका ।२७।

देहातीत वस्तु आहे । तें तूं परब्रह्म पाहे ।
देहसंग हा न साहे । तुज विदेहासी ।२८।

ज्याची बुद्धी होये ऐसी । वेद वर्णिती तयासी ।
शोधितां नाना शास्त्रांसी । न पडे ठाईं ।२९।

ऐश्वर्य ऐसें तत्वतां । बाणे देहबुद्धि सोडितां ।
देह मी ऐसें भावितां । अधोगती ।३०।

याकारणें साधुवचन । मानूं नये अप्रमाण ।
मिथ्या मानितां दूषण । लागों पाहे ।३१।

साधुवचन तें कैसें । काये धरावें विश्वासें ।
येक वेळ स्वामी ऐसें । मज निरोपावें ।३२।

सोहं आत्मा स्वानंदघन । अजन्मा तो तूंचि जाण ।
हेंचि साधूचें वचन । सदृढ धरावें ।३३।

महावाक्याचें अंतर । तूंचि ब्रह्म निरंतर ।
ऐसिया वचनाचा विसर । पडोंचि नये ।३४।

देहासि होईल अंत । मग मी पावेन अनंत ।
ऐसें बोलणें निर्भ्रांत । मानूंचि नये ।३५।

येक मूर्ख ऐसें म्हणती । माया नासेल कल्पांतीं ।
मग आम्हांस ब्रह्मप्राप्ती । येरवीं नाहीं ।३६।

मायेसी होईल कल्पांत । अथवा देहासी येईल अंत ।
तेव्हां पावेन निवांत । परब्रह्म मी ।३७।

हें बोलणें अप्रमाण । ऐसें नव्हे समाधान ।
समाधानाचें लक्षण । वेगळेंचि असे ।३८।

शैन्य अवघेंचि मरावें । मग राज्यपद प्राप्त व्हावें ।
शैन्य अस्तांचि राज्य करावें । हें कळेना ।३९।

माया असोनिच नाहीं । देह असतांच विदेही ।
ऐसें समाधान कांहीं । वोळखावें ।४०।

राज्यपद हातासी आलें । मग परिवारें काय केलें ।
परिवारा देखतां राज्य गेलें । हें तों घडेना ।४१।

प्राप्त जालियां आत्मज्ञान । तैसें दृश्य देहभान ।
दृष्टीं पडतां समाधान । जाणार नाहीं ।४२।

मार्गीं मुळी सर्पाकार । देखतां भये आलें थोर ।
कळतां तेथीचा विचार । मग मारणें काये ।४३।

तैसी माया भयानक । विचार पाहातां माईक ।
मग तयेचा धाक । कासया धरावा ।४४।

देखतां मृगजळाचे पूर । म्हणे कैसा पावों पैलपार ।
कळतां तेथीचा विचार । सांकडें कैंचें ।४५।

देखतां स्वप्न भयानक । स्वप्नीं वाटे परम धाक ।
जागृती आलीयां साशंक । कासया व्हावें ।४६।

तथापी माया कल्पनेसी दिसे । आपण कल्पनेतीत असे ।
तेथें उद्वेग काईसे । निर्विकल्पासी ।४७।

अंतीं मती तेचि गती । ऐसें सर्वत्र बोलती ।
तुझा अंतीं तुझी प्राप्ती । सहजचि जाली ।४८।

चौंदेहांचा अंत । आणी जन्म मुळाचा प्रांत ।
अंतांप्रांतासी अलिप्त । तो तूं आत्मा ।४९।

जयासी ऐसी आहे मती । तयास ज्ञानें आत्मगती ।
गती आणी अवगती । वेगळाचि तो ।५०।

मति खुंटली वेदांची । तेथें गती आणी अवगती कैंची ।
आत्मशास्त्रगुरुप्रचितीची । ऐक्यता आली ।५१।

जीवपणाची फिटली भ्रांती । वस्तु आली आत्मप्रचिती ।
प्राणी पावला उत्तम गती । सद्गुरुबोधें ।५२।

सद्गुरुबोध जेव्हां जाला । चौंदेहांस अंत आला ।
तेणें निजध्यास लागला । सस्वरूपीं ।५३।

तेणें निजध्यासें प्राणी । ध्येयचि जाला निर्वाणीं ।
सायोज्यमुक्तीचा धनी । होऊन बैसला ।५४।

दृश्य पदार्थ वोसरतां । आवघा आत्माचि तत्वतां ।
नेहटून विचारें पाहातां । दृश्य मुळींच नाहीं ।५५।

मिथ्या मिथ्यत्वें पाहिलें । मिथ्यापणें अनुभवा आलें ।
श्रोतीं पाहिजे ऐकिलें । या नांव मोक्ष ।५६।

सद्गुरुवचन हृदईं धरी । तोचि मोक्षाचा अधिकारी ।
श्रवण मनन केलेंचि करी । अत्यादरें ।५७।

जेथें आटती दोनी पक्ष । तेथें लक्ष ना अलक्ष ।
या नांव जाणिजे मोक्ष । नेमस्त आत्मा ।५८।

जेथें ध्यान धारणा सरे । कल्पना निर्विकल्पीं मुरे ।
केवळ ज्ञेप्तिमात्र उरे । सूक्ष्म ब्रह्म ।५९।

भवमृगजळ आटलें । लटिकें बंधन सुटलें ।
अजन्म्यास मुक्त केलें । जन्मदुःखापासुनी ।६०।

निःसंगाची संगव्याधी । विदेहाची देहबुद्धी ।
विवेकें तोडिली उपाधी । निःप्रपंचाची ।६१।

अद्वैताचें तोडिलें द्वैत । येकांतास दिला येकांत ।
अनंतास दिला अंत । अनंताचा ।६२।

जागृतीस चेवविलें । चेईऱ्यास सावध केलें ।
निजबोधास प्रबोधिलें । आत्मज्ञान ।६३।

अमृतास केलें अमर । मोक्षास मुक्तीचें घर ।
संयोगास निरंतर । योग केला ।६४।

निर्गुणास निर्गुण केलें । सार्थकाचे सार्थक जालें ।
बहुतां दिवसां भेटलें । आपणासि आपण ।६५।

तुटला द्वैताचा पडदा । अभेदें तोडिलें भेदा ।
भूतपंचकाची बाधा । निरसोन गेली ।६६।

जालें साधनाचें फळ । निश्चळास केलें निश्चळ ।
निर्मळाचा गेला मळ । विवेकबळें ।६७।

होतें सन्निध चुकलें । ज्याचें त्यास प्राप्त जालें ।
आपणा देखतां फिटलें । जन्मदुःख ।६८।

दुष्ट स्वप्नें जाजावला । ब्राह्मण नीच याती पावला ।
आपणासि आपण सांपडला । जागेपणें ।६९।

ऐसें जयास जालें ज्ञान । तया पुरुषाचें लक्षण ।
पुढिले समासीं निरूपण । बोलिलें असे ।७०।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आत्मदर्शननाम'
समास आठवा समाप्त.

❑❑

दशक ८ : समास ९

सिद्धलक्षण

॥ श्रीराम ॥

अंतरीं गेलियां अमृत । बाह्य काया लखलखित ।
अंतरस्थिति बाणतां संत– । लक्षणें कैसीं ।१।

जालें आत्मज्ञान बरवें । हे कैसेनि पां जाणावें ।
म्हणोनि बोलिलीं स्वभावें । साधुलक्षणें ।२।

ऐक सिद्धांचें लक्षण । सिद्ध म्हणिजे स्वरूप जाण ।
तेथें पाहातां वेगळेपण । मुळींच नाहीं ।३।

स्वरूप होऊन राहिजे । तया नांव सिद्ध बोलिजे ।
सिद्धस्वरूपींच साजे । सिद्धपण ।४।

वेदशास्त्रीं जें प्रसिद्ध । सस्वरूप स्वतसिद्ध ।
तयासिच बोलिजे सिद्ध । अन्यथा न घडे ।५।
तथापी बोलों कांहीं येक । साधकास कळाया विवेक ।
सिद्धलक्षणाचें कौतुक । तें हें ऐसें असे ।६।
अंतरस्थित स्वरूप जाली । पुढें काया कैसी वर्तली ।
जैसी स्वप्नींची नाथिली । स्वप्नरचना ।७।
तथापी सिद्धांचें लक्षण । कांहीं करूं निरूपण ।
जेणें बाणे अंतर्खूण । परमार्थाची ।८।
सदा स्वरूपानुसंधान । हें मुख्य साधूचें लक्षण ।
जनीं असोन आपण । जनावेगळा ।९।
स्वरूपीं दृष्टी पडतां । तुटोन गेली संसारचिंता ।
पुढें लागली ममता । निरूपणाची ।१०।
हें साधकाचें लक्षण । परी सिद्धाआंगीं असे जाण ।
सिद्धलक्षण साधकेंविण । बोलोंच नये ।११।
बाह्य साधकाचे परी । आणि स्वरूपाकार अंतरीं ।
सिद्धलक्षण तें चतुरीं । जाणिजे ऐसें ।१२।
संदेहरहित साधन । तेंचि सिद्धांचें लक्षण ।
अंतर्बाह्य समाधान । चळेना ऐसें ।१३।
अचळ जाली अंतरस्थिती । तेथें चळणास कैंची गती ।
स्वरूपीं लागतां वृत्ती । स्वरूपचि जाली ।१४।
मग तो चळतांच अचळ । चंचळपणें निश्चळ ।
निश्चळ असोन चंचळ । देह त्याचा ।१५।
स्वरूपीं स्वरूपचि जाला । मग तो पडोनिच राहिला ।
अथवा उठोनि पळाला । तरी चळेना ।१६।

येथें कारण अंतरस्थिती । अंतरींच पाहिजे निवृत्ती ।
अंतर लागलें भगवंतीं । तोचि साधु ।१७।

बाह्य भलतैसें असावें । परी अंतर स्वरूपीं लागावें ।
लक्षणें दिसती स्वभावें । साधुआंगीं ।१८।

राजीं बैसतां अवलिळा । आंगीं बाणे राजकळा ।
स्वरूपीं लागतां जिव्हाळा । लक्षणें बाणती ।१९।

येरव्हीं अभ्यास करितां । हातां न चढती सर्वथा ।
स्वरूपीं राहावें तत्वतां । स्वरूप होऊनी ।२०।

अभ्यासाचा मुगुटमणी । वृत्ती राहावी निर्गुणीं ।
संतसंगें निरूपणीं । स्थिती बाणे ।२१।

ऐसीं लक्षणें बरवीं । स्वरूपाकारें अभ्यासावीं ।
स्वरूप सोडितां गोसावी । भांबावती ।२२।

आतां असो हें बोलणें । ऐका साधूचीं लक्षणें ।
जेणें समाधान बाणे । साधकाआंगीं ।२३।

स्वरूपीं भरतां कल्पना । तेथें कैची उरेल कामना ।
म्हणौनियां साधुजना । कामचि नाहीं ।२४।

कल्पिला विषयो हातींचा जावा । तेणें गुणें क्रोध यावा ।
साधुजनाचा अक्षै ठेवा । जाणार नाहीं ।२५।

म्हणोनि ते क्रोधरहित । जाणती स्वरूप संत ।
नासिवंत हे पदार्थ । सांडुनियां ।२६।

जेथें नाहीं दुसरी परी । क्रोध यावा कोणावरी ।
क्रोधरहित सचराचरीं । साधुजन वर्तती ।२७।

आपुला आपण स्वानंद । कोणावरी करावा मद ।
याकारणें वादवेवाद । तुटोन गेला ।२८।

साधु स्वरूप निर्विकार । तेथें कैंचा तिरस्कार ।
आपला आपण मत्सर । कोणावरी करावा ।२९।

साधु वस्तु अनायासें । याकारणें मत्सर नसे ।
मदमत्सराचें पिसें । साधुसी नाहीं ।३०।

साधु स्वरूप स्वयंभ । तेथें कैंचा असेल दंभ ।
जेथें द्वैताचा आरंभ । जालाच नाहीं ।३१।

जेणें दृश्य केलें विसंच । तयास कैंचा हो प्रपंच ।
याकारणें निःप्रपंच । साधु जाणावा ।३२।

अवघे ब्रह्मांड त्याचें घर । पंचभूतिक हा जोजार ।
मिथ्या जाणोन सत्वर । त्याग केला ।३३।

याकारणें लोभ नसे । साधु सदा निर्लोभ असे ।
जयाची वासना समरसे । शुद्धस्वरूपीं ।३४।

आपुला आपण आघवा । स्वार्थ कोणाचा करावा ।
म्हणोनि साधु तो जाणावा । शोकरहित ।३५।

दृश्य सांडून नासिवंत । स्वरूप सेविलें शाश्वत ।
याकारणें शोकरहित । साधु जाणावा ।३६।

शोकें दुखवावी वृत्ती । तरी ते जाहाली निवृत्ती ।
ह्मणौनि साधु आदिअंतीं । शोकरहित ।३७।

मोहें झळंबावें मन । तरी तें जाहालें उन्मन ।
याकारणें साधुजन । मोहातीत ।३८।

साधु वस्तु अद्वये । तेथें कैंचें वाटेल भये ।
परब्रह्म तें निर्भये । तोचि साधु ।३९।

याकारणें भयातीत । साधु निर्भय निवांत ।
सकळांस मांडेल अंत । साधु अनंतरूपी ।४०।

सत्यस्वरूपें अमर जाला । भये कैंचें वाटेल त्याला ।
याकारणें साधुजनाला । भयेचि नाहीं ।४१।

जेथें नाहीं द्वंद्वभेद । आपला आपण अभेद ।
तेथे कैंचा उठेल खेद । देहबुद्धीचा ।४२।

बुद्धीनें नेमिलें निर्गुणा । त्यास कोणीच नेईना ।
याकारणें साधुजना । खेदचि नाहीं ।४३।

आपण येकला ठाईंचा । स्वार्थ करावा कोणाचा ।
दृश्य नस्तां स्वार्थाचा । ठावचि नाहीं ।४४।

साधु आपणचि येक । तेथें कैंचा दुःखशोक ।
दुजेविण अविवेक । येणार नाहीं ।४५।

आशा धरितां परमार्थाची । दुराशा तुटली स्वार्थाची ।
म्हणोन नैराशता साधूची । वोळखण ।४६।

मृदपणें जैसें गगन । तैसें साधूचें लक्षण ।
याकारणें साधुवचन । कठीण नाहीं ।४७।

स्वरूपाचा संयोगीं । स्वरूपचि जाला योगी ।
याकारणें वीतरागी । निरंतर ।४८।

स्थिती बाणतां स्वरूपाची । चिंता सोडिली देहाची ।
याकारणें होणाराची । चिंता नसे ।४९।

स्वरूपीं लागतां बुद्धी । तुटे अवघी उपाधी ।
याकारणें निरोपाधी । साधुजन ।५०।

साधु स्वरूपींच राहे । तेथें संगचि न साहे ।
म्हणोनि साधु तो न पाहे । मानापमान ।५१।

अलक्षास लावी लक्ष । म्हणोन साधु परम दक्ष ।
वोढूं जाणती कैपक्ष । परमार्थाचा ।५२।

स्वरूपीं न साहे मळ । ह्मणौन साधु तो निर्मळ ।
साधु स्वरूपचि केवळ । म्हणोनियां ।५३।

सकळ धर्मांमधें धर्म । स्वरूपीं राहाणें हा स्वधर्म ।
हेंचि जाणिजे मुख्य वर्म । साधुलक्षणाचें ।५४।

धरितां साधूची संगती । आपषाच लागे स्वरूपस्थिती ।
स्वरूपस्थितीनें बाणती । लक्षणें आंगीं ।५५।

ऐसीं साधूचीं लक्षणें । आंगीं बाणती निरूपणें ।
परंतु स्वरूपीं राहाणें । निरंतर ।५६।

निरंतर स्वरूपीं राहातां । स्वरूपचि होईजे तत्वतां ।
मग लक्षणें आंगीं बाणतां । वेळ नाहीं ।५७।

स्वरूपीं राहिल्यां मती । अवगुण अवघेचि सांडती ।
परंतु यासी सत्संगती । निरूपण पाहिजे ।५८।

सकळ सृष्टीचा ठाईं । अनुभव येकचि नाहीं ।
तो बोलिजेल सर्वही । पुढिले समासीं ।५९।

कोणें स्थितीनें राहाती । कैसा अनुभव पाहाती ।
रामदास म्हणे श्रोतीं । अवधान देणें ।६०।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सिद्धलक्षणनाम'
समास नववा समाप्त.

❑❑

दशक ८ : समास १०

सुन्यत्वनिर्शन

॥ श्रीराम ॥

जनाचे अनुभव पुसतां । कळहो उठिला अवचिता ।
हा कथाकल्लोळ श्रोतां । कौतुकें ऐकावा । १ ।

येक म्हणती हा संसारु । करितां पाविजे पैलपारु ।
आपला नव्हे कीं जोजारु । जीव देवाचे । २ ।

येक म्हणती हें न घडे । लोभ येऊन आंगीं जडे ।
पोटस्तें करणें घडे । सेवा कुटुंबाची । ३ ।

येक म्हणती स्वभावें । संसार करावा सुखें नावें ।
कांहीं दानपुण्य करावें । सद्गतीकारणें । ४ ।

येक म्हणती संसार खोटा । वैराग्यें घ्यावा देशवटा ।
येणें स्वर्गलोकींच्या वाटा । मोकळ्या होती । ५ ।

येक म्हणती कोठें जावें । वेर्थची कासया हिंडावें ।
आपुले आश्रमीं असावें । आश्रमधर्म करूनी । ६ ।

येक म्हणती कैंचा धर्म । अवघा होतसे अधर्म ।
ये संसारीं नाना कर्म । करणें लागे । ७ ।

येक म्हणती बहुतांपरी । वासना असावी बरी ।
येणेंचि तरिजे संसारीं । अनायासें । ८ ।

येक म्हणती कारण भाव । भावेंचि पाविजे देव ।
येर हें अवघेंचि वाव । गथागोवी । ९ ।

येक म्हणती वडिलें जीवीं । अवघीं देवचि मानावीं ।
मायेबापें पूजित जावीं । येकाभावें । १० ।

येक म्हणती देवब्राह्मण । त्यांचें करावें पूजन ।
मायेबाप नारायेण । विश्वजनाचा ।११।
येक म्हणती शास्त्र पाहावें । तेथें निरोपिलें देवें ।
तेणें प्रमाणेंचि जावें । परलोकासी ।१२।
येक म्हणती अहो जना । शास्त्र पाहातां पुरवेना ।
याकारणें साधुजना । शरण जावें ।१३।
येक म्हणती सांडा गोठी । वायांचि करितां चाउटी ।
सर्वांस कारण पोटीं । भूतदया असावी ।१४।
येक म्हणती येकचि बरवें । आपुल्या आचारें असावें ।
अंतकाळीं नाम घ्यावें । सर्वोत्तमाचें ।१५।
येक म्हणती पुण्य असेल । तरीच नाम येईल ।
नाहीं तरी भुली पडेल । अंतकाळीं ।१६।
येक म्हणती जीत असावें । तंवचि सार्थक करावें ।
येक म्हणती फिरावें । तीर्थाटण ।१७।
येक म्हणती हें अटाटी । पाणीपाषाणाची भेटी ।
चुबकुळ्या मारितां हिंपुटी । कासाविस व्हावें ।१८।
येक म्हणती सांडी वाचाळी । अगाध महिमा भूमंडळीं ।
दर्शनमात्रें होये होळी । माहापातकाची ।१९।
येक म्हणती तीर्थ स्वभावें । कारण मन अवरावें ।
येक म्हणती कीर्तन करावें । सावकास ।२०।
येक म्हणती योग बरवा । मुख्य तोचि आधीं साधावा ।
देहो अमरचि करावा । अकस्मात ।२१।
येक म्हणती ऐसें काये । काळवंचना करूं नये ।
येक म्हणती धरावी सोये । भक्तिमार्गाची ।२२।

येक म्हणती ज्ञान बरवें । येक म्हणती साधन करावें।
येक म्हणती मुक्त असावें । निरंतर ।२३।

येक म्हणती अनर्गळा । धरीं पापाचा कंटाळा ।
येक म्हणती रे मोकळा । मार्ग आमुचा ।२४।

येक म्हणतीं हें विशेष । करूं नये निंदा द्वेष ।
येक म्हणती सावकास । दुष्टसंग त्यागावा ।२५।

येक म्हणती ज्याचें खावें । त्या सन्मुखचि मरावें ।
तेणें तत्काळचि पावावें । मोक्षपद ।२६।

येक म्हणती सांडा गोठी । आधीं पाहिजे ते रोटी ।
मग करावी चाउटी । सावकास ।२७।

येक म्हणती पाउस असावा । मग सकळ योग बरवा ।
कारण दुष्काळ न पडावा । म्हणिजे बरें ।२८।

येक म्हणती तपोनिधी– । होतां, वोळती सकळ सिद्धी ।
येक म्हणती रे आधीं । इंद्रपद साधावें ।२९।

येक म्हणती आगम पाहावा । वेताळ प्रसन्न करून घ्यावा ।
तेणें पाविजे देवा । स्वर्गलोकीं ।३०।

येक म्हणती अघोरमंत्र । तेणें होईजे स्वतंत्र ।
श्रीहरी जयेचा कळत्र । तेचि वोळे ।३१।

ती लागले सर्व धर्म । तेथें कैंचें क्रियाकर्म ।
येक म्हणती कुकर्म । तिच्या मदें ।३२।

येक म्हणती येक साक्षप । करावा मृत्युंजयाचा जप ।
तेणें गुणें सर्व संकल्प । सिद्धीतें पावती ।३३।

येक म्हणती बटु भैरव । तेणें पाविजे वैभव ।
येक म्हणती झोटिंग सर्व । पुर्वितसे ।३४।

येक म्हणती काळी कंकाळी । येक म्हणती भद्रकाळी ।
येक म्हणती उचिष्ट चांडाळी । साहें करावी ।३५।

येक म्हणती विघ्नहर । येक म्हणती भोळा शंकर ।
येक म्हणती सत्वर । पावे भगवती ।३६।

येक म्हणती मल्लारी । सत्वरचि सभाग्य करी ।
येक म्हणती माहा बरी । भक्ति वेंकटेशाची ।३७।

येक म्हणती पूर्व ठेवा । येक म्हणती प्रेत्न करावा ।
येक म्हणती भार घालावा । देवाचवरी ।३८।

येक म्हणती देव कैंचा । अंतचि पाहातो भल्यांचा ।
येक म्हणती हा युगाचा । युगधर्म ।३९।

येक आश्चीर्य मानिती । येक विस्मयो करिती ।
येक कंटाळोन म्हणती । काये होईल तें पाहावें ।४०।

ऐसे प्रपंचिक जन । लक्षणें सांगतां गहन ।
परंतु कांहींयेक चिन्ह । अल्पमात्र बोलिलें ।४१।

आतां असो हा स्वभाव । ज्ञात्यांचा कैसा अनुभव ।
तोहि सांगिजेल सर्व । सावध ऐका ।४२।

येक म्हणती करावी भक्ती । श्रीहरी देईल सद्गती ।
येक म्हणती ब्रह्मप्राप्ती । कर्मेंचि होये ।४३।

येक म्हणती भोग सुटेना । जन्ममरण हें तुटेना ।
येक म्हणती उर्मी नाना । अज्ञानाच्या ।४४।

येक म्हणती सर्व ब्रह्म । तेथें कैंचे क्रियाकर्म ।
येक म्हणती हा अधर्म । बोलोंचि नये ।४५।

येक म्हणती सर्व नासे । उरलें तेंचि ब्रह्म असे ।
येक म्हणती ऐसें नसे । समाधान ।४६।

सर्व ब्रह्म केवळ ब्रह्म । दोनी पूर्वपक्षाचे भ्रम ।
अनुभवाचें वेगळें वर्म । म्हणती येक ।४७।

येक म्हणती हें न घडे । अनुर्वाच्य वस्तु घडे ।
जें बोलतां मोन्य पडे । वेदशास्त्रांसी ।४८।

तंव श्रोता अनुवादला । म्हणे निश्चये कोण केला ।
सिद्धांतमतें अनुभवाला । उरी कैंची ।४९।

अनुभव देहीं वेगळाले । हें पूर्वींच बोलिलें ।
आतां कांहीं येक केलें । नवचे कीं ।५०।

येक साक्षत्वें वर्तती । साक्षी वेगळाची म्हणती ।
आपण द्रष्टा ऐसी स्थिती । स्वानुभवाची ।५१।

दृश्यापासून द्रष्टा वेगळा । ऐसी अलिप्तपणाची कळा ।
आपण साक्षत्वें निराळा । स्वानुभवें ।५२।

सकळ पदार्थ जाणतां । तो पदार्थाहून पर्ता ।
देहीं असोन अलिप्तता । सहजचि जाली ।५३।

येक ऐसें स्वानुभवें । म्हणती साक्षत्वें वर्तावें ।
दृश्य असोनि वेगळें व्हावें । द्रष्टेपणें ।५४।

येक म्हणती नाहीं भेद । वस्तु ठाईंची अभेद ।
तेथें कैंचा मतिमंद । द्रष्टा आणिला ।५५।

अवघी साकरचि स्वभावें । तेथें कडु काय निवडावें ।
द्रष्टा कैंचा स्वानुभवें । अवघेंचि ब्रह्म ।५६।

प्रपंच परब्रह्म अभेद । भेदवादी मानिती भेद ।
परी हा आत्मा स्वानंद । आकारला ।५७।

विघुरलें तुप थिजलें । तैसें निर्गुणचि गुणा आलें ।
तेथें काये वेगळें केलें । द्रष्टेपणें ।५८।

म्हणौनि द्रष्टा आणि दृश्य । अवघा येकचि जगदीश ।
द्रष्टेपणाचे सायास । कासयासी ।५९।

ब्रह्मचि आकारलें सर्व । ऐसा येकांचा अनुभव ।
ऐसे हे दोनी स्वभाव । निरोपिले ।६०।

अवघा आत्मा आकारला । आपण भिन्न कैंचा उरला ।
दुसरा अनुभव बोलिला । ऐसियापरी ।६१।

ऐक तिसरा अनुभव । प्रपंच सारुनियां सर्व ।
कांहीं नाहीं तोचि देव । ऐसें म्हणती ।६२।

दृश्य अवघें वेगळें केलें । केवळ अदृश्यचि उरलें ।
तेंचि ब्रह्म अनुभविलें । म्हणती येक ।६३।

परी तें ब्रह्म म्हणों नये । उपायासारिखा अपाये ।
सुन्यत्वास ब्रह्म काये । म्हणों येईल ।६४।

दृश्य अवघें वोलांडिलें । अदृश्य सुन्यत्वीं पडिलें ।
ब्रह्म म्हणौनि मुरडलें । तेथुनिच मागें ।६५।

इकडे दृश्य तिकडे देव । मध्यें सुन्यत्वाचा ठाव ।
तयास मंद बुद्धीस्तव । प्राणी ब्रह्म ह्मणे ।६६।

रायास नाहीं वोळखिलें । सेवकास रावसें कल्पिलें ।
परी तें अवघें वेर्थ गेलें । राजा देखतां ।६७।

तैसें सुन्यत्व कल्पिलें ब्रह्म । पुढें देखतां परब्रह्म ।
सुन्यत्वाचा अवघा भ्रम । तुटोन गेला ।६८।

परी हा सूक्ष्म आडताळा । वारी विवेकें वेगळा ।
जैसें दुग्ध घेऊन जळा । राजहंस सांडी ।६९।

आधीं दृश्य सोडिलें । मग सुन्यत्व वोलांडिलें ।
मूळमायेपरतें देखिलें । परब्रह्म ।७०।

वेगळेपणें पाहाणें घडे । तेणें वृत्ति सुन्यत्वीं पडे ।
पोटीं संदेह पवाडे । सुन्यत्वाचा ।७१।

भिन्नपणें अनुभविलें । तयास सुन्य ऐसें बोलिलें ।
वस्तु लक्षितां अभिन्न जालें । पाहिजे आधीं ।७२।

वस्तु आपणचि होणें । ऐसें वस्तूचें पाहाणें ।
निश्चयेसीं भिन्नपणें । सुन्यत्व लाभे ।७३।
याकारणें सुन्य कांहीं । परब्रह्म होणार नाहीं ।
वस्तुरूप होऊन पाहीं । स्वानुभवें ।७४।
आपण वस्तु सिद्धचि आहे । मन मी ऐसें कल्पूं नये ।
साधु सांगती उपाये । तूंचि आत्मा ।७५।
मन मी ऐसें नाथिलें । संतीं नाहीं निरोपिलें ।
मानावें कोणाच्या बोलें । मन मी ऐसें ।७६।
संतवचनीं ठेवितां भाव । तोचि शुद्ध स्वानुभव ।
मनाचा तैसाच स्वभाव । आपण वस्तु ।७७।
जयाचा घ्यावा अनुभव । तोचि आपण निरावेव ।
आपुला घेती अनुभव । विश्वजन ।७८।
लोभी धन साधूं गेले । तंव ते लोभी धनचि जाले ।
मग तें भाग्यपुरुषीं भोगिलें । सावकास ।७९।
तैसें देहबुद्धि सोडितां । साधकास जालें तत्वतां ।
अनुभवाची मुख्य वार्ता । ते हे ऐसी ।८०।
आपण वस्तु मुळीं येक । ऐसा ज्ञानाचा विवेक ।
येथून हा ज्ञानदशक । संपूर्ण जाला ।८१।
आत्मज्ञान निरोपिलें । येथामतीनें बोलिलें ।
न्यूनपूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ।८२।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सुन्यत्वनिर्शननाम'
समास दहावा समाप्त.

❑❑

दशक आठवा समाप्त

❑❑

दशक नववा : गुणरूप

दशक ९ : समास १

आशंका

॥ श्रीराम ॥

निराकार म्हणिजे काये । निराधार म्हणिजे काये ।
निर्विकल्प म्हणिजे काये । मज निरोपावें । १ ।

निराकार म्हणिजे आकार नाहीं । निराधार म्हणिजे आधार नाहीं ।
निर्विकल्प म्हणिजे कल्पना नाहीं । परब्रह्मासी । २ ।

निरामय म्हणिजे काये । निराभास म्हणिजे काये ।
निरावेव म्हणिजे काये । मज निरोपावें। ३ ।

निरामय म्हणिजे जळमये नाहीं । निराभास म्हणिजे भासचि नाहीं ।
निरावेव म्हणिजे अवेव नाहीं । परब्रह्मासी । ४ ।

निःप्रपंच म्हणिजे काये । निःकळंक म्हणिजे काये ।
निरोपाधी म्हणिजे काये । मज निरोपावें । ५ ।

निःप्रपंच म्हणिजे प्रपंच नाहीं । निःकळंक म्हणिजे कळंक नाही ।
निरोपाधी म्हणिजे उपाधी नाहीं । परब्रह्मासी । ६ ।

निरोपम्य म्हणिजे काये । निरालंब म्हणिजे काये ।
निरापेक्षा म्हणिजे काये । मज निरोपावें । ७ ।

निरोपम्य म्हणिजे उपमा नाहीं । निरालंब म्हणिजे अवलंबन नाहीं ।
निरापेक्षा म्हणिजे अपेक्षा नाहीं । परब्रह्मासी । ८ ।

निरंजन म्हणिजे काये । निरंतर म्हणिजे काये ।
निर्गुण म्हणिजे काये । मज निरोपावें । ९ ।

निरंजन म्हणिजे जनचि नाहीं । निरंतर म्हणिजे अंतर नाहीं ।
निर्गुण म्हणिजे गुणचि नाहीं । परब्रह्मासी ।१०।

निःसंग म्हणिजे काये । निर्मळ म्हणिजे काये ।
निश्चळ म्हणिजे काये । मज निरोपावें ।११।

निःसंग म्हणिजे संगचि नाहीं । निर्मळ म्हणिजे मळचि नाहीं ।
निश्चळ म्हणिजे चळण नाहीं । परब्रह्मासी ।१२।

निशब्द म्हणिजे काये । निर्दोष म्हणिजे काये ।
निवृत्ती म्हणिजे काये । मज निरोपावें ।१३।

निशब्द म्हणिजे शब्दचि नाहीं । निर्दोष म्हणिजे दोषचि नाहीं ।
निवृत्ती म्हणिजे वृत्तिच नाहीं । परब्रह्मासी ।१४।

निःकाम म्हणिजे काये । निर्लेप म्हणिजे काये ।
निःकर्म म्हणिजे काये । मज निरोपावें ।१५।

निःकाम म्हणिजे कामचि नाहीं । निर्लेप म्हणिजे लेपचि नाहीं ।
निःकर्म म्हणिजे कर्मचि नाहीं । परब्रह्मासी ।१६।

अनाम्य म्हणिजे काये । अजन्मा म्हणिजे काये ।
अप्रत्यक्ष म्हणिजे काये । मज निरोपावें ।१७।

अनाम्य म्हणिजे नामचि नाहीं । अजन्मा म्हणिजे जन्मचि नाहीं ।
अप्रत्यक्ष म्हणिजे प्रत्यक्ष नाहीं । परब्रह्म तें ।१८।

अगणीत म्हणिजे काये । अकर्तव्य म्हणिजे काये ।
अक्षै म्हणिजे काये । मज निरोपावें ।१९।

अगणीत म्हणिजे गणीत नाहीं । अकर्तव्य म्हणिजे कर्तव्यता नाहीं ।
अक्षै म्हणिजे क्षयचि नाहीं । परब्रह्मासी ।२०।

अरूप म्हणिजे काये । अलक्ष म्हणिजे काये ।
अनंत म्हणिजे काये । मज निरोपावें ।२१।

अरूप म्हणिजे रूपचि नाहीं । अलक्ष म्हणिजे लक्षत नाहीं ।
अनंत म्हणिजे अंतचि नाहीं । परब्रह्मासी ।२२।

अपार म्हणिजे काये । अढळ म्हणिजे काये ।
अतर्क्यें म्हणिजे काये । मज निरोपावें ।२३।

अपार म्हणिजे पारचि नाहीं । अढळ म्हणिजे ढळचि नाहीं ।
अतर्क्यें म्हणिजे तर्कत नाहीं । परब्रह्म तें ।२४।

अद्वैत म्हणिजे काये । अदृश्य म्हणिजे काये ।
अच्युत म्हणिजे काये । मज निरोपावें ।२५।

अद्वैत म्हणिजे द्वैतचि नाहीं । अदृश्य म्हणिजे दृश्यचि नाहीं ।
अच्युत म्हणिजे चेवत नाहीं । परब्रह्म तें ।२६।

अछेद म्हणिजे काये । अदाह्य म्हणिजे काये ।
अक्लेद म्हणिजे काये । मज निरोपावें ।२७।

अछेद म्हणिजे छेदेना । अदाह्य म्हणिजे जळेना ।
अक्लेद म्हणिजे कालवेना । परब्रह्म तें ।२८।

परब्रह्म म्हणिजे सकळांपरतें । तयास पाहातां आपणचि तें ।
हें कळे अनुभवमतें । सद्गुरु केलियां ।२९।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आशंकानाम'
समास पहिला समाप्त.

❑❑

दशक ९ : समास २

ब्रह्मनिरूपण

॥ श्रीराम ॥

जें जें कांहीं साकार दिसे । तें तें कल्पांतीं नासे ।
स्वरूप तें असतचि असे । सर्वकाळ । १ ।

जें सकळांमध्यें सार । मिथ्या नव्हे तें साचार ।
जें कां नित्य निरंतर । संचलें असे । २ ।

तें भगवंताचे निजरूप । त्यासि बोलिजे स्वरूप ।
याहि वेगळीं अमूप । नामें तयाचीं । ३ ।

त्यास नामाचा संकेत । कळावया हा दृष्टांत ।
परी तें स्वरूप नामातीत । असतचि असे । ४ ।

दृश्यासबाह्य संचलें । परी तें विश्वास चोरलें ।
जवळिच नाहींसें जालें । असतचि कैसें । ५ ।

ऐसा ऐकोनियां देव । उठे दृष्टीचा भाव ।
पाहों जातां दिसे सर्व । दृश्यचि आवघें । ६ ।

दृष्टीचा विषयो दृश्य । तोचि जालियां सादृश्य ।
तेणें दृष्टी पावे संतोष । परी तें देखणें नव्हे । ७ ।

दृष्टीस दिसे तें नासे । येतद्विषईं श्रुति असे ।
म्हणौन जें दृष्टीस दिसे । तें स्वरूप नव्हे । ८ ।

स्वरूप तें निराभास । आणी दृश्य भासलें साभास ।
भासास बोलिला नास । वेदांतशास्त्रीं । ९ ।

आणी पाहातां दृश्यचि भासे । वस्तु दृश्यावेगळी असे ।
स्वानुभवें पाहातां दिसे । दृश्यासबाह्य । १० ।

जें निराभास निर्गुण । त्याची काये सांगावी खूण ।
परी तें स्वरूप जाण । सन्निधचि असे ।।११।।

जैसा आकाशीं भासला भास । आणि सकळांमधें आकाश ।
तैसा जाणिजे जगदीश । सबाह्य अभ्यांतरीं ।।१२।।

उदकामधें परी भिजेना । पृथ्वीमधें परी झिजेना ।
वन्हीमधें परी सिजेना । स्वरूप देवाचें ।।१३।।

तें रेंद्यामध्यें परी बुडेना । तें वायोमधें परी उडेना ।
सुवर्णीं असे परी घडेना । सुवर्णासारिखें ।।१४।।

ऐसें जें संचलें सर्वदा । परी तें आकळेना कदा ।
अभेदामाजी वाढवी भेदा । ते हे अहंता ।।१५।।

तिच्या स्वरूपाची खूण । सांगों कांहीं वोळखण ।
अहंतेचें निरूपण । सावध ऐका ।।१६।।

जे स्वरूपाकडे पावे । अनुभवासवें झेंपावे ।
अनुभवाचे शब्द आघवे । बोलोन दावी ।।१७।।

म्हणे आतां मीच स्वरूप । तेंचि अहंतेचें रूप ।
निराकारीं आपेंआप । वेगळी पडे ।।१८।।

स्वयें मीच आहे ब्रह्म । ऐसा अहंतेचा भ्रम ।
ऐसिये सूक्ष्मीं सूक्ष्म । पाहातां दिसे ।।१९।।

कल्पना आकळी हेत । वस्तु कल्पनातीत ।
म्हणौन नाकळे अंत । अनंताचा ।।२०।।

अन्वये आणी वीतरेक । हा शब्दभेद कोणीयेक ।
निशब्दाचा अंतरविवेक । शोधिला पाहिजे ।।२१।।

आधीं घेईजे वाच्यांश । मग वोळखिजे लक्ष्यांश ।
लक्ष्यांशीं पाहातां वाच्यांश । असेल कैंचा ।।२२।।

सर्वब्रह्म आणी विमळब्रह्म । हा वाच्यांशाचा अनुक्रम ।
शोधितां लक्ष्यांशाचें वर्म । वाच्यांश नसे ।२३।

सर्व विमळ दोनी पक्ष । वाच्यांशीं आटती प्रत्यक्ष ।
लक्ष्यांशीं लावितां लक्ष । पक्षपात घडे ।२४।

हें लक्ष्यांशें अनुभवणें । येथें नाहीं वाच्यांश बोलणें ।
मुख्य अनुभवाचे खुणे । वाचारंभ कैंचा ।२५।

परा पश्यंती मध्यमां वैखरी । जेथें वोसरती च्यारी ।
तेथें शब्दकळाकुंसरी । कोण काज ।२६।

शब्द बोलतां सवेंच नासे । तेथें शाश्वतता कोठें असे ।
प्रत्यक्षास प्रमाण नसे । बरें पाहा ।२७।

शब्द प्रत्यक्ष नासिवंत । म्हणोन घडे पक्षपात ।
सर्व विमळ ऐसा हेत । अनुभवीं नाहीं ।२८।

ऐक अनुभवाचें लक्षण । अनुभव म्हणिजे अनन्य जाण ।
ऐक अनन्याचें लक्षण । ऐसें असे ।२९।

अनन्य म्हणिजे अन्य नसे । आत्मनिवेदन जैसें ।
संगभंगें असतचि असे । आत्मा आत्मपणें ।३०।

आत्म्यास नाहीं आत्मपण । हेंचि निःसंगाचें लक्षण ।
हें वाच्यांशें बोलिलें जाण । कळावया कारणें ।३१।

येरवीं लक्ष्यांश तो वाच्यांशें । सांगिजेल हें घडे कैसें ।
वाक्यविवरणें अपैसें । कळों लागे ।३२।

करावें तत्वविवरण । शोधावें ब्रह्म निर्गुण ।
पाहावें आपणास आपण । म्हणिजे कळे ।३३।

हें न बोलतांच विवरिजे । विवरोन विरोन राहिजे ।
मग अबोलणेंचि साजे । माहापुरुषीं ।३४।

शब्दचि निशब्द होती । श्रुति नेति नेति ह्मणती ।
हें तों आलें आत्मप्रचिती । प्रत्यक्ष आतां ।३५।

प्रचित आलियां अनुमान । हा तों प्रत्यक्ष दुराभिमान ।
तरी आतां मी अज्ञान । मज कांहींच न कळे ।३६।

मी लटिका माझें बोलणें लटिकें । मी लटिका माझें चालणें लटिकें ।
मी माझें अवघेंचि लटिकें । कल्पनिक ।३७।

मज मुळींच नाहीं ठाव । माझें बोलणें अवघेंचि वाव ।
हा प्रकृतीचा स्वभाव । प्रकृती लटिकी ।३८।

प्रकृति आणी पुरुष । यां दोहींस जेथें निरास ।
तेथें मीपण विशेष । हें केंवि घडे ।३९।

जेथें सर्वही अशेष जालें । तेथें विशेष कैंचें आलें ।
मी मौनी म्हणतां भंगलें । मौन्य जैसें ।४०।

आता मौन्य न भंगावें । करून कांहींच न करावें ।
असोन निशेष नसावें । विवेकबळें ।४१।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'ब्रह्मनिरूपणनाम'
समास दुसरा समाप्त.

❑❑

दशक ९ : समास ३
निःसंदेह निरूपण

॥ श्रीराम ॥

श्रोतीं केला अनुमान । ऐसें कैसें ब्रह्मज्ञान ।
कांहींच नाहीं असोन । हें केंवि घडे । १ ।

सकळ करून अकर्ता । सकळ भोगून अभोक्ता ।
सकळांमधें अलिप्तता । येईल कैसी । २ ।

तथापी तुम्ही म्हणतां । योगी भोगून अभोक्ता ।
स्वर्गनर्कहि आतां । येणें न्यायें । ३ ।

जन्म मृत्य भोगीलेच भोगी । परी तो भोगून अभोक्ता योगी ।
यातनाहि तयालागीं । येणेंचि पाडें । ४ ।

कुटून नाहीं कुटिला । रडोन नाहीं रडला ।
कुंथोन नाहीं कुंथिला । योगेश्वर । ५ ।

जन्म नसोन घातला । पतित नसोन जाला ।
यातना नसोन पावला । नानापरी । ६ ।

ऐसा श्रोतयांचा अनुमान । श्रोतीं घेतलें आडरान ।
आतां याचें समाधान । केलें पाहिजे । ७ ।

वक्ता म्हणे सावध व्हावें । तुम्ही बोलतां बरवें ।
परी हें तुमच्याच अनुभवें । तुम्हास घडे । ८ ।

ज्याचा अनुभव जैसा । तो तो बोलतो तैसा ।
संपदेविण जो धिवसा । तो निरार्थक । ९ ।

नाहीं ज्ञानाची संपदा । अज्ञानदारिद्रें आपदा ।
भोगिल्याच भोगी सदा । शब्दज्ञानें ।१०।

योगी वोळखावा योगेश्वरें । ज्ञानी वोळखावा ज्ञानेश्वरें ।
माहाचतुर तो चतुरें । वोळखावा ।११।

अनुभवी अनुभवियास कळे । अलिप्त अलिप्तपणें निवळे ।
विदेहाचा देहभाव गळे । विदेही देखतां ।१२।

बद्धासारिखा सिद्ध । आणी सिद्धासारिखा बद्ध ।
येक भावील तो अबद्ध । म्हणावाच नलगे ।१३।

झडपला तो देहधारी । आणी देहधारक पंचाक्षरी ।
परंतु दोघां येकसरी । कैसी द्यावी ।१४।

तैसा अज्ञान पतित । आणी ज्ञानी जीवन्मुक्त ।
दोघे समान मानील तो युक्त । कैसा म्हणावा ।।१५।।

आतां असो हे दृष्टांत । प्रचित बोलों कांहीं हेत ।
येथें श्रोतीं सावचित्त । क्षणयेक व्हावें ।।१६।।

जो जो ज्ञानें गुप्त जाला । जो विवेकें विराला ।
जो अनन्यपणें उरला- । नाहींच कांहीं ।।१७।।

तयास कैसें गवसावें । शोधूं जातां तोचि व्हावें ।
तोचि होतां म्हणावें । नलगे कांहीं ।।१८।।

देहीं पाहातां दिसेना । तत्त्वें शोधितां भासेना ।
ब्रह्म आहे निवडेना- । कांहीं केल्यां ।।१९।।

दिसतो तरी देहधारी । परी कांहींच नाहीं अंतरीं ।
तयास पाहातां वरिवरी । कळेल कैसा ।।२०।।

कळाया शोधावें अंतर । तंव तो नित्य निरंतर ।
जयास धुंडितां विकार । निर्विकार होती ।।२१।।

तो परमात्मा केवळ । तयास नाहीं मायामळ ।
अखंड हेतुचा विटाळ । जालाच नाहीं ।।२२।।

ऐसा जो कां योगीराज । तो आत्मा सहजीं सहज ।
पूर्णब्रह्म वेदबीज । देहाकारें कळेना ।।२३।।

देह भावितां देहचि दिसे । परी अंतर अनारिसें असे ।
तयास शोधितां नसे । जन्ममरण ।।२४।।

जयास जन्ममरण व्हावें । तें तो नव्हेचि स्वभावें ।
नाहींच तें आणावें । कोठून कैंचें ।।२५।।

निर्गुणास जन्म कल्पिला । अथवा निर्गुण उडविला ।
तरी उडाला आणी जन्मला । आपला आपण ।।२६।।

माध्यानीं थुंकितां सूर्यावरी । तो थुंका पडेल आपणाच वरी ।
दुसऱ्यास चिंतितां अंतरीं । आपणास घडे ।२७।

समर्थ रायाचें महिमान । जाणतां होतें समाधान ।
परंतु भुंकों लागलें स्वान । तरी तें स्वानचि आहे ।२८।

ज्ञानी तो सत्यस्वरूप । अज्ञान देखे मनुष्यरूप ।
भावासारिखा फळद्रूप । देव तैसा ।२९।

देव निराकार निर्गुण । लोक भाविती पाषाण ।
पाषाण फुटतो निर्गुण । फुटेल कैसा ।३०।

देव सदोदित संचला । लोकीं बहुविध केला ।
परंतु बहुविध जाला । हें तो घडेना ।३१।

तैसा साधु आत्मज्ञानी । बोधें पूर्ण समाधानी ।
विवेकें आत्मनिवेदनी । आत्मरूपी ।३२।

जळोन काष्ठाचा आकार । अग्नि दिसे काष्ठाकार ।
परी काष्ठ होईल हा विचार । बोलोंच नये ।३३।

कर्पूर असे तो जळतां दिसे । तैसा ज्ञानीदेह भासे ।
तयास जन्मवितां कैसें । कर्दळीउदरीं ।३४।

बीज भाजलें उगवेना । वस्त्र जळालें उकलेना ।
वोघ निवडितां निवडेना । गंगेमधें ।३५।

वोघ गंगेमागें दिसे । गंगा येकदेसी असे ।
साधु कांहींच न भासे । आणी आत्मा सर्वगत ।३६।

सुवर्ण नव्हे लोखंड । साधूस जन्म थोतांड ।
अज्ञान प्राणी जडमूढ । तयास हें उमजेचिना ।३७।

अंधास कांहींच न दिसे । तरी ते लोक आंधळे कैसे ।
सन्नपातें बरळतसे । सन्नपाती ।३८।

जो स्वप्नामधें भ्याला । तो स्वप्नभयें वोसणाला ।
तें भये जागत्याला । केवि लागे ।३९।

मुळी सर्पाकार देखिली । येक भ्याला येकें वोळखिली ।
दोघांची अवस्ता लेखिली । सारिखीच कैसी ।४०।

हातीं धरितांहि डसेना । हें येकास भासेना ।
तरी ते त्याची कल्पना । तयासीच बाधी ।४१।

विंचु सर्प डसला । तेणें तोचि जाकळला ।
तयाचेनि लोक जाला । कासावीस कैसा ।४२।

आतां तुटला अनुमान । ज्ञानियांस कळे ज्ञान ।
अज्ञानास जन्ममरण । चुकेचिना ।४३।

येका जाणण्यासाठीं । लोक पडिले अटाटी ।
नेणपणें हिंपुटी होती । जन्ममृत्यें ।४४।

तेंचि कथानुसंधान । पुढें केलें परिछिन्न ।
सावधान सावधान । म्हणे वक्ता ।४५।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'निःसंदेहनिरूपणनाम'
समास तिसरा समाप्त.

❑❑

दशक ९ : समास ४
जाणपणनिरूपण

॥ श्रीराम ॥

पृथ्वीमधें लोक सकळ । येक संपन्न येक दुर्बळ ।
येक निर्मळ येक वोंगळ । काय निमित्य । १ ।

कित्येक राजे नांदती । कित्येक दरिद्र भोगिती ।
कितीयेकांची उत्तम स्थिती । कित्येक अधमोद्धम । २ ।

ऐसें काय निमित्य जालें । हें मज पाहिजे निरोपिलें ।
याचें उत्तर ऐकिलें । पाहिजे श्रोतीं । ३ ।

हे सकळ गुणापासी गती । सगुण भाग्यश्री भोगिती ।
अवगुणास दरिद्रप्राप्ती । येदर्थीं संदेह नाहीं । ४ ।

जो जो जेथें उपजला । तो ते वेवसाईं उमजला ।
तयास लोक म्हणती भला । कार्यकर्ता । ५ ।

जाणता तो कार्य करी । नेणता कांहींच न करी ।
जाणता तो पोट भरी । नेणता भीक मागे । ६ ।

हें तों प्रगटचि असे । जनीं पाहातां प्रत्यक्ष दिसे ।
विद्येवीण करंटा वसे । विद्या तो भाग्यवंत । ७ ।

आपुली विद्या न सिकसी । तरी काये भीक मागसी ।
जेथें तेथें बुद्धी ऐसी । वडिलें सांगती । ८ ।

वडिल आहे करंटा । आणी समर्थ होये धाकुटा ।
कां जे विद्येनें मोठा । म्हणोनियां । ९ ।

विद्या नाहीं बुद्धि नाहीं । विवेक नाहीं साक्षेप नाहीं ।
कुशळता नाहीं व्याप नाहीं । म्हणौन प्राणी करंटा ।१०।

इतुकेंहि जेथें वसे । तेथें वैभवास उणें नसे ।
वैभव सांडितां अपैसें । पाठीं लागे ।११।

वडिल समर्थ धाकुटा भिकारी । ऐका याची कैसी परी ।
वडिलाऐसा व्याप न करी । म्हणोनियां ।१२।

जैसी विद्या तैसी हांव । जैसा व्याप तैसें वैभव ।
तोलासारिखा हावभाव । लोक करिती ।१३।

विद्या नसे वैभव नसे । तेथें निर्मळ कैंचा असे ।
करंटपणें वोखटा दिसे । वोंगळ आणी विकारी ।१४।

पशु पक्षी गुणवंत । त्यास कृपा करी समर्थ ।
गुण नस्तां जिणें वेर्थ । प्राणीमात्रांचें ।१५।

गुण नाहीं गौरव नाहीं । सामर्थ्य नाहीं महत्त्व नाहीं ।
कुशळता नाहीं तर्क नाहीं । प्राणीमात्रांसी ।१६।

याकारणें उत्तम गुण । तेंचि भाग्याचें लक्षण ।
लक्षणेंविण अवलक्षण । सहजचि जालें ।१७।

जनामधें जो जाणता । त्यास आहे मान्यता ।
कोणी येक विद्या असतां । महत्व पावे ।१८।

प्रपंच अथवा परमार्थ । जाणता तोचि समर्थ ।
नेणता जाणिजे वेर्थ । नि:कारण ।१९।

नेणतां विंचु सर्प डसे । नेणतां जीवघात असे ।
नेणतां कार्य नासे । कोणी येक ।२०।

नेणतां प्राणी सिंतरे । नेणपणें तऱ्हे भरे ।
नेणपणें ठके विसरे । पदार्थ कांहीं ।२१।

नेणतां वैरी जिंकिती । नेणतां अपाईं पडती ।
नेणतां संव्हारती, घडती- । जीव नास ।२२।

आपुलें स्वहित न कळे जना । तेणें भोगिती यातना ।
ज्ञान नेणतां अज्ञाना । अधोगती ।२३।

मायाब्रह्म जीवशिव । सारासार भावाभाव ।
जाटिल्यासाठीं होतें वाव । जन्ममरण ।२४।

कोण कर्ता निश्चयेंसीं । बद्ध मोक्ष तो कोणासीं ।
ऐसें जाणतां प्राणियांसीं । सुटिका घडे ।२५।

जाणिजे देव निर्गुण । जाणिजे मी तो कोण ।
जाणिजे अनन्यलक्षण । म्हणिजे मुक्त ।२६।

जितुकें जाणोन सांडिलें । तितुकें दृश्य वोलांडिलें ।
जाणत्यास जाणतां तुटलें । मूळ मीपणाचें ।२७।

न जाणतां कोटीवरी । साधनें केलीं परोपरीं ।
तरी मोक्षास अधिकारी । होणार नाहीं ।२८।

मायाब्रह्म वोळखावें । आपणास आपण जाणावें ।
इतुक्यासाठीं स्वभावें । चुके जन्म ।२९।

जाणतां समर्थांचें अंतर । प्रसंगें वर्ते तदनंतर ।
भाग्य वैभव अपार । तेणेंचि पावे ।३०।

म्हणौन जाणणें नव्हे सामान्य । जाणतां होईजे सर्वमान्य ।
कांहींच नेणतां अमान्य । सर्वत्र करिती ।३१।

पदार्थ देखोन भूत भावी । नेणतें झडपोन प्राण ठेवी ।
मिथ्या आहे उठाठेवी । जाणते जाणती ।३२।

जाणत्यास कळे वर्म । नेणत्याचें खोटें कर्म ।
सकळ कांहीं धर्माधर्म । जाणतां कळे ।३३।

नेणत्यास येमयातना । जाणत्यास कांहींच लागेना ।
सकळ जाणोन, विवंचना– । करी तो मुक्त ।३४।

नेणतां कांहीं राजकारण । अपमान करून घेती प्राण ।
नेणतां कठीण वर्तमान । समस्तांस होये ।३५।

म्हणोनियां नेणणें खोटें । नेणते प्राणी ते करंटे ।
जाणतां विवरतां तुटे । जन्ममरण ।३६।

म्हणोन अलक्ष करूं नये । जाणणें हाचि उपाये ।
जाणतां सांपडे सोये । परलोकाची ।३७।

जाणणें सकळांस प्रमाण । मूर्खास वाटे अप्रमाण ।
परंतु अलिप्तपणाची खूण । जाणतां कळे ।३८।

येक जाणणें करून परतें । कोण सोडी प्राणीयांतें ।
कोणी येक कार्य जें तें । जाटिल्याविण न कळे ।३९।

जाणणें म्हणिजे स्मरण । नेणणें म्हणिजे विस्मरण ।
दोहींमधें कोण प्रमाण । शाहाणे जाणती ।४०।

जाणते लोक शाहाणे । नेणते वेडे दैन्यवाणे ।
विज्ञान तेंहि जाणपणें । कळों आलें ।४१।

जेथें जाणपण खुंटलें । तेथें बोलणेंही तुटलें ।
हेतुरहित जालें । समाधान ।४२।

श्रोते म्हणती हें प्रमाण । जालें परम समाधान ।
परी पिंडब्रह्मांडऐक्यलक्षण । मज निरोपावें ।४३।

ब्रह्मांडीं तेचि पिंडीं असे । बहुत बोलती ऐसें ।
परंतु याचा प्रत्यय विलसे । ऐसें केलें पाहिजे ।४४।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'जाणपणनिरूपणनाम'
समास चौथा समाप्त.

❑❑

दशक ९ : समास ५

अनुमाननिर्शन

॥ श्रीराम ॥

पिंडासारिखी ब्रह्मांडरचना । नये आमुच्या अनुमाना ।
प्रचित पाहातां नाना । मतें भांबावती । १ ।

जें पिंडीं तेंचि ब्रह्मांडीं । ऐसी बोलावयाची प्रौढी ।
हें वचन घडीनें घडी । तत्वज्ञ बोलती । २ ।

पिंड ब्रह्मांड येक राहाटी । ऐसी लोकांची लोकधाटी ।
परी प्रत्ययाचे परीपाटीं । तगों न सके । ३ ।

स्थूळ सूक्ष्म कारण माहाकारण । हे च्यारी पिंडींचे देह जाण ।
विराट हिरण्य अव्याकृत मूळप्रकृती हे खूण । ब्रह्मांडींची । ४ ।

हे शास्त्रधाटी जाणावी । परी प्रचित कैसी आणावी ।
प्रचित पाहातां गथागोवी । होत आहे । ५ ।

पिंडीं आहे अंतःकरण । तरी ब्रह्मांडीं विष्णु जाण ।
पिंडीं बोलिजेतें मन । तरी ब्रह्मांडीं चंद्रमा । ६ ।

पिंडीं बुद्धी ऐसें बोलिजे । तरी ब्रह्मांडीं ब्रह्मा ऐसें जाणिजे ।
पिंडीं चित्त ब्रह्मांडीं वोळखिजे । नारायेणु । ७ ।

पिंडीं बोलिजे अहंकार । ब्रह्मांडीं रुद्र हा निर्धार ।
ऐसा बोलिला विचार । शास्त्रांतरीं । ८ ।

तरी कोण विष्णूचें अंतःकर्ण । चंद्राचें कैसें मन ।
ब्रह्मयाचें बुद्धिलक्षण । मज निरोपावें । ९ ।

नारायेणाचें कैसें चित्त । रुद्रअहंकाराचा हेत ।
हा विचार पाहोन नेमस्त । मज निरोपावा ।१०।

प्रचितनिश्चयापुढें अनुमान । जैसें सिंहापुढें आलें स्वान ।
खऱ्यापुढें खोटें प्रमाण । होईल कैसें ।११।

परी यास पारखी पाहिजे । पारखीनें निश्चय लाहिजे ।
परीक्षा नस्तां राहिजे । अनुमानसंशई ।१२।

विष्णु चंद्र आणी ब्रह्मा । नारायेण आणी रुद्रनामा ।
यां पाचांचीं अंतःकर्णपंचकें आम्हा । स्वामी निरोपावी ।१३।

येथें प्रचित हें प्रमाण । नलगे शास्त्राचा अनुमान ।
अथवा शास्त्रीं तरी पाहोन । प्रत्ययो आणावा ।१४।

प्रचितीवीण जें बोलणें । तें अवघेंचि कंटाळवाणें ।
तोंड पसरून जैसें सुणें । रडोन गेलें ।१५।

तेथें काये हो ऐकावें । आणी काये शोधून पाहावें ।
जेथें प्रत्ययाच्या नांवें । सुन्याकार ।१६।

आवघे आंधळेचि मिळाले । तेथें डोळसाचें काय चाले ।
अनुभवाचे नेत्र गेले । तेथें अंधकार ।१७।

नाहीं दुग्ध नाहीं पाणी । केली विष्ठेची सारणी ।
तेथें निवडायाचे धनी । ते एक डोंबकावळे ।१८।

आपुले इछेनें बोलिलें । पिंडाऐसें ब्रह्मांड कल्पिलें ।
परी तें प्रचितीस आलें । कोण्या प्रकारें ।१९।

म्हणोन हा अवघाच अनुमान । अवघें कल्पनेचें रान ।
भलीं न घ्यावें आडरान । तश्करीं घ्यावें ।२०।

कल्पून निर्मिले मंत्र । देव ते कल्पनामात्र ।
देव नाहीं स्वतंत्र । मंत्राधेन ।२१।

येथें न बोलतां जाणावें । बोलणें विवेका आणावें ।
आंधळें पाउलीं वोळखावें । विचक्षणें ।२२।

जयास जैसे भासलें । तेणें तैसें कवित्व केलें ।
परी हें पाहिजे निवडिलें । प्रचितीनें ।२३।

ब्रह्मयानें सकळ निर्मिलें । ब्रह्मयास कोणें निर्माण केलें ।
विष्णूनें विश्व पाळिलें । विष्णूस पाळिता कवणु ।२४।

रुद्र विश्वसंव्हारकर्ता । परी कोण रुद्रास संहारिता ।
कोण काळाचा नियंता । कळला पाहिजे ।२५।

याचा कळेना विचार । तो अवघा अंधकार ।
म्हणोनियां सारासार । विचार करणें ।२६।

ब्रह्मांड स्वभावेंचि जालें । परंतु हें पिंडाकार कल्पिलें ।
कल्पिलें परी प्रत्यया आलें । नाहीं कदा ।२७।

पाहातां ब्रह्मांडाची प्रचिती । कित्येक संशय उठती ।
हें काल्पनिक श्रोतीं । नेमस्त जाणावें ।२८।

पिंडासारिखी ब्रह्मांडरचना । कोण आणितो अनुमाना ।
ब्रह्मांडीं पदार्थ नाना । ते पिंडीं कैंचे ।२९।

औटकोटी भूतावळी । औटकोटी तीर्थावळी ।
औटकोटी मंत्रावळी । पिंडीं कोठें ।३०।

तेतीस कोटी सुरवर । अठ्यासि सहस्र ऋषेश्वर ।
नवकोटी कात्यायेणीचा विचार । पिंडीं कोठें ।३१।

च्यामुंडा छपन्न कोटी । कित्येक जीव कोट्यानुकोटी ।
चौऱ्यासी लक्ष योनींची दाटी । पिंडी कोठें ।३२।

ब्रह्मांडीं पदार्थ निर्माण जाले । पृथकाकारें वेगळाले ।
तेहि तितुके निरोपिले । पाहिजेत पिंडीं ।३३।

जितुक्या औषधी तितुकीं फळे । नाना प्रकारीं रसाळें ।
नाना बीजें धान्यें सकळें । पिंडीं निरोपावीं ।३४।

हें सांगतां पुरवेना । तरी उगेंचि बोलावेना ।
बोलिलें न येतां अनुमाना । लाजिरवाणें ।३५।

तरी हें निरोपिलें नवचे । फुकट बोलतां काय वेचे ।
याकारणें अनुमानाचें । कार्य नाहीं ।३६।

पांच भूतें ते ब्रह्मांडीं । आणी पांचचि वर्तती पिंडीं ।
याची पाहावी रोकडी । प्रचीत आतां ।३७।

पांचा भूतांचें ब्रह्मांड । आणी पंचभूतिक हें पिंड ।
यावेगळें तें उदंड । अनुमानज्ञान ।३८।

जितुकें अनुमानाचें बोलणें । तितुकें वमनप्राये त्यागणें ।
निश्चयात्मक तेंचि बोलणें । प्रत्ययाचें ।३९।

जेंचि पिंडीं तेंचि ब्रह्मांडीं । प्रचित नाहीं कीं रोकडी ।
पंचभूतांची तांतडी । दोहीकडे ।४०।
म्हणोनि देहींचे थानमान । हा तों अवघाचि अनुमान ।
आतां येक समाधान । मुख्य तें कैसें ।४१।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'अनुमाननिर्शननाम'
समास पाचवा समाप्त.

❑❑

दशक ९ : समास ६
गुणरूपनिरूपण

॥ श्रीराम ॥

आकाश जैसें निराकार । तैसा ब्रह्माचा विचार ।
तेथें वायोचा विकार । तैसी मूळमाया । १ ।
हें दासबोधीं असे बोलिलें । ज्ञानदशकीं प्रांजळ केलें ।
मूळमायेंत दाखविलें । पंचभूतिक । २ ।
तेथें जाणीव तो सत्वगुण । मध्य तो रजोगुण ।
नेणीव तमोगुण । जाणिजे श्रोतीं । ३ ।
म्हणाल तेथें कैंची जाणीव । तरी ऐका याचा अभिप्राव ।
पिंडीं माहाकारण देहीं सर्व– । साक्षिणी अवस्था । ४ ।
तैसी मूळप्रकृती ती ब्रह्मांडींचें । देह माहाकारण साचें ।
म्हणोन तेथें जाणीवेचें । अधिष्ठान आलें । ५ ।
असो मूळमायेभीतरीं । गुप्त त्रिगुण वास करी ।
पष्ट होती संधी चतुरीं । जाणावी गुणक्षोभिणी । ६ ।

जैसा तृणाचा पोटराकळा । पुढें उकलोन होये मोकळा ।
तैसी मूळमाया अवलीळा । गुणा प्रसवली ।७।

मूळमाया वायोस्वरूप । ऐक गुणक्षोभिणीचें रूप ।
गुणविकार होतांचि अल्प । गुणक्षोभिणी बोलिजे ।८।

पुढें जाणीव मध्यस्त नेणीव । मिश्रित चालिला स्वभाव ।
तेथें मातृकास ठाव । शब्द जाला ।९।

तों शब्दगुण आकाशींचा । ऐसा अभिप्राव येथीचा ।
शब्देंचि वेदशास्त्रांचा । आकार जाला ।१०।

पंचभूतें त्रिगुणाकार । अवघा वायोचा विकार ।
जाणीवनेणीवेचा विचार । वायोचिकरितां ।११।

वायो नस्तां कैंची जाणीव । जाणीव नस्तां कैंची नेणीव ।
जाणीवनेणीवेस ठाव । वायोगुणें ।१२।

जेथें मुळींच नाहीं चळण । तेथें कैंचें जाणीवलक्षण ।
म्हणोनि वायोचा गुण । नेमस्त जाणावा ।१३।

येकापासून येक जालें । हें येक उगेंचि दिसोन आलें ।
स्वरुप मुळींच भासलें । त्रिगुणभूतांचें ।१४।

ऐसा हा मुळींचा कर्दमु । पुढें पष्टतेचा अनुक्रमु ।
सांगतां येकापासून येक उगमु । हेंहि खरें ।१५।

वायोचा कर्दम बोलिला । तयापासून अग्नि जाला ।
तोहि पाहातां देखिला । कर्दमुचि ।१६।

अग्नीपासून जालें आप । तेंहि कर्दमस्वरूप ।
आपापासून पृथ्वीचें रूप । तेंहि कर्दमरूपी ।१७।

येथे आशंका उठिली । भूतांस जाणीव कोठें देखिली ।
तरी भूतांत जाणीव हे ऐकिली । नाहीं वार्ता ।१८।

जाणीव म्हणिजे जाणतें चळण । तेंचि वायोचें लक्षण ।
वायोआंगीं सकळ गुण । मागां निरोपिले ।१९।

म्हणोन जाणीवनेणीवमिश्रीत । अवघें चालिलें पंचभूत ।
म्हणोनियां भूतांत । जाणीव असे ।२०।

कोठें दिसे कोठें न दिसे । परी ते भूतीं व्यापून असे ।
तिक्षण बुद्धि करितां भासे । स्थूळ सूक्ष्म ।२१।

पंचभूतें आकारलीं । भूतीं भूतें कालवलीं ।
तरी पाहातां भासलीं । येक स्थूळ येक सूक्ष्में ।२२।

निरोधवायो न भासे । तैसी जाणीव न दिसे ।
न दिसे परी ते असे । भूतरूपें ।२३।

काष्ठीं अग्नी दिसेना । निरोधवायो भासेना ।
जाणीव तैसी लक्षेना । येकायेकीं ।२४।

भूतें वेगळालीं दिसती । पाहातां येकचि भासती ।
बहुत धूर्तपणें प्रचिती । वोळखावी ।२५।

ब्रह्मापासून मूळमाया । मूळमायेपासून गुणमाया ।
गुणमायेपासून तया । गुणास जन्म ।२६।

गुणापासूनियां भूतें । पावलीं पष्ट दशेतें ।
ऐसियांचीं रूपें समस्तें । निरोपिलीं ।२७।

आकाश गुणापासून जालें । हें कदापी नाहीं घडलें ।
शब्दगुणास कल्पिलें । आकाश वायां ।२८।

येक सांगतां येकचि भावी । उगीच करी गथागोवी ।
तया वेड्याची उगवी । कोणें करावी ।२९।

सिकविल्यांहि कळेना । उमजविल्यांहि उमजेना ।
दृष्टांतेंहि तर्केना । मंदरूप ।३०।

भूतांहून भूत थोर । हाहि दाविला विचार ।
परी भूतांवडिल स्वतंत्र । कोण आहे ।३१।

जेथें मूळमाया पंचभूतिक । तेथें काये राहिला विवेक ।
मूळमायेपरतें येक । निर्गुणब्रह्म ।३२।

ब्रह्मीं मूळमाया जाली । तिची लीळा परीक्षिली ।
तंव ते निखळ वोतली । भूतें त्रिगुणांची ।३३।

भूतें विकारवंत चत्वार । आकाश पाहातां निर्विकार ।
आकाश भूत हा विचार । उपाधीकरितां ।३४।

पिंडीं व्यापक म्हणोन जीव । ब्रह्मांडीं व्यापक म्हणोन शिव ।
तैसाच हाहि अभिप्राव । आकाशाचा ।३५।

उपाधीमधें सापडलें । सूक्ष्म पाहातां भासलें ।
इतुक्यासाठीं आकाश जालें । भूतरूप ।३६।

आकाश अवकाश तो भकास । परब्रह्म तें निराभास ।
उपाधी नस्तां जें आकाश । तेंचि ब्रह्म ।३७।

जाणीव नेणीव मध्यमान । हेंचि गुणांचें प्रमाण ।
येथें निरोपिलें त्रिगुण । रूपेंसहित ।३८।

प्रकृती पावली विस्तारातें । पुढें येकाचें येकचि होतें ।
विकारवंतचि तयातें । नेम कैंचा ।३९।

काळें पांढरें मेळवितां । पारवें होतें तत्वतां ।
काळें पिवळें मेळवितां । हिरवें होये ।४०।

ऐसे रंग नानापरी । मेळवितां पालट धरी ।
तैसें दृश्य हें विकारी । विकारवंत ।४१।

येका जीवनें नाना रंग । उमटों लागती तरंग ।
पालटाचा लागवेग । किती म्हणोन पाहावा ।४२।

येका उदकाचे विकार । पाहातां दिसती अपार ।
पांचा भूतांचे विस्तार । चौऱ्यासी लक्ष योनी ।४३।

नाना देहाचें बीज उदक । उदकापासून सकळ लोक ।
किडा मुंगी स्वापदादिक । उदकेंचि होयें ।४४।

शुक्लीत श्रोणीत ह्मणिजे नीर । त्या नीराचें हें शरीर ।
नखें दंत अस्तिमात्र । उदकाच्या होती ।४५।

मुळ्यांचे बारीक पागोरे । तेणें पंथें उदक भरे ।
त्या उदकेंचि विस्तारे । वृक्षमात्र ।४६।

अंब्रवृक्ष मोहरा आले । अवघे उदकाकरितां जाले ।
फळीं फुलीं लगडलें । सावकास ।४७।

खोड फोडून अंबे पाहतां । तेथें दिसेना सर्वथा ।
खांद्या फोडून फळें पाहातां । वोलीं सालें ।४८।

मुळापासून सेवटवरी । फळ नाहीं तदनंतरीं ।
जळरूप फळ चतुरीं । विवेकें जाणावें ।४९।

तेंचि जळ सेंड्या चढे । तेव्हां वृक्षमात्र लगडे ।
येकाचें येकचि घडे । येणें प्रकारें ।५०।

पत्रें पुष्पें फळें भेद । किती करावा अनुवाद ।
सूक्ष्म दृष्टीनें विशद । होत आहे ।५१।

भूतांचे विकार सांगों किती । क्षणक्षणा पालटती ।
येकाचे येकचि होती । नाना वर्ण ।५२।

त्रिगुणभूतांची लटपट । पाहों जातां हे खटपट ।
बहुरूप बहु पालट । किती म्हणोन सांगावा ।५३।

ये प्रकृतीचा निरास । विवेकें वारावा सावकास ।
मग परमात्मा परेश । अनन्यभावें भजावा ।५४।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'गुणरूपनिरूपणनाम'
समास सहावा समाप्त.

❑❑

दशक ९ : समास ७
विकल्पनिर्शन

॥ श्रीराम ॥

आधीं स्थूळ आहे येक । तरी मग अंत:कर्णपंचक ।
जाणतेपणाचा विवेक । स्थूळाकरितां ।१।

तैसेंचि ब्रह्मांडेंवीण कांहीं । मूळमायेसि जाणीव नाहीं ।
स्थूळाच्या आधारें सर्वहि । कार्य चाले ।२।

तें स्थूळचि नस्तां निर्माण । कोठें राहेल अंत:कर्ण ।
ऐसा श्रोतीं केला प्रश्न । याचें उत्तर ऐका ।३।

कोसले अथवा कांटेघरें । नाना पृष्ठिभागीं चालती घरें ।
जीव करिती लहानथोरें । शक्तीनुसार ।४।

शंख सिंपी घुला कवडे । आधीं त्यांचें घर घडे ।
किंवा आधीं निर्माण किडे । हें विचारावें ।५।

आधीं प्राणी ते होती । मग घरें निर्माण करिती ।
हे तों प्रत्यक्ष प्रचिती । सांगणें नलगे ।६।

तैसें आधीं सूक्ष्म जाण । मग स्थूळ होतें निर्माण ।
येणें दृष्टांतें प्रश्न । फिटला श्रोतयांचा ।७।

तंव श्रोता पुसे आणीक । जी आठवलें कांहीं येक ।
जन्ममृत्याचा विवेक । मज निरोपावा ।८।

कोण जन्मास घालितें । आणी मागुता कोण जन्म घेतें ।
हें प्रत्यया कैसें येतें । कोण्या प्रकारें ।९।

ब्रह्मा जन्मास घालितो । विष्णु प्रतिपाळ करितो ।
रुद्र अवघें संव्हारितो । ऐसें बोलती ।१०।

तरी हें प्रवृत्तीचें बोलणें । प्रत्ययास आणी उणें ।
प्रत्यय पाहातां श्लाघ्यवाणें । होणार नाहीं ।११।

ब्रह्म्यास कोणें जन्मास घातलें । विष्णूस कोणें प्रतिपाळिलें ।
रुद्रास कोणे संव्हारिलें । माहाप्रळई ।१२।

म्हणौनि हा सृष्टीभाव । अवघा मायेचा स्वभाव ।
कर्ता म्हणों निर्गुण देव । तरी तो निर्विकारी ।१३।

म्हणावें माया जन्मास घाली । तरी हे आपणचि विस्तारली ।
आणी विचारितां थारली । हेंहि घडेना ।१४।

आतां जन्मतो तो कोण । कैसी त्याची वोळखण ।
आणी संचिताचें लक्षण । तेंहि निरोपावें ।१५।

पुण्याचें कैसें रूप । आणी पापाचें कैसें स्वरूप ।
याहि शब्दाचा आक्षेप । कोण कर्ता ।१६।

हें कांहींच न ये अनुमाना । म्हणती जन्म घेते वासना ।
परी ते पाहातां दिसेना । ना धरितां न ये ।१७।

वासना कामना आणी कल्पना । हेतु भावना मति नाना ।
ऐशा अनंत वृत्ती जाणा । अंत:कर्णपंचकाच्या ।१८।

असो हें अवघें जाणीवयंत्र । जाणीव म्हणिजे स्मरणमात्र ।
त्या स्मरणास जन्मसूत्र । कैसें लागे ।१९।

देहो निर्माण पांचा भूतांचा । वायो चाळक तयाचा ।
जाणणें हा मनाचा । मनोभाव ।२०।

ऐसें हें सहजचि घडलें । तत्वांचें गुंथाडें जालें ।
कोणास कोणें जन्मविलें । कोण्या प्रकारें ।२१।

तरी हें पाहातां दिसेना । म्हणोन जन्मचि असेना ।
उपजला प्राणी येना । मागुतां जन्मा ।२२।

कोणासीच जन्म नाहीं । तरी संतसंगें केलें काई ।
ऐसा अभिप्राव सर्वहि । श्रोतयांचा ।२३।

पूर्वीं स्मरण ना विस्मरण । मधेंचि हें जालें स्मरण ।
अंतर्यामीं अंतःकर्ण । जाणती कळा ।२४।

सावध आहे तों स्मरण । विकळ होतां विस्मरण ।
विस्मरण पडतां मरण । पावती प्राणी ।२५।

स्मरण विस्मरण राहिलें । मग देहास मरण आलें ।
पुढें जन्मास घातलें । कोणास कोणें ।२६।

म्हणोनि जन्मचि असेना । आणी यातनाहि दिसेना ।
अवघी वेर्थचि कल्पना । बळावली ।२७।

म्हणौन जन्मचि नाहीं कोणासी । श्रोतयांची आशंका ऐसी ।
मरोन गेलें तें जन्मासी । मागुतें न ये ।२८।

वाळलें काष्ठ हिरवळेना । पडिलें फळ तें पुन्हां लागेना ।
तैसें पडिलें शरीर येना । जन्मास मागुतें ।२९।

मडकें अवचितें फुटलें । फुटलें तें फुटोनिच गेलें ।
तैसेंचि पुन्हां जन्मलें । नाहीं मनुष्य ।३०।

येथें अज्ञान आणी सज्ञान । सारिखेच जालें समान ।
ऐसा बळावला अनुमान । श्रोतयांसी ।३१।

वक्ता म्हणे हो ऐका । अवघें पाषांड करू नका ।
अनुमान असेल तरी विवेका । अवलोकावें ।३२।

प्रेत्नेंवीण कार्य जालें । जेविल्यावीण पोट भरलें ।
ज्ञानेंवीण मुक्त जालें । हें तों घडेना ।३३।

स्वयें आपण जेविला । त्यास वाटे लोक धाला ।
परंतु हें समस्तांला । घडलें पाहिजे ।३४।

पोहणें सिकला तो तरेल । पोहणें नेणे तो बुडेल ।
येथेंहि अनुमान करील । ऐसा कवणु ।३५।

तैसें जयांस ज्ञान जालें । ते ते तितुकेच तरले ।
ज्याचें बंधनचि तुटलें । तोचि मुक्त ।३६।

मोकळा म्हणे नाही बंधन । आणी प्रत्यक्ष बंदीं पडिले जन ।
त्यांचे कैसें समाधान । तें तुम्ही पहा ।३७।

नेणे दुसऱ्याची तळमळ । तें मनुष्य परदुःखसीतळ ।
तैसाच हाहि केवळ । अनुभव जाणावा ।३८।

जयास आत्मज्ञान जालें । तत्वें तत्व विवंचिलें ।
खुणेसी पावतांच बाणलें । समाधान ।३९।

ज्ञानें चुके जन्ममरण । सगट बोलणें अप्रमाण ।
वेदशास्त्र आणी पुराण । मग कासयासी ।४०।

वेदशास्त्रविचारबोली । माहानुभावांची मंडळी ।
भूमंडळीं लोक सकळी । हें मानीतना ।४१।

अवघें होतां अप्रमाण । मग आपलेंच काय प्रमाण ।
म्हणोन जेथें आत्मज्ञान । तोचि मुक्त ।४२।

अवघेच मुक्त पाहतां नर । हाहि ज्ञानाचा उद्गार ।
ज्ञानेंविण तो उद्धार । होणार नाहीं ।४३।

आत्मज्ञान कळों आलें । म्हणोन दृश्य मिथ्या जालें ।
परंतु वेढा लाविलें । सकळांस येणें ।४४।
आतां प्रश्न हा फिटला । ज्ञानी ज्ञानें मुक्त जाला ।
अज्ञान तो बांधला । आपले कल्पनेनें ।४५।
विज्ञानासारिखें अज्ञान । आणी मुक्तासारिखें बंधन ।
निश्चयासारिखा अनुमान । मानूंचि नये ।४६।
बंधन म्हणिजे कांहींच नाहीं । परी वेढा लाविलें सर्व हि ।
यास उपावचि नाहीं । कळल्यावांचुनी ।४७।
कांहींच नाहीं आणी बाधी । हेंचि नवल पाहा आधीं ।
मिथ्या जाणिजेना बद्धि । म्हणोन बद्ध ।४८।
भोळा भाव सिद्धी जाव । हा उधाराचा उपाव।
रोकडा मोक्षाचा अभिप्राव । विवेकें जाणावा ।४९।
प्राणी व्हावया मोकळा । आधीं पाहिजे जाणीवकळा ।
सकळ जाणतां निराळा । सहजचि होये ।५०।
कांहींच नेणिजे तें अज्ञान । सकळ जाणिजे तें ज्ञान ।
जाणीव राहातां विज्ञान । स्वयेंचि आत्मा ।५१।
अमृत सेऊन अमर जाला । तो म्हणे मृत्य कैसा येतो जनाला ।
तैसा विवेकी म्हणे बद्धाला । जन्म तो कैसा ।५२।
जाणता म्हणे जनातें । तुम्हांस भूत कैसें झडपितें ।
तुम्हांस वीष कैसें चढतें । निर्विष म्हणे ।५३।
आधीं बद्धासारिखें व्हावें । मग हें नलगेचि पुसावें ।
विवेक दुरी ठेऊन पाहावें । लक्षण बद्धाचें ।५४।
निजेल्यास चेईला तो । म्हणे हा कां रे वोसणातो ।
अनुभव पाहाणेंचि आहे तो । तरी मग निजोन पाहावा ।५५।

ज्ञात्याची उगवली वृत्ती । बद्धऐसी न पडे गुंती ।
भुकेल्याची अनुभवप्राप्ती । घाल्यास नाहीं ।५६।
इतुकेन आशंका तुटली । ज्ञानें मोक्षप्राप्ती जाली ।
विवेक पाहातां बाणली । अंतरस्थिती ।५७।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'विकल्पनिर्शननाम'
सातवा समास समाप्त.

❑❑

दशक ९ : समास ८
देहांतनिरूपण

॥ श्रीराम ॥

ज्ञाता सुटला ज्ञानमतें । परंतु जन्म कैसा बद्धातें ।
बद्धाचें काये जन्मतें । अंतकाळीं । १ ।
बद्ध प्राणी मरोन गेले । तेथें कांहींच नाहीं उरलें ।
जाणीवेचें विस्मरण जालें । मरणापूर्वी । २ ।
ऐसी घेतली आशंका । याचें उत्तर ऐका ।
आतां दुश्चीत होऊं नका । म्हणे वक्ता । ३ ।
पंचप्राण स्थळें सोडिती । प्राणरूप वासनावृत्ती ।
वासनामिश्रित प्राण जाती । देह सोडुनियां । ४ ।
वायोसरिसी वासना गेली । ते वायोरूपेंचि राहिली ।
पुन्हां जन्म घेऊन आली । हेतुपरत्वें । ५ ।
कित्येक प्राणी नि:शेष मरती । पुन्हा मागुते जीव येती ।
ढकलून दिल्हें तेणें दुखवती । हस्तपादादिक । ६ ।

सर्पदृष्टी जालियांवरी । तीं दिवसां उठवी धन्वंतरी ।
तेव्हां ते माघारी । वासना येते कीं । ७ ।

कित्येक सेवें होऊन पडती । कित्येक तयांस उठविती ।
येमलोकींहून आणिती । माघारे प्राणी । ८ ।

कित्येक पूर्वीं श्रापिले । ते शापें देह पावले ।
उश्रापकाळीं पुन्हां आले । पूर्वदेहीं । ९ ।

कित्येकीं बहु जन्म घेतले । कित्येक परकाया प्रवेशले ।
ऐसे आले आणी गेले । बहुत लोक ।१०।

फुंकिल्यासरिसा वायो गेला । तेथें वायोसुत निर्माण जाला ।
म्हणोन वायोरूप वासनेला । जन्म आहे ।११।

मनाच्या वृत्ती नाना । त्यांत जन्म घेते वासना ।
वासना पाहतां दिसेना । परंतु आहे ।१२।

वासना जाणिजे जाणीवहेत । जाणीव मुळींचा मूळतंत ।
मूळमायेंत असे मिश्रित । कारणरूपें ।१३।

कारणरूप आहे ब्रह्मांडीं । कार्यरूपें वर्ते पिंडीं ।
अनुमानितां तांतडीं । अनुमानेना ।१४।

परंतु आहे सूक्ष्मरूप । जैसें वायोचें स्वरूप ।
सकळ देव वायोरूप । आणी भूतसृष्टि ।१५।

वायोमधें विकार नाना । वायो तरी पाहातां दिसेना ।
तैसी जाणीववासना । अति सूक्ष्म ।१६।

त्रिगुण आणी पंचभूतें । हे वायोमध्यें मिश्रिते ।
अनुमानेना म्हणोन त्यातें । मिथ्या म्हणों नये ।१७।

सहज वायो चाले । तरी सुगंध दुर्गंध कळों आले ।
उष्ण सीतळ तप्त निवाले । प्रत्यक्ष प्राणी ।१८।

वायोचेनि मेघ वोळती । वायोचेनि नक्षत्रें चालती ।
सकळ सृष्टीची वर्तती गती । सकळ तो वायो ।१९।

वायोरूपें देवतें भूतें । आंगीं भरती अकस्मातें ।
वीध केलियां प्रेतें । सावध होतीं ।२०।

वारें निराळें न बोले । देहामधें भरोन डोले ।
आळी घेऊन जन्मा आले । कित्येक प्राणी ।२१।

राहाणें ब्राह्मणसमंध जाती । राहाणें ठेवणीं सांपडतीं ।
नाना गुंतले उगवती । प्रत्यक्ष राहाणें ।२२।

ऐसा वायोचा विकार । येवंचे कळेना विस्तार ।
सकळ कांहीं चराचर । वायोमुळें ।२३।

वायो स्तब्धरूपें सृष्टीधर्ता । वायो चंचळरूपें सृष्टीकर्ता ।
न कळे तरी विचारीं प्रवर्ता । म्हणिजे कळे ।२४।

मुळापासून सेवटवरी । वायोचि सकळ कांहीं करी ।
वायोवेगळें कर्तुत्व चतुरीं । मज निरोपावें ।२५।

जाणीवरूप मूळमाया । जाणीव जाते आपल्या ठाया ।
गुप्त प्रगट होऊनियां । विश्वीं वर्ते ।२६।

कोठें गुप्त कोठें प्रगटे । जैसें जीवन उफाळे आटे ।
पुढें मागुता वोघ लोटे । भूमंडळीं ।२७।

तैसाच वायोमधें जाणीवप्रकार । उमटे आटे निरंतर ।
कोठें विकारे कोठें समीर । उगाच वाजे ।२८।

वारी आंगावरून जाती । तेणें हातपाये वाळती ।
वारा वाजतां करपती । आलीं पिकें ।२९।

नाना रोगांचीं नाना वारीं । पीडा करिती पृथ्वीवरी ।
वीज कडाडी अंबरीं । वायोमुळें ।३०।

वायोकरितां रागोद्धार । कळे वोळखीचा निर्धार ।
दीप लागे मेघ पडे हा चमत्कार । रागोद्धारीं ।३१।

वायो फुंकितां भुली पडती । वायो फुंकितां खांडकें करपती ।
वायोकरितां चालती । नाना मंत्र ।३२।

मंत्रें देव प्रगटती । मंत्रें भूतें अखरकिती ।
बाजीगरी वोडंबरी करिती । मंत्रसामर्थ्यें ।३३।

राक्षसांची मावरचना । ते हे देवांदिकां कळेना ।
विचित्र सामर्थ्यें नाना । स्तंबनमोहनादिकें ।३४।

धडचि पिसें करावें । पिसेंच उमजवावें ।
नाना विकार सांगावे । किती म्हणोनी ।३५।

मंत्रीं संग्राम देवांचा । मंत्रीं साभिमान ऋषींचा ।
महिमा मंत्रसामर्थ्याचा । कोण जाणे ।३६।

मंत्रीं पक्षी आटोपिती । मूशकें स्वापदें बांधती ।
मंत्रीं माहांसर्प खिळिती । आणी धनलाभ ।३७।

आतां असो हा प्रश्न जाला । बद्धाचा जन्म प्रत्यया आला ।
मागील प्रश्न फिटला । श्रोतयाचा ।३८।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'देहांतनिरूपणनाम'
समास आठवा समाप्त.

❑❑

दशक १ : समास १

संदेहवारण

॥ श्रीराम ॥

ब्रह्म वारितां वारेना । ब्रह्म सारितां सरेना ।
ब्रह्म कांहीं वोसरेना । येकीकडे । १ ।

ब्रह्म भेदितां भेदेना । ब्रह्म छेदितां छेदेना ।
ब्रह्म परतें होयेना । केलें तरी । २ ।

ब्रह्म खंडेना अखंड । ब्रह्मीं नाहीं दुसरें बंड ।
तरी कैसें हें ब्रह्मांड । सिरकलें मधें । ३ ।

पर्वत पाषाण सिळा सिखरें । नाना स्थळें स्थळांतरें ।
भूगोळरचना कोण्या प्रकारें । जाली परब्रह्मीं । ४ ।

भूगोळ आहे ब्रह्मामधें । ब्रह्म आहे भूगोळामधें ।
पाहातां येक येकामधें । प्रत्यक्ष दिसे । ५ ।

ब्रह्मीं भूगोळें पैस केला । आणी भूगोळहि ब्रह्मीं भेदिला ।
विचार पाहातां प्रत्यय आला । प्रत्यक्ष आतां । ६ ।

ब्रह्मीं ब्रह्मांड भेदिलें । हें तों पाहातां नीटचि जालें ।
परी ब्रह्मास ब्रह्मांडें भेदिलें । हें विपरीत दिसे । ७ ।

भेदिलें नाहीं म्हणावें । तरी ब्रह्मीं ब्रह्मांड स्वभावें ।
हें सकळांस अनुभवें । दिसत आहे । ८ ।

तरी हें आतां कैसें जालें । विचारून पाहिजे बोलिलें ।
ऐसें श्रोतीं आक्षेपिलें । आक्षेपवचन । ९ ।

आतां याचें प्रत्योत्तर । सावध ऐका निरोत्तर ।
येथें पडिले कीं विचार । संदेहाचे । १० ।

ब्रह्मांड नाहीं म्हणों तरी दिसे । आणी दिसे म्हणों तरी नासे ।
आतां हें समजती कैसें । श्रोतेजन ।११।

तंव श्रोते जाले उद्दित । आहों म्हणती सावचित ।
प्रसंगें बोलों उचित । प्रत्योत्तर ।१२।

आकाशीं दीपास लाविलें । दीपें आकाश परतें केलें ।
हें तों घडेना पाहिलें । पाहिजे श्रोतीं ।१३।

आप तेज अथवा पवन । सारूं न सकती गगन ।
गगन पाहातां सघन । चळेल कैसें ।१४।

अथवा कठीण जाली मेदिनी । तरी गगनें केली चाळणी ।
पृथ्वीचें सर्वांग भेदुनी । राहिलें गगन ।१५।

याची प्रचित ऐसी असे । जें जडत्वा आलें तितुकें नासे ।
आकाश जैसें तैसें असे । चळणार नाहीं ।१६।

वेगळेपणें पाहावें । तयास आकाश म्हणावें ।
अभिन्न होतां स्वभावें । आकाश ब्रह्म ।१७।

तस्मात आकाश चळेना । भेद गगनाचा कळेना ।
भासलें ब्रह्म तयास जाणा । आकाश म्हणावें ।१८।

निर्गुण ब्रह्मासें भासलें । कल्पूं जातां अनुमानलें ।
म्हणोन आकाश बोलिलें । कल्पनेसाठीं ।१९।

कल्पनेसि भासे भास । तितुकें जाणावें आकाश ।
परब्रह्म निराभास । निर्विकल्प ।२०।

पंचभूतांमधें वास । म्हणौन बोलिजे आकाश ।
भूतांतरीं जो ब्रह्मांश । तेंचि गगन ।२१।